नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १९१ * * नागपूर * | शुक्रवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## आघाड्यांचे हवाई इमले

निवडणूका घोषित होताच काही व्यक्तींच्या अंगात येते. काही पक्षांच्या अंगात येते. त्यापैकी काही पक्ष मिळून आघाड्या बनतात आणि मग त्यांच्याही अंगात येते. गेल्या वर्षभरापासून भारतात सध्या तरी दोनच पक्ष म्हणजे एनडीए आणि इंडिया यांच्यात लढाई होत आहे. इतर पक्ष चटणीसारखे असतात. चटणीला भाजी समजून खाता येत नाही. तोंडी लावण्यापुरतेच चटणीचे महत्त्व असते. आता आपल्या महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. त्यात अनेक आघाड्या परस्पर मिलन करून तयार होत आहेत. या आघाड्यांचे नेते आपल्या जिल्ह्यापुरते नक्कीच मजबूत असतात. पण त्यांना संपूर्ण राज्यात आपले पाय पसरवता येत नाहीत. हेच सगळीकडचे दृश्य आहे. गेल्या काही दिवसांपासून या आघाड्यांच्या बैठका सुरू आहेत. बच्चू कडू यांचा प्रहार विदर्भात अनेक ठिकाणी कार्यरत असला, तरी त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र अमरावती जिल्हा हेच आहे. खुद्द बच्चू कडू यांचा मतदारसंघ सोडला. तर त्यांच्या पक्षाचे दुसरे आमदार शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झालेले आहेत. इतर काही पक्ष जे त्यांच्याबरोबर आहेत. त्यांची ताकद एकदोन आमदारांच्या पेक्षा जास्त जागा निवडून आणण्याची नाही. राजसाहेब ठाकरे यांनी स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली आहे. त्यांचे नाव जरी मनसे असले तरी ती तिसरी सूचनाच आहे. फरक इतकाच आहे की, दोन वर्षांपूर्वी एका शिवसेनेच्या दोन शिवसेना झाल्या. पण त्यापूर्वी छगन भुजबळांचे बंड झाले होते. त्याआधी नारायण राणे यांचे बंड झाले होते. पण त्यांची नवा पक्ष काढण्याची हिंमत झाली नव्हती. राज साहेबांनी शिवसेनेतील सहकाऱ्यांसोबत शिवसेनेसारखाच राजकीय पक्ष उभा केला. तेव्हा तिकडे शिवसेना आणि इकडे मनसेना अशा रंगलेल्या पहिल्याच निवडणुकीत राज साहेबांनी सुवर्णवलयांकित आमदारांपासून सामान्य आमदारांपर्यंत 13 मनसेचे वीर निवडून आणले. त्यानंतर राज साहेब लोकप्रिय राहिलेच, पण ते मतदार प्रिय होऊ शकले नाहीत. त्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न आम्ही कधीच केला नाही. याचे कारण हे कोडे कोणाच्या बापालाही सोडवता येत नाही. आम आदमी पक्ष संपूर्ण भारतभर फैलावण्यासाठी त्या पक्षाचे नेते माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सदैव तयार आणि तत्पर असतात. दिल्लीनंतर पंजाब जिंकल्यावर हरियाणामध्ये आम आदमी पक्षाचे काही काम आहे, असे मुळीच दिसले नाही. तत्पूर्वी गुजरातमध्ये मरगळलेल्या काँग्रेसला आणखी खाली आणण्याचे काम आम आदमी पक्षाने इमानेइतबारे केले. हरियाणामध्ये इंडिया आघाडीचा मित्र म्हणून आपल्याला काही जागा मिळाव्यात, अशी त्या पक्षाची मागणी होती. मात्र काँग्रेसचे तेथील एकमेव शिलेदार हुड्डा यांना असा अतीव आत्मविश्वास होता की, आपण हरियाणा मधील भारतीय जनता पक्षाच्या सरकारला हुडहुडी भरायला लावू. पण त्यांच्या हुडहुडीची उडी भारतीय जनता पक्षाच्या कौशल्यपूर्ण कौटिल्यशाहीमुळे पार रसातळाला गेली. यामुळे काँग्रेसचे काही जागांवर हमखास निवडून येणारे आमदार पडले, असे म्हणतात. यावरून बोध घेऊन आता आम आदमी पक्षाने महाराष्ट्रात निवडणुका न लढण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच महाराष्ट्रात निवडणुकांचा नारळ फोडायचाच नाही असे ठरवलेले आहे. या सुज्ञपणाबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

▶▶ पान ८ वर

## मुख्यमंत्रीपदाचा निर्णय निवडणुकीनंतर

# आघाडीत २०० जागांवर मतैक्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७:
मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल हे आम्ही निवडणुकीनंतर ठरवू, आता चर्चा करणे योग्य नाही, आमच्यासाठी तो विषय संपला आहे. मविआची पत्रकार परिषद झाली तेव्हाच हा विषय ठरला.

या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे आणि मी स्वतः होतो. जयंत पाटील यांच्याकडे पक्षाची मोठी जबाबदारी आहेच. ते पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत, जागांबाबतचा निर्णय जयंत पाटील घेणार आहेत.



दरम्यान, शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, महाविकास आघाडीत २८८ पैकी २०० जागांवर एकमत झाले आहे. उर्वरित जागांसाठी आज बैठक होईल. बैठकीला तिन्ही पक्षांचे अध्यक्ष हजर राहतील. निर्णय घेतील आणि आम्हाला सांगतील.

शरद पवार यांना लोकसभा निवडणुकीत जसा पिपाणीचा फटका बसला तसा फटका यावेळी बसेल का असा प्रश्न केला असता ते म्हणाले की, लोकसभेला जे चित्र होते ते स्पष्ट झालेले नव्हते. आता आम्ही स्पष्ट केले आहे.

हरियाणात भाजप सरकार होते ते कायम राहिले. जम्मू काश्मीरमध्ये तसे झाले नाही. पण त्या निवडणुकीचा महाष्ट्रात परिणाम येथे होईल असे वाटत नाही. महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपदाबाबत काही नेते दावा करत आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यावर प्रश्न केला असता शरद पवार म्हणाले की मनोज जरांगे यांचा निवडणूक लढण्याचा निर्णय तर होऊ द्या, निर्णय झाल्यावर मग बोलता येईल.

**सीएमपदावर अंतर्गत चर्चा**

जयंत पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री चेहरा जाहीर करावा असं उध्दव ठाकरे यांचा आग्रह आहे पण याबाबत अंतर्गत चर्चा सुरू आहे. जास्तीत जास्त विधानसभेला जागा निवडून आणायच्या आहेत. त्यासाठी आम्ही सगळेच प्रयत्न करतो आहे. बाहेरच्या पक्षातील लोकांना घेण्याचा आमचा उद्देश नाही. आमच्याकडे तरुण चेहरे आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## खरी शिवसेना-राष्ट्रवादी कोणाची? सुप्रीम कोर्टातील सुनावणी टळली

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १७:
महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर होण्या आधीच आमदार अपात्र प्रकरणाचा निकाल न्यायालयाने द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे तथा शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आली होती.

मात्र आता आचारसंहिता लागली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहे. या प्रकरणाची आज होणारी सुनावणी देखील पुढे ढकलण्यात आली असून आता मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे १० नोव्हेंबरला निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीपूर्वी या प्रकरणाची सुनावणीसाठी ६ दिवस मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## नायब सैनी सलग दुसऱ्यांदा सीएम

■ वृत्तसंस्था, चंदीगड, दि. १७:
हरियाणात नायब सैनी यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले.

सीएम सैनी यांच्यासह १३ मंत्र्यांनी घेतली शपथ. त्यापैकी सर्वाधिक ५ चेहरे ओबीसी प्रवर्गातील आहेत. जाट, ब्राह्मण आणि एससी प्रवर्गातील प्रत्येकी २ मंत्री करण्यात आले आहेत. याशिवाय पंजाबी, राजपूत आणि वैश्य समाजातील प्रत्येकी एक मंत्री करण्यात आला आहे. सीएम नायब सैनी यांच्यानंतर अनिल विज यांनी दुसऱ्या क्रमांकाची शपथ घेतली. ते पंजाबी समाजातून येतात.

## भारत ४६ धावांत गारद

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. १७:
न्यूझीलंडविरुद्ध बंगळुरू कसोटीच्या दुसऱ्या दिवशी टीम इंडिया पहिल्या डावात ४६ धावांत ऑलआऊट झाली. घरच्या मैदानावर भारताची ही सर्वात कमी कसोटी धावसंख्या आहे. तसेच आशिया खंडातील कोणत्याही संघाची ही सर्वात कमी कसोटी धावसंख्या आहे. भारताच्या डावात पाच फलंदाज शून्यावर बाद झाले. कोहली कारकिर्दीत ३८ व्यांदा खाते न उघडता बाद झाला आहे.



विराट कोहली
३८ वेळा डक

## 'आप'चे मविआला पहले 'आप'

### महाराष्ट्रात विधानसभा लढवणार नाही आम आदमी पार्टीचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६:
दिल्लीतील सत्ताधारी आम आदमी पार्टीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मैदानातून अंग काढून घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. यामुळे विरोधी पक्षांच्या मतांची विभागणी टळून राज्यातील महाविकास आघाडीला मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



आम आदमी पार्टीने हरियाणा विधानसभा निवडणूक स्वबळावर लढली होती. त्याचा थेट फटका काँग्रेसला बसून भाजपचा मोठा फायदा झाला होता. याचे विरोधकांच्या इंडिया आघाडीत तीव्र पडसाद उमटले होते. त्यामुळे आपने महाराष्ट्र व झारखंड विधानसभा निवडणुकीत सावध भूमिका घेत या दोन्ही राज्यांतील निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. या दोन्ही राज्यांच्या निवडणुकीत आम आदमी पार्टी इंडिया आघाडीला पाठिंबा देईल. आपच्या या भूमिकेमुळे विरोधकांच्या मतांची विभागणी टळून त्याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे आम आदमी पार्टीने २०१९ साली महाराष्ट्र व झारखंड या दोन्ही राज्यांतील विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांनी राज्यातील २८८ पैकी २४ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते. त्यातील २३ जणांचे डिपॉझिट जप्त झाले होते. झारखंडमध्येही आपने ८१ पैकी २६ जागांवर आपले नशीब आजमावले होते. पण तिथेही त्यांची अनामत रक्कम जप्त झाली होती. महाराष्ट्रात येत्या २० नोव्हेंबर रोजी एका टप्प्यात निवडणूक होणार आहे. तर झारखंडमध्ये १३ व २० नव्हेंबर अशा २टप्प्यांत मतदान होणार आहे.



# महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग घेणार वोट जिहादविषयी कायदेशीर सल्ला !

मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीत वोट जिहादच्या नावाने विशिष्ट समाजाचे मतदान झाल्याचा आरोप केला जातो आहे. विधानसभेच्या निवडणुकीत वोट जिहाद हा शब्दप्रयोग होण्याची शक्यता आहे. परंतु, धर्माच्या आधारे मतदान आणि आचारसंहितेचा भंग होतो का, या विषयी महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी कायदेशीर सल्ला घेऊन धोरण निश्चित करेल. तसेच वोट जिहाद वक्तव्यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास १०० मिनिटांत कारवाईचा बडगा उगारला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम आणि सह निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

दरम्यान विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्य निवडणूक आयोगाने बुधवारी मंत्रालयात पत्रकार परिषद घेतली. दरम्यान, केंद्रीय निवडणुकीचा कार्यक्रम वाचून दाखवत, नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक २० नोव्हेंबरला घेणार असल्याचे स्पष्ट केले. राज्यात विधानसभेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन केल्यापासून निवडणूक खर्चावर देखरेख आणि नियंत्रण ठेवणार आहे. अर्ज भरण्यापूर्वी पासून प्रचारासाठी वापरलेले साहित्य खरेदीचा ताळेबंद मोजला जाईल. प्रत्येक उमेदवारांना ४० लाख खर्चाची मर्यादा असेल. राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या जाहिरात प्रमाणिकरण करण्यासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रम समिती स्थापन केली आहे. पेड न्यूज संदर्भात येणाऱ्या तक्रारींवर कारवाई केली जाईल. दिव्यांग मतदारांना मतदान करता यावे, याकरिता आयोगाने सक्षम नावाचा अॅप प्रसिद्ध केला आहे. तसेच अधिकाधिक मतदार नोंदणी भर दिला आहे. ४० टक्केहून अधिक दिव्यांग असलेल्या व्यक्तींना, तसेच ८५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेची सुविधा घरीच उपलब्ध करून दिली जाणार आहे. २०१९ मध्ये राज्यात एकूण ९६ हजार ६५३ मतदान केंद्रे होती. २०२४ मध्ये या मतदान केंद्रांची संख्या १ लाख १८६ इतकी झाली आहे. तर मागील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत येत्या निवडणुकीत ३ हजार ५३३ मतदान केंद्रांची संख्या वाढल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.

**तक्रारीवर १०० मिनिटांत उत्तर**

आचारसंहितेच्या काळात कोणत्या कृती कराव्यात आणि कोणत्या करू नयेत, यांविषयी सर्व राजकीय पक्षांना सूचना दिल्या आहेत. राजकीय पक्ष यांसमवेत बैठका देखील झाल्या. आचारसंहिता भंगाची तक्रार आल्यास त्याविषयी १०० मिनिटांत उत्तर देणे अपेक्षित आहे. मतदान केंद्रावर चोख व्यवस्था करण्यात येणार आहे.

**१९५० टोल फ्री नंबर**

मतदारांना काही अडचणी आल्यास त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर राज्य तर तालुकास्तरावर जिल्हा संपर्क केंद्र स्थापन केले आहे. तसेच १९५० हा टोल फ्री क्रमांकांची सुविधा उपलब्ध करून दिली असून ते शंकेचे निरसन करतील.

**१९ ऑक्टोबरपर्यंत मतदार नोंदणी**

लोकसभेप्रमाणे विधानसभा मतदानाचा टक्का वाढविण्यावर आयोगाने भर दिला असून अद्यापही मतदार नोंदणी सुरू आहे. ज्या नागरिकांनी अद्यापपर्यंत मतदार म्हणून नोंदणी केलेली नाही, त्यांना १९ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर निवडणुकीचा निकाल घोषित होईपर्यंत कोणतीही मतदार नोंदणी करता येणार नाही.

**प्रलोभने दाखवल्यास कारवाईचा बडगा**

ऐन दिवाळीत विधानसभा निवडणूक आली आहे. नामनिर्देशीत उमेदवारांनी उटणे, साबण किंवा विविध प्रलोभने या काळात दाखवू नये. कोणत्याही प्रकारच्या वस्तू वाटप करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. मात्र, त्यानंतरही तक्रारी दाखल झाल्यास चौकशी करून कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल.

**राज्यात ६९ लाख २३ हजार १९९ मतदार वाढले**

मागील २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांची संख्या ८ कोटी ९४ लाख ४६ हजार २११ इतकी होती. १५ ऑक्टोबरपर्यंत राज्यात मतदान नोंदणीत वाढ झाली, सध्या ती ९ कोटी ६३ लाख ६९ हजार ४१० इतकी आहे. पुरुष मतदार ४ कोटी ९७ लाख ४० हजार ३०२, महिला मतदार ४ कोटी ६६ लाख २३ हजार ७७ आणि तृतीयपंथी मतदारांची संख्या ६ हजार ३१ इतकी असणार आहे. २०१९ च्या तुलनेत येत्या निवडणुकीत ६९ लाख २३ हजार १९९ मतदार वाढल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**मतदान केंद्रामध्ये मोबाईल बंदी कायम**

लोकसभा निवडणुकीत मतदान केंद्रात मोबाईल वापरण्यास बंदी घातली होती. परिणामी अनेकांनी मतदान प्रक्रियेवर बहिष्कार टाकल्याचे समोर आले. मतदानाचा टक्का देखील काही प्रमाणात घसरला होता. मात्र, विधानसभेसाठी १०० मीटरपर्यंत मोबाईल मतदान केंद्रावर नेण्यास अनुमती दिली जाऊ नये, असा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाने केंद्राकडे पाठवला आहे. याविषयीचा अंतिम निर्णय अद्याप आलेला नाही. केंद्राने काही सुधारणा सुचविल्यास त्याविषयी निवडणुकीपूर्वी निर्णय घोषित केले जाईल.

**आक्षेपार्ह संदेशांवर सायबर सेल द्वारे कारवाई**

सोशल मिडीयाचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. लोकसभेत काही तथ्यहिन वृत्त प्रसारित झाले होते. आयोगाने यावेळी याची गंभीर दखल घेतली असून, सामाजिक माध्यमांद्वारे प्रसारित केल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह संदेशांची पडताळणी करण्यासाठी समिती नेमली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने देखील त्यावर सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आक्षेपार्ह संदेश पाठविल्याचे आढळून आल्यास, संबंधितांविरोधात तात्काळ कारवाई केली जाणार आहे.

# महायुतीतील संघर्षात मविआला संधी?

## भाजपसमोर पक्षांतर्गत वाद; शिंदे गटाच्या नाराजीचे आव्हान

नवी मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी



महायुतीचा आणि विशेषत: भाजपचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या नवी मुंबई, उरण, पनवेल या शहरांमधील विधानसभेच्या चार जागांवर विजयाची पुनरावृत्ती करताना महायुतीतील घटक पक्षांचेच अंतर्गत आव्हान भाजपपुढे असेल असे चित्र ठसठशीतपणे दिसू लागले आहे.

नवी मुंबईतील ऐरोली आणि बेलापूर या दोन जागांपैकी एक जागा आम्हाला मिळावी, असा ठराव मंगळवारी सायंकाळी शिवसेना (शिंदे) पक्षाच्या मेळाव्यात करण्यात आला. बेलापूर मतदारसंघात भाजपमध्ये विद्यमान आमदार मंदा म्हात्रे आणि पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्यातच उमेदवारीवरून कलगीतुरा रंगला आहे. तर उरणमध्ये महाविकास आघाडीतील शेकाप आणि शिवसेनेत उमेदवारीवरून जुंपली आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्याच्या वेगवेगळ्या भागांत महायुतीला पराभवाचा धक्का सहन करावा लागला. असे असले तरी कोकणपट्टीतील आणि विशेषत: मुंबई महानगर प्रदेशातील जागांवर मात्र महायुतीला चांगले यश मिळाले. ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर या चार लोकसभा मतदारसंघांपैकी तीन जागांवर महायुतीला विजय मिळला. ठाणे लोकसभा मतदारसंघातील सहापैकी सर्व विधानसभा क्षेत्रांत महायुतीचा उमेदवार आघाडीवर राहिला. असे असले तरी नवी मुंबईतील बेलापूर आणि ऐरोली मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराला तुलनेने कमी मताधिक्य मिळाले.

नवी मुंबईतील बेलापूर हा विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. गणेश नाईक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात असताना या ठिकाणी भाजपच्या मंदा म्हात्रे यांनी त्यांचा धक्कादायक पराभव केला होता. यामध्ये मंदा म्हात्रे यांच्या व्यक्तिगत करिष्म्यापेक्षा भाजपची असलेली लाट कारणीभूत ठरली. पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकांपूर्वीही म्हात्रे यांचा ५० हजारांपेक्षा अधिक मतांनी विजय झाला. लोकसभा निवडणुकीत मात्र या मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराला जेमतेम १२ हजारांचे मताधिक्य मिळाले.

ऐरोली विधानसभा मतदारसंघात महायुतीला नऊ हजारांचे मताधिक्य मिळाले. महायुतीचा गड समजल्या जाणाऱ्या या शहरात तुलनेने हे मताधिक्य घटलेले दिसून आले. त्यामुळे आगामी विधासनसभा निवडणुकीत येथील लढती रंगतदार होतील अशी शक्यता व्यक्त होत आहे.

दोन दिवसांपूर्वी संदीप यांनी आपल्या निकटवर्तीयांची एक बैठक घेत कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे बेलापूर मतदारसंघात भाजपला अंतर्गत दुहीचा सामना करावा लागेल असे चित्र आहे. ऐरोलीतही शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख विजय चौघुले यांनी गणेश नाईक यांना मदत करणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

**महायुतीत टोकाचे मतभेद**

नवी मुंबईत भाजपचे नेते गणेश नाईक आणि शिंदे सेनेच्या स्थानिक नेत्यांमध्ये विळा-भोपळ्याचे नाते आहे. कोणत्याही परिस्थितीत नाईक यांना मदत करणार नाही अशी भूमिका शिंदे सेनेचे स्थानिक नेते आतापासूनच घेताना दिसत आहेत. शिंदे सेनेचे नेते विजय नाहटा यांनी मध्यंतरी आपण तुतारी हाती घेत असल्याचे जाहीर केले होते. मात्र मुख्यमंत्र्यांनी 'आवाज' देताच नाहटा यांचे बंड सध्या थंडावल्याची चर्चा शहरात रंगली आहे. शिंदे सेनेतील एकही प्रभावी पदाधिकारी नाहटा यांच्याबरोबर जाण्यास तयार नसल्याने त्यांची अडचण झाल्याचे समजते. दरम्यान, बेलापूर मतदारसंघात भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी उमेदवारीवर दावा केल्याने पक्षात जोरदार संघर्ष सुरू झाला असून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

# पुणे, पिंपरी-चिंचवडवर इंधन टंचाईचे सावट!

पुणे, दि. १७ : प्रतिनिधी

पेट्रोलियम कंपन्यांकडून मागण्या मान्य होत नसल्याने पुण्यातील पेट्रोल पंपचालकांनी मंगळवारपासून आंदोलन सुरू केले. पंपचालकांनी पेट्रोलियम कंपन्यांच्या डेपोवर इंधन भरण्यासाठी त्यांचे टँकर पाठविणे बंद केले आहे. यामुळे पंपावर पेट्रोल, डिझेलचा तुटवडा भासू लागला असून, इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. पेट्रोल डिलर्स असोसिएशन पुणेने पेट्रोल आणि डिझेलची वाहतूक बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील ९०० पंपचालक तसेच सातारा जिल्ह्यातील ५०० पंपचालक सहभागी झाले आहेत. पेट्रोलियम कंपन्यांच्या डेपोवरून इंधनाची वाहतूक करणाऱ्या टँकरमध्ये ८५ टक्के पंपचालकांचे तर १५ टक्के खासगी वाहतूकदारांचे आहेत. या बंदमुळे पंपचालकांनी इंधन वाहतुकीसाठी टँकर पाठविणे बंद केले आहे. यामुळे इंधन पुरवठा विस्कळीत झाला असून, शहरात रात्री अनेक पंपांवरील इंधन साठा संपला. उद्या पुरवठा सुरळीत न झाल्यास इतर पंपांवरील इंधन साठा संपून शहरात इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबत असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल म्हणाले की, इंधन वाहतुकीसाठी पेट्रोलियम कंपन्यांकडून चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अव्यवहार्य दराने निविदा काढल्या जातात. सर्व भागधारकांना विचारात न घेता पेट्रोलियम कंपन्या पावले उचलत आहेत. यामुळे इंधनाच्या सुरक्षित वाहतुकीला हरताळ फासला जात असून, सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. पेट्रोलियम मंत्रालय, स्थानिक प्रशासन आणि पेट्रोलियम कंपन्यांना आंदोलनाची सूचना दिली होती. त्यामुळे जनतेची गैरसोय टाळण्यासाठी पेट्रोल आणि डिझेल पंपांवर योग्य प्रमाणात आणि वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी पेट्रोलियम कंपन्यांची आहे.

# टोलमुक्तीनंतर आनंदनगर टोलनाक्याची रचना बदलणार

ठाणे, दि. १७ : प्रतिनिधी

मुंबईच्या प्रवशद्वारावरील पाच टोलनाक्यांवर हलक्या वाहनांसाठी संपूर्ण टोलमाफी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर हलक्या वाहने कोंडीत अडकू नये यासाठी आता आनंदनगर टोलनाक्यावर नव्याने रचना करण्याचे नियोजन टोल कंपनीकडून सुरू आहे. त्यानुसार, टोलमुक्त मोटारी आणि इतर वाहनांसाठी वेगळ्या मार्गिका उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे टोलनाक्यावरील कोंडीतून नागरिकांची सुटका होण्याची शक्यता आहे. ठाणे, नवी मुंबई शहरातून लाखो नोकरदार त्यांच्या वाहनांनी मुंबई गाठत असतात. या वाहन चालकांना टोल आकारला जातो. त्यामुळे दररोज वाहन चालकांना टोलचा फटका सहन करावा लागत होता. मुलुंड आणि ठाण्याच्या वेशीवर असलेल्या आनंदनगर टोलनाक्यावरून अधिक वाहनांची वाहतुक होत असते. टोलनाक्यावरील काही मार्गिका या फास्टॅग असलेल्या मोटारी आणि काही मार्गिका दैनंदिन टोल वसूलीसाठी निश्चित करण्यात आल्या आहेत. टोल वसूली दरम्यान वाहतुकीचा खोळंबा झाल्यास कोंडीची समस्या चालकांना सहन करावी लागते. टोल वसूलीविरोधात विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलने केली होती. अखेर राज्य शासनाने आता हलक्या वाहनांसाठी मुंबईच्या पाचही टोलनाक्यावर वाहनांना टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे दररोज मोटारीने मुंबई गाठणाऱ्या नोकरदारांना मोठा दिलासा मिळणार आहे. हलक्या वाहनांना टोलमाफीचा निर्णय लागू झाल्याने आनंदनगर येथील टोलनाक्याची रचना बदलण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. त्यानुसार, आराखडा तयार केला जात असून येथील तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेले दोन टोलनाके हटविले जाण्याची शक्यता आहे. तसेच मालवाहू वाहनांना किंवा टोलमाफीपासून वगळण्यात आलेल्या वाहनांना इतर मार्गिकेतून प्रवेश दिला जाण्याची शक्यता आहे. टोल माफी करण्यात आलेल्या वाहनांना आता इतर मार्गिका उपलब्ध झाल्यास आनंदनगर टोलनाक्यावर होणाऱ्या कोंडीतून वाहन चालकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. टोलनाक्यावर हलक्या वाहनांना टोलमाफी दिल्यानंतर लहान आकाराचे ट्रक, टेम्पो चालक देखील टोल नाक्यावर टोल देण्यास टाळाटाळ करत होते. हलक्या वाहनांनामध्ये आमची वाहने मोडतात असा दावा त्यांच्याकडून केला जात होता. तर टोल कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून टोल मागितला जात होता. त्यामुळे चालक आणि कर्मचाऱ्यांमध्ये खटके उडत असल्याचे चित्र विविध टोलनाक्यांवर पाहायला मिळत आहे.

# राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याला दोन रौप्यपदके प्राप्त

धाराशिव, दि. १७ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा कुस्ती संघ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बाबूजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी आहिल्या नगर येथे 15 ऑक्टोबर रोजी 19 वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा ग्रीको रोमन व फ्री स्टाईल स्पर्धा संपन्न झाल्या



या स्पर्धेमध्ये धाराशिवच्या दोन महिला पैलवान पैलवान पौर्णिमा प्रभाकर खरमाटे 65 किलो वजनी गटात व सृष्टी संतोषराव जमदाडे 62 किलो वजनी गटात राज्यात दुसरा क्रमांक मिळवून सिल्वर मेडल ची कमाई केली पैलवान पौर्णिमा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नळदुर्ग ची विद्यार्थिनी व पैलवान सृष्टी ज्ञान उद्योग विद्यालय येरमाळा ची विद्यार्थिनी आहे या या कुस्तीमध्ये दोघींनी आक्रमकपणे खेळाच्या जोरावर समोरील खेळाडूला चितपट करून सिल्वर पथकाचे कमाई केली आहे या विजयाबद्दल धाराशिव शहरा सह जिल्ह्याचे नावलौकिक या खेळाडूंकडून करण्यात आले आहे

तसेच यावेळी क्रीडा शिक्षक कपिल सोनटक्के सर व चांदणे सर व जिल्हा कुस्ती संघाचे व ममदादा गाते सर संतोष नलावडे सर संतोष जमदाडे सर संदीप वांजळे सर सुंदर भाऊ जवळगे सर उदय काकडे सर जाधव दिनकर जाधवर वस्ताद आनंद केंद्रे सर गणेश सप्ते सर मनोज जाधव वर सर रवी गोडसे सर प्रशांत निंबाळकर सर क्रीडा अधिकारी हरनाळे साहेब क्रीडा अधिकारी नायकवडी साहेब क्रीडा अधिकारी बिराजदार साहेब या सर्व प्रतिष्ठित मंडळीचे मार्गदर्शन लाभले मार्गदर्शक प्रभाकर खरमाटे सर धनंजय जाधव सर व संभाजी राजे निंबाळकर सर विजयाबद्दल तसेच कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक शिक्षक वृंदावनी व पालक वर्गातून या महिला पैलवानांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# घरफोडीत रोख रकमेसह सोन्याचे दागिने आणि साहित्याची चोरी

भिवंडी, दि. १७ : प्रतिनिधी

शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करीत सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम आणि साहित्याची चोरी केल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील पहिल्या घटनेत १३ ते १४ ऑक्टोबर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी पूर्णा येथील महानगर गॅस पेट्रोल पंपा समोरील राजश्री मार्बल अँड ग्रॅनाईटस्, स्टाइलच्या दुकानाच्या पत्र्याचे लोखंडी रोलिंगचा दरवाजा उचकटून त्यावाटे आत प्रवेश करून शोरुम मधील ४ शॉवर सेट, ४ मिक्सर फिंटीग, सेरा कंपनीचे २४ नग टायप सिपी फिटींग, तसेच एक कंम्प्युटर मॉनिटर असा एकूण ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला आहे.तर दुसऱ्या घटनेत अज्ञात चोरट्यानी १५ ऑक्टोबर रोजी दुपारी १ ते ३ वाजेच्या सुमारास कामतघर परिसरातील नीळकंठ को.ऑपरेटिव्ह सोसायटीत राहणारे रगंन तुळशीराम चिलवरवार यांच्या घराचा कडीकोयंडा धारदार शस्त्राने कापून त्यावाटे आत प्रवेश करून बेडरूममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडुन कपाटाचे आतील लॉक कशानेतरी उचकटुन लॉकरमध्ये असलेल्या प्लास्टिकच्या डब्यामधील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.याप्रकरणी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस सीसीटिव्हीच्या मदतीने चोरट्यांचा शोध घेत आहेत.

# गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट यांच्यासह दोघे निलंबित

पुणे, दि. १७ : प्रतिनिधी

फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्या प्रकरणी गुन्हे शाखा युनिट तीनचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट, सहायक फौजदार संतोष क्षीरसागर यांना पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. श्रीहरी बहिरट हे सध्या गुन्हे शाखेच्या दंगल नियंत्रण पथकामध्ये नियुक्तीस आहेत. बहिरट हे गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस निरीक्षक होते. बहिरट यांच्या सांगण्यावरुन फसवणुकीच्या गुन्ह्यात सहआरोपी न करण्यासाठी सहायक फौजदार क्षीरसागर याने तक्रारदाराकडे पाच लाख रुपयांची मागणी केली होती. मे २०२४ मध्ये ही घटना घडली होती. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार देण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी करण्यात आली. क्षीरसागर याने तडजोडीत दोन लाख रुपये स्वीकारण्यास सहमती दर्शविली होती. याप्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशा घटनांमुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलिन झाल्याचा ठपका ठेवून श्रीहरी बहिरट आणि क्षीरसागर यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. निलंबन कालावधीत बहिरट यांनी दररोज पोलीस नियंत्रण कक्ष आणि क्षीरसागर यांनी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात हजेरी द्यावी, असे आदेशात म्हटले आहे.

# डोंबिवलीजवळ लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू

डोंबिवली, दि. १७ : प्रतिनिधी

डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान मंगळवारी सकाळी लोकलमधून पडून एका वीस वर्षाच्या तरूणाचा जागीच मृत्यू झाला. आठवड्यातून एक ते दोन प्रवासी डोंबिवली-कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान लोकलमधून पडून मरण पावत असल्याने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आयुष जतीन दोशी (२०) असे मयत तरूणाचे नाव आहे. तो डोंबिवली पश्चिमेतील ठाकुरवाडी भागात आपल्या कुटुंबीयांसह राहत होता. आयुषने मंगळवारी सकाळी नऊ वाजता डोंबिवली रेल्वे स्थानकातून फलाट क्रमांक पाचवरून सीएसएमटीकडे जाणारी अतिजलद लोकल पकडली. नेहमीप्रमाणे त्याला गर्दीतून आत जाता आले आहे. त्यामुळे तो दरवाजात आधार दांड्याला धरून लोंबकळत प्रवास करत होता.

डोंबिवली रेल्वे स्थानक सोडल्यावर लोकलने वेग घेतला. आतून प्रवाशांचा रेटा दरवाजातील प्रवाशांवर वाढू लागल्याने लोकलच्या दरवाजात उभ्या असलेल्या आयुषला आपला तोल सांभाळणे कठीण झाले. त्याच्या शरीर आणि हातावर प्रवाशांचा भार आल्याने तोल जाऊन तो डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रेल्वे मार्गात पडला. तो गंभीर जखमी झाला होता. तो पडताच प्रवाशांनी ओरडा केला. तोपर्यंत लोकल पुढे गेली होती. डोंबिवली लोहमार्ग पोलीस, कोपर रेल्वे स्थानकातील कर्मचारी, इतर प्रवाशांनी तातडीने जखमी आयुषला कल्याण डोंबिवली पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दाखल करण्यापूर्वीच तो मयत असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

डोंबिवली ते मुंब्रा दरम्यान लोकलमधून पडून मरण पावणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे. याविषयी रेल्वे प्रशासनाने योग्य विचार करून निर्णय घेण्याची मागणी उपनगरी रेल्वे महिला प्रवासी संघाच्या अध्यक्षा लता अरगडे यांनी वेळोवेळी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. त्याची दखल घेतली जात नसल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या वर्षभरात ५०० हून प्रवासी डोंबिवली ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान लोकलमधून पडून मरण पावले आहेत. तर हजाराहून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

# चार वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करणारा आरोपी गजाआड

पुणे, दि. १७ : प्रतिनिधी

मानलेल्या बहिणीच्या चार वर्षांच्या मुलीवर अत्याचार करुन पसार झालेल्या आरोपीला गुन्हे शाखेच्या दरोडा आणि वाहनचोरी विरोधी पथकाने पकडले. अत्याचार केल्यानंतर पसार झालेल्या आरोपीचा पोलिसांकडून गेले दोन दिवस शोध घेतला जात होता. विजय स्वामी बामु (वय ४०, रा. घोरपडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. बामु याने मानलेल्या बहिणीच्या चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली होती. याप्रकरणी मुंढवा पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत होता. बालिकेवर अत्याचार करण्यात आल्याची घटना घडल्यानंतर रहिवासी संतप्त झाले होते. रहिवाशांनी त्याचा शोध घेतला होता. मात्र, त्याचा ठावठिकाणा लागला नव्हता.

गुन्हे शाखेचे दरोडा आणि वाहनचोरी विरोधी पथक मुंढवा परिसरात गस्त घालत होते. रेल्वे उड्डाणपुलाजवळ आरोपी बामू थांबल्याची माहिती पोलीस कर्मचारी विक्रांत सासवडकर यांना मिळाली. सापळा लावून पोलिसांनी त्याला पकडले. पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई यांच्या मार्गदर्शनाखाली छबू बेरड, दत्तात्रय खरपुडे, विनायक रामाणे, गणेश गोसावी, संदीप येळे यांनी ही कारवाई केली. आरोपीला मुंढवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. शहरात गेल्या काही महिन्यांपासून शाळकरी मुलांवरील अत्याचाराच्या घटना वाढीस लागल्या आहेत. शाळांमध्ये योग्य आणि अयोग्य स्पर्शाबाबत समुपदेशन करण्यात आले आहे. समुपदेशानमुळे अत्याचारांच्या गुन्ह्यांना वाचा फुटली आहे. लष्कर भागातील एका शाळकरी मुलावर अत्यचार करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली होती. याप्रकरणी अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेण्यात आले होते. कोंढवा भागात शाळकरी मुलावर सोसायटीतील मुलांनी अत्याचार करण्याची घटना नुकतीच घडली होती.

# भिवंडीत तडीपार गुंडाला अटक

भिवंडी, दि. १७ : प्रतिनिधी

भिवंडी पोलिस उपायुक्तांच्या हद्दपार आदेशाला झुगारून भिवंडीत प्रवेश करणाऱ्या गुंडाला नारपोली पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.असलम उर्फ मोनु सलीम अन्सारी (२०) असे अटक केलेल्या तडीपार आरोपीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,भिवंडी पोलिस उपायुक्तांनी असलम यास २० ऑगस्ट २०२४ रोजी ठाणे जिल्हा, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई, पालघर, जिल्हा क्षेत्रातुन २ वर्षांकरिता हद्दपार केले असतानाही तो १५ ऑक्टोबर रोजी रात्री साडे दहा वाजताच्या सुमारास नारपोली परिसरातील भंडारी कंपाऊंड मधील रिक्षा स्टँड समोर निदर्शनास आल्याने त्यास पोलिसांनी ताब्यात घेऊन पोह श्रीधर हुंडेकरी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे.

# कल्याणमधील चिकणघर येथील मालमत्ता कर थकविणारा पेट्रोल पंप सील, मालमत्ता कर विभागाची कारवाई

कल्याण, दि. १७ : प्रतिनिधी

नियमित नोटिसा बजावुनही मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या कल्याण पश्चिमेतील चिकणघर येथील रोशन पेट्रोल पंप मालकाचा पेट्रोल पंप कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता कर विभागाचे अधिकारी आणि ब प्रभागाचे साहाय्यक आयुक्त, अधीक्षक यांनी मंगळवारी सील केला. रोशन पेट्रोल पंप मालकाकडे मालमत्ता कराची पालिकेची ९५ लाख १४ हजार रूपयांची थकबाकी आहे.

रोशन पेट्रोल पंप हा कल्याण पश्चिमेतील चिकणघर भागातील महत्वाचा पेट्रोल पंप आहे. या पेट्रोल पंपवर सीलबंद करण्याची कारवाई केली तर त्याचा त्रास वाहन चालकांना होईल. या सहानुभूती विचारातून पालिकेने या थकबाकीदार पेट्रोल पंप चालकाला थकित कर भरणा करण्यासाठी मुभा दिली होती. अलीकडेच रोशन पेट्रोल पंप मालकाला थकित कर भरण्यासाठी ब प्रभागाच्या कर विभागातून नोटीस बजावण्यात आली होती. या रकमेचा टप्प्याने भरणा करावा, असेही प्रयत्न पालिका अधिकाऱ्यांनी केले. त्यालाही पंप मालकाने दाद दिली नाही.

अखेर मंगळवारी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून ब प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त सोनम देशमुख, मालमत्ता कर विभागाच्या साहाय्यक आयुक्त स्नेहा करपे, कर अधीक्षक प्रमोद पाटील यांनी चिकणघर येथे जाऊन रोशन पेट्रोल पंप सील करण्याची कारवाई केली. जोपर्यंत मालमत्ता कराची थकित रक्कम पंप मालकाकडून पालिकेत भरणा केली जात नाही तोपर्यंत सील न काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

**शुद्धिपत्र**

ही जाहिरात खावडा फेज IV-C पॉवर ट्रॉन्स्मिशन लि. यांनी 7 ऑक्टोबर 2024 रोजी वर्तमानपत्रांत प्रसिध्द केलेल्या जाहिर सूचना जाहिरातीच्या अनुषंगाने आहे.

या स्किम अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या पारेषण वाहिन्या खालील गावे, कसबे व शहरे यांच्या आतून, वरुन, भोवतीच्या भागातून आणि मधून जातील.

**i) दक्षिण ओलपाड (जीआईएस)-बोईसर -II (जीआईएस) 765 केव्हि डी/सी वाहिनी**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | सोंसक, करंज, नेश, जिनोद, मिर्जापोर, मोर, भागवा, देलसा, कपासी, कुंडियाना, दांडी, लावछा, आडमोर, भांडूत, सेलूत, नरथान, पिंजरात, दिहेन, अरियाना, आंभेटा, कुंकणी, सिठना, सेग्वाछमा, बारबोधन, तेना, उमरा, गोठण, परिया, सयान, बालकस, बाल्कश, सेग्वास्यादला कंतारा, वास्वारी, नवापरा, काकड, सायला | ओलपाड | सूरत | गुजरात |
| 2. | बरोडिया | महुवा | सूरत | गुजरात |
| 3. | मुंजलाव | कामरेज | सूरत | गुजरात |

**ii) बोईसर -II (दोन्ही सर्किट) येथील नवसारी (न्यु)-पडघे (पीजी) 765 केव्हि डी/सी वाहिनीचा लिलो**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | लहांगेपाडा, भिलिया डोंगर, खाणेचापाडा, देहेरजा, झिरवपाडा | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

**iii) बोईसर -II (सेक्शन-II)-वेळगाव (एमएच) 400 केव्हि डी/सी (क्वॅड एसीएसआर/एएएसी/एएल 59 मूस इक्विव्हॅलन्ट) वाहिनी**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | फुटारकंडी, भिलिया डोंगर, कुंभस्तोपदा, हातने, देहेरजा, खाणेचापाडा, भोईरपाडा, झिरवपाडा, घोंडपाडा, झाडपोली, चंदनपाडा, गुणांगनपाडा, पंबाचापाडा, चिंचपाडा, वामनपाडा, राध्याचापाडा | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

**iv) (दोन्ही सर्किट्सवर) नाममात्र व्होल्टेजने प्रत्येक सर्किटला किमान 1700 एमव्हिए क्षमतेच्या ट्विन एचटीएलएस कंडक्टरचा वापर करुन बोईसर -II (सेक्शन-I) येथील बाभळेश्वर- पडघे (एम) 400 केव्ही डी/सी वाहिनीचा लिलो**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | सजन, झादापोली | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

# अन्न नासाडी कमी करणे हे अन्न सुरक्षा, पर्यावरणीय शाश्वततेसाठी आवश्यक

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १७ :

अन्न नासाडी कमी करणे हे अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी आवश्यक असल्याचे मत कृषी अभियांत्रिकी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी व्यक्त केले. दरवर्षी उत्पादित केलेल्या एक तृतीयांश अन्नाचा नाश होतो किंवा तो वाया जाते, असेही ते म्हणाले.

अन्न नासाडी आणि अपव्यय रोखण्याच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय जनजागृती दिवसानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. काळबांडे बोलत होते. कार्यक्रम कृषी अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालयात कापणी पश्चात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागाद्वारे पार पडला.



२९ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय अन्न नासाडी आणि अपव्यय रोखण्यासाठीचा आंतरराष्ट्रीय जनजागृती दिवस म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त कृषी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अन्न वाया जाऊ नये, पण नाईलाजाने गेलेच तर बायोगॅस प्लांटमध्ये ते टाकून ऊर्जा निर्मिती केली जाऊ शकते, याकडे लक्ष वेधले. अन्न नासाडी कमी करणे हे अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी आवश्यक असल्याचे डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी स्पष्ट केले. या विभागाने विविध कापणी पश्चात तंत्रज्ञान विकसित केले आहे. हे तंत्रज्ञान वापरून बरेच प्रमाणात पिकांची कापणी पश्चात हानी कमी करता येते.

प्रास्ताविक डॉ. प्रमोद बकाने यांनी केले. जगभरात दरवर्षी एकूण अन्नाच्या ३० ते ४० टक्के नासाडी होते, याकडे लक्ष वेधले आणि अन्न नासाडी कमी करण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता असल्याचे सांगितले. दरवर्षी उत्पादित केलेल्या एक तृतीयांश अन्नाचा नाश होतो किंवा तो वाया जातो. याची किंमत अंदाजे १ट्रिलियन अमेरिकी डॉलर्स आहे. अन्नाचे नुकसान आणि अपव्यय कमी करणे हे संसाधनांची बचत, हवामान बदलाचा सामना, अन्न सुरक्षा वाढवणे आणि अन्नाची किंमत कमी करण्यासाठी महत्त्वाचे ठरते.

२०२२ मध्ये ७८३ दशलक्ष लोक उपासमारीचा सामना करत होते, तर ३.१ अब्ज लोकांना पुरेसा आहार मिळत नव्हता, अशी माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमाला विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य, मोरेश्वर वानखडे आणि कृष्णा अंधारे आदी होते.

निबंध स्पधेर्चे आयोजन कार्यक्रमात अन्न नासाडी रोखण्यासाठी उपाययोजना या विषयावर निबंध स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. वासुदेव मते यांनी केले. कार्यक्रमाला कृषी अभियांत्रिकी शाखेतील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# आधार सिडिंगअभावी लाडक्या बहिणींचे पैसे अद्यापही जमा झाले नाही

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :



जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेंतर्गत आतापर्यंत ७ लाख १६,९०५ लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले आहेत. यामधून ६ लाख ९९,७१६ अर्ज मंजूर केले तर ७५,२११ लाडक्या बहिणींचे आधार सिडिंग न झाल्याने त्यांचे अद्यापही पैसे जमा झाले नाही.

याशिवाय १०,३३० अर्ज पडताळणीत आहे. अशातच आता मंगळवारी दुपारी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने या संपूर्ण प्रक्रियेला ब्रेक लागला आहे.

त्यामुळे प्रतीक्षेतील महिला लाभार्थ्यांच्या खात्यात २३ नोव्हेंबरनंतरच अनुदान जमा होणार आहे. सोबतच आता नव्याने अर्ज भरण्याच्या प्रक्रिया बंद करण्यात आली आहे.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये नारीशक्ती ॲपवर ३ लाख ९८,३४१ महिलांनी अर्ज केले होते. त्यानंतर अंगणवाडी सेविकांच्या पोर्टलवरून ३ लाख १०४२ महिलांनी पुन्हा या योजनेकरिता नोंदणी केली आहे. त्यामुळे आतापर्यंत ७ लाख १६,९०५ महिलांनी लाडकी बहीण योजनेकरिता अर्ज केले आहे. यापैकी आतापर्यंत ६ लाख ९९,७१६ महिलांचे अर्ज मंजूर केले आहे. यापैकी ४,३६३ महिलांचे अर्ज फेटाळले आहे. तर १०,३३० हजारांवर अर्ज पडताळणीत आहे. अशातच जिल्ह्यात अद्यापही ७५,२११ महिलांचे आधारकार्ड बँकेला संलग्न नसल्याने त्यांचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे त्यांचे सिडिंग झाल्यानंतर बँक प्रक्रियेतील अनुदान त्या लाभार्थ्यांना प्राप्त होईल.

परंतु, नव्याने अर्ज करणे व पुढील टप्पा याशिवाय त्रुटीत असलेल्या अजार्ची पडताळणी प्रक्रियेला मात्र आचारसंहितेमुळे आता ब्रेक लागला आहे. त्यामुळे आता नवे सरकार स्थापन झाल्यानंतर या योजनेतील अनुदान प्राप्त होईल की योजना बंद होईल. याकडे लक्ष लागणार आहे.

# इग्नो अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ :

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जुलै 2024 पासून सुरू झालेल्या विविध पदवी (सेमिस्टर पद्धतीचे अभ्यासक्रम वगळून), पदव्युत्तर,पदव्युत्तर पदविका, पदविका अभ्यास क्रमासाठी नवीन प्रवेशाची अंतिम तारीख 31 ऑक्टोबर, 2024 पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर अभ्यास क्रमांकरिता इग्नोच्या लिंकवरून अर्ज सादर करता येईल.

सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नोचे अभ्यासकेंद्र, मुलींचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी 8.30 ते 10.30 या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळविले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आंदोलन

## कापसाला १२, तर सोयाबीनला ८ हजारांचा भाव देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
देऊळगावराजा, दि. १७ :

कापसाला १२ हजार आणि सोयाबीनला प्रतिक्विंटल ८ हजार रुपये भाव मिळावा, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने १५ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी सरकारविरोधात प्रचंड घोषणाबाजी करून आंदोलनानंतर तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांना निवेदन देण्यात आले. सोयाबीनला प्रतिक्विंटल ८ हजार रुपये तसेच कापसाला १२ हजार रुपये भाव मिळावा. कोणतीही अट न घालता शेतकऱ्यांना खरीप व रब्बीचा पीक विमा तत्काळ देण्यात यावा. मागील वर्षी गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळावी.



सोयाबीन व कापसाच्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही अनुदान मिळावे. येलो मोझॅक व हुमणी अळीने नुकसान झालेल्या सोयाबीन पीक क्षेत्राचे तत्काळ पंचनामे करावेत.

घरकुलाची उर्वरित रक्कम लाभार्थींना तत्काळ देण्यात यावी. देऊळगावराजा व सिंदखेडराजा ग्रामीण रस्ते विकास आराखडा मंजूर करावा. देऊळगावराजा शहरातील मालमत्ताधारकांना पी. आर. कार्ड त्वरित वितरित करावे, अशा मागण्या या निवेदनाद्वारे केल्या.

या आंदोलनात पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे पाटील, राजेंद्र अंभोरे, शहराध्यक्ष विजय खांडेभराड, जनार्दन मगर, अरुण मोगल, सुनील झोरे, सचिन कोल्हे, आरिफ पठाण, रावसाहेब गाढवे पाटील, ऋषी शिंगणे, विकास शिंगणे, विशाल बंगाळे, दत्तात्रय जायभाये यांच्यासह शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

# गेमचेंजर ठरणाऱ्या मारेगावला प्रतिनिधित्व करण्याची संधी द्या

■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव, दि. १७ :

वणी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या तीन तालुक्यापैकी मारेगाव तालुक्याला आतापर्यंत कधीही आमदार देण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळे मारेगाव तालुक्यातील इच्छुक उमेदवारांना, वणी विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार तरी कधी? असा प्रश्न तालुका वासीयांकडून उपस्थित केला जात आहे. आगामी काळात होवू घातलेल्या वणी विधानसभेसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेल्या पक्षांच्या काही इच्छुकांनी दावेदारी दाखल केली आहे. मात्र दरवेळीप्रमाणे यंदाही त्यांच्या नशीबी निराशा येणार की, त्यांना संधी मिळणार याकडे तालुक्याचे लक्ष राहणार आहे.

विकासापासून कोसोदूर असलेल्या आदिवासी बहुल मारेगाव तालुक्यातील इच्छुक उमेदवारांना यावेळी वणी विधानसभेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी अशा आशयाची मागणी तालुका वासियांकडून जोर धरत आहे. १९५२ ते २०१९ या कालावधीत पार पडलेल्या वणी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत आजपर्यंत मतदारसंघात येणाऱ्या तीन तालुक्यांपैकी केवळ वणी आणि झरी या दोन तालुक्यातीलच उमेदवारांना विधानसभेचे प्रतिनिधित्व मिळाले आहे. परंतू मारेगाव तालुक्यात कुशल नेतृत्व असताना सुद्धा गेल्या ७२ वर्षापासून विधानसभेच्या उमेदवारीपासून मारेगाव तालुका हा वंचित राहिल्याचे दिसत आहे.नत्थूजी किन्हेकार, नरेंद ठाकरे, नानाजी खंडाळकर, जीवन पाटील कापसे यांच्यासारखे अनेक नेते तालुक्याला लाभले. मात्र पक्षांनी त्या काळात तालुक्याकडे पाठ फिरवून विधानसभेवर कुणालाही पाठवले नाही.

# ८ लाखांचे सोने लंपास

■ महासागर प्रतिनिधी, पुसद, दि. १७ :

शहरातील सोनार लाईन मधील एका ज्वेलर्सच्या दुकानातून ८ लाख रुपये किंमतीचे १०९ ग्रॅम वजनाचे सोने लॉकरमध्ये हात टाकून लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना भर दिवसा बुधवारी दि.१६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे सोनार लाईनमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरी झाल्याचे लाईव्ह व्हिडिओ सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांच्या हाती लागले आहे.

या प्रकरणी प्राप्त माहितीनुसार शहरातील सोनार लाईनमध्ये सतीश मधुकर वाकडे (वय ५९) वर्ष यांच्या मालकीचे माऊली ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या दुकानात भर दिवसा ही घटना घडली. सकाळी अंदाजे १०.४५ वाजताच्या सुमारास दोन इसम ग्राहक म्हणून दुकानात आले. त्यानंतर त्यांनी दुकान मालक सतीश वाकडे यांना सोन्याचे कानातले फुल दाखवा असे म्हटले. त्यावेळेस दुकान मालक सतीश वाकडे यांनी सोन्याचे कानातले दागिने दाखवले. त्यानंतर त्या दोन व्यक्तींपैकी एकाने, दुकानाच्या बाजूला असलेल्या माज्या बायकोला बोलावतो असे सांगितले. दुकान मालक सतीश वाकडे यांनी ती कानातली फुले लॉकरमध्ये ठेवली.

दरम्यान त्यातील एका व्यक्तीने चिल्लर मागितली व दुसऱ्या व्यक्तीने त्यास भ्रमित केले. भरदिवसा चोरी झाल्याने सोनार लाइनमध्ये खळबळ दिवसाढवळ्या सोने लंपास केल्याने संपूर्ण सोनार लाइनमध्ये खळबळ उडाली असून, भीतीचे वातावरण पसरले आहे. यापूर्वी ज्वेलर्सच्या दुकानातून सोन्याच्या दागिन्याच्या चोरीच्या घटना घडलेल्या आहे. त्यामुळे या चोरट्यांवर वेळीच आळा घालून त्यांचा कडक बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# तरुणाच्या हत्येप्रकरणी नातेवाईकांसह नागरिकांची पोलीस ठाण्यावर धडक

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :

शहरात खुनाच्या घटनांचे सत्र थांबता थांबत नसून, मागील १० दिवसांपासून शहरात कुठे ना कुठे खुन होत आहेत.मंगळवारी, १५ ऑक्टोबर रोजी रात्री १०.४५ वाजताच्या सुमारास कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील चित्रा चौकात आणखी एक खुनाची घटना घडली. १०० रुपये मागितल्यानंतर केवळ २० रुपयेच दिल्याने उद्धवलेल्या वादात दोघांनी एका तरुणाची चाकू व लोखंडी हुकने हल्ला चढवून निघृण हत्या केली. गत १० दिवसांतील शहरातील खुनाची ही पाचवी घटना आहे.त्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

निशांत उर्फ गोलू सुनील उसरेटे (३१) रा. रतनगंज असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी गोपाल अंकुशराव चव्हाण (४१) रा. रतनगंज यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी बुधवारी, १६ ऑक्टोबर रोजी मारेकरी विक्की गुप्ता (३५) रा. रतनगंज व योगेश गरुड (३०) रा. विलासनगर यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. मंगळवारी रात्री गोपाल, निशांत व समीर हे तिघे त्यांच्या अपघातग्रस्त मित्रांना बघण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात गेले होते. तेथून घरी परतत असताना निशांत गोपालची दुचाकी चालवत होता. चित्रा चौकात पोहोचल्यावर दुचाकीवर असलेल्या त्यांच्याच परिसरातील रहिवासी विक्की व त्याचा सहकारी योगेशने निशांतला रोखले.

विक्कीने गोलूला १०० रुपये मागितले. त्यावर त्याने केवळ २० रुपये दिले. २० रुपयेच दिल्याने योगेशने गोलूला चाकूने मारण्याची धमकी दिली. त्यावर ये हमारे मोहल्ले की बात है, तू क्यू बोल रहा है, असे निशांतने त्याला म्हटले. त्यानंतर निशांत हा विक्कीशी बोलत असतानाच विक्कीने निशांतवर लोखंडी हुकने निशांत उसरेटे हा २००७ पासून जयभोले कावड यात्रा काढत होता.

सर्वात मोठी कावड यात्रा म्हणून ती नावारूपास आली होती. भाविक असलेल्या गोलूच्या हत्येनंतर बुधवारी, १६ ऑक्टोबर रोजी दुपारी नातेवाइकांसह शेकडो नागरिकांच्या जमावाने कोतवाली ठाण्यावर धडक दिली. जमावाने रस्त्यावरच ठिय्या दिला. त्यामुळे हा रस्ता काही वेळ वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. आरोपींना अटक करून आमच्या समोर आणा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

त्यावर पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, साहाय्यक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर, कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. काही लोकप्रतिनिधींनीही त्यांची समजूत काढली. दरम्यान, दोन्ही मारेकऱ्यांना अटक करण्यात आल्याची माहिती संतप्त जमावाला देण्यात आली. त्यामुळे जमाव शांत झाला. त्यानंतर मृतकाचे शवविच्छेदन करण्यात आले.

# सुपर स्पेशालिटीमध्ये प्रथमच मेंडिबल फ्रॅक्चर रिडक्शन



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ :

मेळघाटात १५ दिवसांआधी झालेल्या बस अपघातात जखमी महिला व एका ६ वर्षीय बालिकेवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी) येथे मेंडिबल फ्रॅक्चर रिडक्शन, फिक्सेशन शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली.

त्यामुळे या दोन्ही रुग्णांना दिलासा मिळाला असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. दोघांचीही प्रकृती उत्तम असल्याची माहिती सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलद्वारे दिली . अशी शस्त्रक्रिया प्रथमच केल्याची माहितीही सुपर स्पेशालिटीद्वारे देण्यात आली.

दोन्ही रुग्णांना सुपर स्पेशालिटीत आणले त्यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक होती मेळघाटात १ ऑक्टोबर रोजी सेमाडोह धारणी मार्गावर खासगी बस नदीत कोसळली होती. यात चार प्रवाशांचा मृत्यू झाला होता. यात २४ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले होते. त्यात ही महिला व ६ वर्षीय बालिकेचा समावेश होता. या दोघींचा रक्तदाब कमी झाला होता. त्यामुळे त्यांना अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल केले होते.दोन्ही रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांच्या जबड्यात फ्रँक्चर असल्याचे दिसून आले. त्यामुळे रुग्णाला वेदना सहन कराव्या लागत होत्या. प्रकृतीही चिंताजनक होती.त्यामुळे या दोन्ही रुग्णांवर सातत्याने लक्ष ठेऊन त्यांची काळजी घेण्यात आली. त्यांच्या चाचण्या केल्या. या चाचण्यांमध्ये जे शारीरिक दोष आढळले त्यांचे निर्मुलन करावे लागले. त्यानंतर ज्यावेळी या दोन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर झाली. त्यावेळी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुपर स्पेशालिटीतील शल्य चिकित्सकांनी पहिल्यांदाच अशी शस्त्रक्रिया यशस्वी केली. त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी आनंद व्यक्त केला. किचकट शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन ते तीन तास लागले. रुग्णाच्या जबड्यात फ्रॅक्चर असल्याने डॉक्टरांनी इन प्लांट केले. ही शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना फारच सावधगिरी बाळगावी.


## जाहिर सुचना

**आम जनतेस सुचित करण्यात येते की खालील वर्णलेली चार चाकी वाहन मारुती बलेनो डेल्टा कार जिचा RTO पंजिकरण नं. क्र. MH31EU8374 असून चेसीस क्र. MA3EWB22SGJ236712 व इंजिन क्र. K12MN4190926 हे आहे. सदर चार चाकी वाहन माझे पतीचे स्व. अरुणकुमार पालित यांच्या नावे असून त्यांच्या पश्चात सदर चार चाकी वाहन सौ. देवयानी अरुणकुमार पालित (पत्नी) ह्यांच्या नावे करीत आहे. सदर चार चाकी वाहणावर कोणत्याही प्रकारचा गहानपत्र, किंवा कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सात दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदत कालावधी संपल्यावर आलेल्या आक्षेप मान्य करण्यात येणार नाही.**

संपर्क : सौ. देवयानी अरुणकुमार पालित
पत्ता : प्लॉट क्र ८२-एआणि ८२-बी, फ्लेट क्र ४०२
इंद्रनिल हाईट्स, रहाटे कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर -४४००२२


# जिल्हास्तरीय लोकनृत्य, अभिनय स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. १७ :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य व एनसीईआरटी नवी दिल्ली यांच्या विद्यमाने राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२४-२५ अन्वये मंगळवारी दि. १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणादिनाचे औचित्य साधून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथे जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धा व भूमिका अभिनय स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते.

या स्पधेर्चे उद्घाटन जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. देवानंद सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रमेश राऊत, समन्वयक अधिव्याख्याता सारिका पवार, अधिव्याख्याता धम्मरत्न वायवळ, अधिव्याख्याता मधुमती सांगळे यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी दिवंगत माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन जिल्हास्तरीय लोकनृत्य व अभिनय स्पधेर्ला सुरुवात करण्यात आली. या स्पधेर्चे प्रास्ताविक समन्वयक तथा अधिव्याख्याता सारिका पवार यांनी केले.



या लोकनृत्य व अभिनय स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील शासकीय आश्रम शाळा, जि.प.शाळा, नगर पालिका, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय आदी शाळेत शिक्षण घेणाऱ्या इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. जिल्हास्तरीय लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यातील अव्वल ठरलेल्या सात शाळांनी सहभाग नोंदवला.

सदर अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांनी मुले व मुली यांच्यात संधीची समानता, संयुक्त कुटूंबाची भूमिका, पर्यावरण संरक्षण, मादकद्रव्याचे सेवन रोखणे, पौगंडा अवस्थेतील निरोगी नाते संबंध आदी विषयांचा समावेश होता. या विषयावर नृत्यविष्कार करुन विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक जि.प.हायस्कुल लोणबेहळ यांनी पटकावले तर भूमिका अभिनय स्पर्धेत अनुसूचित जाती निवासी मुलांची शाळा इसापूर तालुका दिग्रस यांनी बाजी मारली.

विजेत्यांना दिले प्रशस्तीपत्र

विजेत्या स्पर्धकांना मोमेन्टो व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. प्रथम आलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्तरावर करण्यात आली.


फॉर्म आयएनसी-२६
(कंपनी (निवेश) नियम, २०१४ च्या नियम ३० नुसार)
कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका राज्यातून दुसऱ्या राज्यात बदलण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करावी
केंद्र सरकार, प्रादेशिक संचालक, पश्चिम विभागासमोर. महाराष्ट्र
कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ मधील उप-कलम (४) आणि कंपनी (इन्कॉर्पोरेशन) नियम, २०१४ च्या नियम ३० च्या उप-नियम (५) च्या खंड (अ) च्या बाबतीत
आणि
शांती मल्टिट्रेड प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत
(CIN: U52100MH2007PTC174137) कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी गोविंद अपार्टमेंट, ३७४/अ१, सुभान नगर, नागपूर महाराष्ट्र, भारत, ४४०००८ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेले
.... (अर्जदार)

याद्वारे सामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की उपरोक्त नामांकित अर्जदार कंपनी कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अंतर्गत केंद्र सरकारकडे (प्रादेशिक संचालक, पश्चिम क्षेत्र, महाराष्ट्र) अर्ज करण्याचा प्रस्ताव ठेवते कि कंपनीच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनच्या क्लॉज-२ (परिस्थिती खंड) च्या प्रस्तावित बदलाची पुष्टी मिळवण्यासाठी सोमवार, ३० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या कंपनीच्या १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या विशेष ठरावाच्या संदर्भात कंपनी आपले नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य वरून ओडिशा राज्य मध्ये बदलणार आहे.

कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे ज्या व्यक्तीचे हित प्रभावित होण्याची शक्यता आहे ती गुंतवणूकदार तक्रार फॉर्म दाखल करून एमसीए - २१ पोर्टलवर (www.mca.gov.in) देऊ शकते किवा त्याच्या/तिच्या हरकती नोंदणीकृत पोस्टद्वारे वितरित किंवा पाठविण्याचे समर्थित कारण रिजनल डायरेक्टर, वेस्टर्न रिजन, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राइव्ह, मुंबई ४०००२, महाराष्ट्र यांना प्रतिज्ञापत्राद्वारे त्याच्या/तिच्या स्वारस्याचे स्वरूप आणि विरोधाचे कारण सांगून ही सूचना प्रकाशित झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत अर्जदार कंपनीला खाली नमूद केलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत कार्यालयात प्रतसह पाठवा.

नोंदणीकृत कार्यालय: गोविंद अपार्टमेंट, ३७४/अ१, सुभान नगर, नागपूर महाराष्ट्र, भारत, ४४०००८.

अर्जदारासाठी आणि त्याच्या वतीने
स्वा/-
असितकुमार पट्टनायक
संचालक
डीआयएन: ०९०९७२०३

तारीख: १७.१०.२०२४
ठिकाण : नागपूर

# आदर्श आचारसंहितेचा बागुलबुवा!

महाराष्ट्र आणि झारखंड च्या विधानसभा निवडणुका नुकत्याच जाहीर झालेल्या आहेत. महाराष्ट्र झारखंड पेक्षा मोठे राज्य असूनही एकाच टप्प्यात निवडणूक घेण्यात येणार आहे.तर झारखंड मध्ये दोन टप्प्यात निवडणूक घेण्यात येणार आहे. याकारणाने दोनही राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे.

आचारसंहिता लागू झाली की सरकारी कामांना महिनाभर सुतूक लागलेले असते. कुठल्याही सरकारी कामांना बगल दिली जाते. बहुतांश कर्मचारी व अधिकारी वर्ग हा निवडणुकीचे कारणं सांगून आपली दैनंदिन कामे टाळण्याचा प्रयत्न करतात.हा नेहमीचा अनुभव राहिलेला आहे. आदर्श आचारसंहितेचे पितामह माजी मुख्य निवडणूक आयुक्त कै.टि.एन. शेषन यांनी निवडणूक आचारसंहिता जाहीर करून निवडणुकीतील चुकीच्या पायडांना आळा घातला होता. पुढे हा नियम प्रत्येक निवडणुकीत लागू करण्यात येऊ लागला.या मागे भारतीय निवडणुकांना चांगली शिस्त लावली जावी असा विचार अभिप्रेत असावा असे वाटते आहे. याआधी निवडणूक प्रचार हा डिजीटल नव्हता. तर तो पत्रक (पाम्प्लेट) काढून, सार्वजनिक व खासगी भिंतीवर रंगरंगोटी करून, गावा गावात सभांचे आयोजन करून, लॉऊडस्पिकर वरून आव्हान करून आपल्या पक्षाचा प्रचार करावा लागत असे.

आपल्या पक्षीय चिन्हांचे बिल्ले वाटप करून लहान मुलांच्या माध्यमातून घरोघरी उमेदवारांची नावे, चिन्ह पोहचवली जात होती. तसेच इमारतींवर, भिंतींवर (कंपाऊंड वॉल) रंगरंगोटी करून उमेदवाराचा,पक्षाचा प्रचार केल्याने भिंतींना विद्रुप स्वरूप एका रात्रीतून प्राप्त होत होते. याबाबत तक्रार करण्यास पणं कुठे जागा नव्हती. आता ही जागा डिजीटल पोस्टर्स, बॅनरने व्यापलेली आहे.

यामुळे लोकांना चांगला व्यवसाय प्राप्त झालेला असला तरीही प्रत्येक चौकात पोस्टर्सची गर्दी पहायला मिळते आहे. यामुळे वाहतुक नियमांची पायमल्ली होत आहे. चांगल्या वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आहे. यावर कुणाचेही नियंत्रण राहिलेले आढळून येत नाही. ही आजची शोकांतिका पहायला मिळते आहे.

आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्यकर्ते मंडळींनी घोषणांची आतिषबाजी करून लोकांचे मनोरंजन केलेले असते. यामुळे काही वेळा या घोषणा निवडणूक जुमला ठरतात.असा अनुभव जनतेला अनेकदा आलेला आहे. आचारसंहितेमुळे जनतेची कामे बाधीत होतात. आचारसंहितेच्या नावाखाली सरकारी कामांचे फलक,उदघाटन झालेल्या कोनशिलांवर आवरण घातले जाते. जेणेकरून मतदारांवर केलेल्या कामांचा प्रभाव पडू नये अशी निवडणूक आयोगाची धारणा आहे. यावर लाखों रुपयाचा विनाकारणचा खर्च होत असतो. याकडे कुणीही लक्ष वेधू इच्छित नाहीत याचे आश्चर्य वाटते आहे.

आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रमुख निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी काम पहात असतात. त्यांच्या नियंत्रणासाठी निवडणुकीचा संपूर्ण कारभार सुरू असतो. या काळात मिरवणुकींना,वीना परवानगीने एकत्र येऊन सभा घेण्यास, निदर्शनास बंधने घातली जातात. सरकारी कार्यालये, दवाखाने आणि शाळा, महाविद्यालयांच्या



मिलिंद गड्डमवार
राजुरा.
9511215200

आसपास कुठलीही गोष्ट करण्यासाठी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असते.

१०० मिटर परिसरात कुठलिही गोष्ट करण्यास मज्जाव घालण्यात आलेला असतो. सुरक्षेच्या कारणास्तव अनेक बंधने घातली जातात. जी जनतेला त्रासदायक ठरू शकतात. याचा विचार केला जात नाही.

या परिस्थितीमध्ये अधिकारीगण हम करें सो कायदा अश्या प्रवृत्तीने जनतेशी वागत असतात.जनतेला पदोपदी कायद्याचा धाक दाखविला जातो. तर उमेदवारांना सगळे रान मोकळे असते. कारण ते भावी लोकप्रतिनिधी असू शकतात.याची त्यांना जाणीव असते.

आदर्श आचारसंहितेचा सर्वात जास्त फटका जनतेला बसतो. या काळात कुठल्याही सरकारी कार्यालयात जनतेची कामे केली जात नाहीत. साहेब वर्ग सदा या ना त्या कारणाने सभेमध्ये व्यस्त असतात. कारकून मंडळी पण आलेल्या लोकांना टाळण्याचा प्रयत्न करतात. आपला काही स्वार्थ दडलेला असेल तरच त्या कामांकडे लक्ष देतात.'

आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास ' अशी कामाची अवस्था असते. या काळात खरे तर जनतेच्या समस्यांवर नियमांमध्ये राहून आपले पक्षीय मत मांडले गेले पाहिजे. समोरासमोर विविध विषयांवर चर्चा व्हायला पाहिजे.आम्ही पाच वर्षात काय केले आणि पुढील पाच वर्षात आमचे (पक्षांचे) काय उद्दीष्ट राहणार आहे यावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे.

राज्याला आर्थिकदृष्ट्या कसे मजबूत केले यावर चर्चा झाली पाहिजे.राज्याच्या दरडोई उत्पन्नात कशी भर पडली यावर चर्चा झाली पाहिजे. जनतापयोगी कोणते निर्णय घेतले गेले यातून जनतेला काय लाभ झाला यावर विचारविनिमय केला गेला पाहिजे. तसेच शाळा, शिक्षण, उद्योग, आरोग्य सुविधा, रोजगार,कायदा व्यवस्था, प्रदुषण, शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार, आयात-निर्यात धोरण यावर विचार मांडले गेले पाहिजेत.लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक आहेत कां राज्यकर्ते? यावर गावपातळीवर सांगोपांग चर्चा झाली पाहिजे.

लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा,कायद्याचे संरक्षण योग्य की अयोग्य यावर सुध्दा चर्चा झाली पाहिजे.जनतेला विश्वासात न घेता मनमानेल तसे कायदे करण्याचे अधिकार घटनेने यांना प्रदान केले आहेत कां? याकडे जनतेचे लक्ष वेधले गेले पाहिजे.विरोधी पक्षाचे काम विरोधक बरोबर करीत आहेत कां? हा प्रश्न पणं जनतेने स्वतःला विचारला पाहिजे.

पाच वर्षात निव्वळ सत्तेसाठी झगडणारे लोकप्रतिनिधी आपणं सर्वांनी पाहिले आहेत.सत्तेसाठी कुठल्याही पातळीवर उतरणारे आपले लोकप्रतिनिधी जनतेला मान्य आहेत कां ? याचा पणं विचार होणे गरजेचे आहे.

आचारसंहिता ही फक्त जनतेसाठी लागू आहे कां? उमेदवारांना यातून सुट कां मिळत असते? याचा पणं विचार करणे भाग आहे. निवडणूक आयोग प्रत्येक घटनांवर लक्ष ठेवून असतात.परंतु राजकीय आरोप प्रत्यारोप यासमोर निवडणूक आयोग सुध्दा हतबल होतांना आढळून येतो आहे. आपल्या लोकप्रतिनिधींनी कुठलीही लाज लज्जा शिल्लक ठेवलेली नाही.

निवडणुक काळात ते परस्परांना पाण्यात पहातात, वाटेल तसे आरोप प्रत्यारोप करतात आणि सत्तेचे गणित जमविण्यासाठी परत एकमेकांशी सोबत करतात. यामुळे जनता व पक्षीय कार्यकर्ते हे तोंडघशी पडतात आहेत. कुठल्याही पक्षांना स्वतःची ध्येय धोरणे ही राहिलेली नाहीत. यामुळे सर्वच पक्ष एकाच माळेतील मणी ठरतात आहेत. यात कर्मठ, सच्चा कार्यकर्त्यांचा व मतदारांचा बळी जातो आहे.यामुळे भारतीय लोकशाहीला कलंक लागतो आहे. यातून सुटका होण्यासाठी मतदारांनी विचार पुर्वक मतदान करून लोकशाही व्यवस्थेला वाचविले पाहिजे. कुठल्याही निवडणुक पुर्व आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला निवडून आणले पाहिजे. तरच आपली लोकशाही व्यवस्था ही सक्षम होऊ शकते. अन्यथा ती मतदानापुरताच सिमीत झालेली असेल. याचा विचार अवश्य व्हायला हवा आहे.

●●●●●●●●●

# शिवसेना विरुद्ध शिवसेना

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी साडेपाच दशकांपूर्वी शिवसेनेची स्थापना केली. मराठी माणसाची एकजूट व्हावी, मराठी माणसाचा आवाज बुलंद व्हावा आणि मुंबई व महाराष्ट्रावर मराठी माणसांचे वर्चस्व असावे या हेतूने त्यांनी शिवसेना स्थापन केली.

दरवर्षी शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुखांचे होणारे भाषण मराठी माणसांना विचारांची मेजवानी असायची. त्यांच्या भाषणातून मराठी माणसाला नवीन ऊर्जा मिळायची, संघर्षासाठी नवीन दिशा मिळायची. शिवसेनाप्रमुखांचा शब्द म्हणजे लाखो शिवसैनिकांना तो आदेश असायचा. बहुरंगी मुंबईमध्ये मराठी माणसाला ताठ मानने उभे केले ते शिवसेना प्रमुखांनीच. शिवसेनाप्रमुख हे शिवसैनिकांचे दैवत होते,

त्यांनी आयुष्यभर स्वतःसाठी काही मागितले नाही, कोणत्याही सरकारी पदाचा स्वीकार केला नाही. त्यांनी मनोहर जोशी, नारायण राणे यांना मुख्यमंत्री केले. राज्यात व केंद्रात दोन-तीन डझन शिवसैनिकांना मंत्री केले. चार-पाच डझन शिवसैनिकांना सत्तेच्या परिघात अधिकाराची पदे दिली. राज्याचे मुख्यमंत्री किंवा केंद्रात मंत्री होणे हे त्यांना मुळीच कठीण नव्हते. पण त्यांनी सत्तेच्या खुर्चीला कधी स्पर्शही केला नाही.

महाराष्ट्रात मराठी व देशात हिंदू हा त्यांचा मंत्र होता. दरवर्षी विजयादशमीला विचारांचे सोने लुटायला लाखो शिवसैनिक मुंबईत शिवतीर्थावर येत असत. वाजत-गाजत, गुलाल उधळत पण शिस्तीने यायचे यावर त्यांचा कटाक्ष असायचा. शिवसेनाप्रमुखांच्या उपस्थितीत झालेले दसरा मेळावे आता फक्त आठवणी उरल्या आहेत.

त्यांची विजेप्रमाणे कडाडणारी भाषणे व राज्यकर्त्यांना दिले जाणारे इशारे सरकारला कापरे भरवत असत. महाराष्ट्र आणि मराठी माणसाचे हित एवढाच त्यांचा अजेंडा होता. शिवसेनेतून अनेक मोठे नेते पक्ष सोडून गेले. राज ठाकरेंपासून गणेश नाईक, छगन भुजबळांपर्यंत अनेक जण बाहेर पडले. कोणी दुसऱ्या पक्षात गेले तर राज यांनी स्वतःचा महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष स्थापन केला. पण शिवसेनाप्रमुखांची शिवसेना कधी संपली नाही. शिवसेना आणि शिवसेना ब असे कधी घडले नव्हते.

नारायण राणे भाजपात आहेत, मोदी-शहांनी त्यांना केंद्रीच मंत्रीपद देऊन सन्मान केला. त्यांनीही कोकणात प्रथमच कमळ फुलवून चमत्कार घडवला. ते भाजपाचे खासदार आहेत पण त्यांचे आजही दैवत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेच आहेत. त्यांचे संस्कार आपल्यावर आहेत हे आजही ते अभिमानाने सांगत असतात.

महाआघाडी सरकारमध्ये उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री राहिले. एकनाथ शिंदे यांच्याकडे सर्वात मौल्यवान असे नगर विकासखाते होते. पण त्यांना स्वातंत्र्य नव्हते. नगरविकास खाते व महापालिकांचा कारभार ठाकरे पिता- पुत्र व त्यांचा परिवारच बघत होता, अशी उघड चर्चा होत असे. ठाकरेंनी केलेली काँग्रेसशी जवळीक आणि सरकारमध्ये असून अधिकार नाहीत, अशी शिंदे यांची दुहेरी कोंडी होत होती.

हिंदुत्वाच्या मुद्द्यावर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सेनेच्या आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवला आणि विधिमंडळ पक्षातच मोठी फूट पडली. पक्षाचे चाळीस आणि समर्थक दहा असे पन्नास आमदार, डझनभर खासदार शिंदेंच्या नेतृत्वाखाली उद्धव यांची साथ सोडून भाजपाबरोबर गेले.

निवडणूक आयोगानेही आमदार-खासदारांच्या संख्येच्या आधारावर एकनाथ शिंदे यांची शिवसेना खरी ठरवली. पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे पक्षाचे निवडणूक चिन्ह आयोगाने शिंदे यांना बहाल केले.

उद्धव ठाकरे यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाने पक्ष चालवायला अनुमती दिली व निवडणूक चिन्ह मशाल देण्यात आले. शिंदे गटाने पक्ष चोरला - वडील चोरले म्हणून ठाकरे यांनी क्रोध प्रकट केला. शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला मुख्यमंत्री पदावरून हटविण्याचे धाडस एकनाथ शिंदे यांनी करून दाखवले. त्याची किंमत भाजपाने त्यांना राज्याचे मुख्यमंत्रीपद दिले. शिवसेनेची सत्ता गेली, ठाकरेंचे मुख्यमंत्रीपद गेले. भाजपाच्या आशीवार्दाने पुन्हा शिवसेनेची सत्ता आली व शिंदे मुख्यमंत्री झाले. ठाकरेंची शिवसेना खच्ची करणे, हा भाजपाचा राजकीय अजेंडा होता, तो शिंदे यांच्या बंडाने साध्य झाला.

येत्या विधानसभेत शिवसेना विरुद्ध शिवसेना, ठाकरे विरुद्ध शिंदे, मुख्यमंत्री विरुद्ध माजी मुख्यमंत्री, शिवसेनाप्रमुखांचा पुत्र विरुद्ध शिवसैनिकांचा कडवट शिवसैनिक असा इरेला पेटलेला संघर्ष बघायला मिळणार आहे. विधानसभा निवडणूक म्हणजे ठाकरे व शिंदे यांची अग्निपरीक्षा आहे. शिवसैनिक आणि मतदार कोणाच्या पाठीशी आहे याचा कौल या निवडणुकीत बघायला मिळणार आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून व उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यापासून शिवसेना या बॅनरखाली दरवर्षी मुंबईत दोन दसरा मेळावे होत आहेत. शिवतीर्थावर कोणी मेळावा घ्यायचा हा पहिल्या वर्षी वाद जरूर झाला. कोर्टातही प्रकरण गेले होते. ठाकरेंच्या शिवसेनेचा मेळावा शिवतीर्थावर व शिंदेंच्या शिवसेनेचा मेळावा बीकेसीवर झाला.

गेल्या वर्षीपासून ठाकरेंचा दसरा मेळावा दादरला शिवतीर्थावर व शिंदेंच्या शिवसेनेचा आझाद मैदानावर होतो आहे. इकडे ठाकरे व तिकडे शिंदे. दोन्हीकडे भगवे झेंडे फडकत असतात. इकडे मशाल, तर तिकडे धनुष्यबाण दिसतो.

शिवसेनाप्रमुखांच्या संस्कारातून वाढलेले नेते दोन्ही मेळाव्यांतून मंचावर दिसतात. दोन्हीकडे जय भवानी - जय शिवाजी, आवाज कुणाचा, शिवसेनेचा... अशा घोषणा ऐकू येतात. दोन्हीकडे रणशिंगे फुंकली जातात.

पाऊस - चिखल आणि तीच तीच भाषणे यामुळे शिवसैनिकांचा जोश दोन्हीकडे यंदा कमी जाणवला. यंदा विचारांचे सोने कुठे लुटले गेले, या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. सामोपचाराचा मार्ग गांडूंनी सांगावा असे शिवसेनाप्रमुख दसरा मेळाव्याच्या मंचावरून कडाडायचे तेव्हा समोरून शिवसैनिकांच्या शिट्या नि टाळ्यांचा महाप्रचंड कडकडाट व्हायचा. मराठी माणसाच्या एकजुटीसाठी त्यांनी शिवसेना उभारली. आता दोन शिवसेना, दोन पक्षप्रमुख, दोन दसरा मेळावे. आम्हीच खरे, दुसरा खोटा, असे दोन्हीकडून मुठी आवळून, हात उंचावून सांगितले जाते.

एकनाथ शिंदेंच्या भाषणाला मुख्यमंत्रीपदाची धार असते. ठाकरेंवर वार करताना ती तीक्ष्ण होते. कोरोना काळात घरात बसलात, लोक मरत होते तेव्हा तुम्ही मढ्यावरचे लोणी खात होता... पीएमने उद्घाटन केलेल्या मुंबई मेट्रो-३ ला मुख्यमंत्री असताना विरोध केलात. १७ हजार कोटींचा खर्च वाढला. ते जनतेचे पैसे, वाचले असते तर आम्ही ते महिलांना आणखी दिले असते...

सत्तेवर असताना घरी बसलात, आता गल्लोगल्ली फिरताय... लाडक्या बहिणी तर तुम्हाला निवडणुकीत जोडे मारतील... त्यांचे फेक नॅरेटिव्ह आम्ही पॉझिटिव्ह... तुम्ही भगव्याचा रंग बदललात, बॉम्बस्फोटातील आरोपी तुमच्या प्रचारात फिरत होता, पाकिस्तानचे झेंडे तुमच्या प्रचारात फडकवले गेले... एमआयएम व उबाठा सेनेत आता काही फरक राहिला नाही... हा २४ बाय ७ काम करणारा कार्यकर्ता आहे, मला समृद्ध समर्थ विकसित महाराष्ट्र घडवायचा आहे, मी मैदानातून पळून जाणारा नाही, तर पळवून लावणारा बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघेंचा शिवसैनिक आहे...होती दाढी म्हणून उद्ध्वस्त केली महाआघाडी... अशा शब्दांत ठाकरेंच्या दिशेने आझाद मैदानावरून तोफा धडाडल्या.

आझाद मैदानावरून आक्रमक व जबरदस्त भाषण झाले ते पक्षाच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांचे. त्यांनी मेळाव्यातील शिवसैनिकांमध्ये ऊर्जा निर्माण केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांना शाबासकी दिली. शिवतीर्थावर उद्धव ठाकरे यांनी शिंदे सरकार विरोधात संताप आणि संतापच प्रकट केला. त्यांचा उल्लेख सातत्याने मिंधे असाच केला. अदानी आमची शान, आम्ही शेटजींचे श्वान अशा खालच्या पातळीवर जाऊन त्यांनी शिंदे सरकारवर टीका केली. केंद्रात गेली दहा वर्षे भाजपा सत्तेत आहे, मग हिंदू खतरे में आहे, असे म्हणण्याची पाळी का येते असा प्रश्न विचारला.

१०५ हुतात्म्यांनी रक्त सांडून मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली ती काही एका उद्योगपतीला विकण्यासाठी नाही... महिनाभराने आम्ही सत्तेवर आल्यावर प्रथम धारावीचे टेंडर रद्द करू अशीही त्यांनी घोषणा केली... शिवसेनाप्रमुख हयात असताना जे आक्रमक हिंदुत्व दिसायचे ते आता लोपले आहे. काँग्रेसशी साथ-संगत केल्यापासून तमाम माज्या हिंदू बांधवांनो व भगिनींनो व मातांनो हे शब्द विरले आहेत. शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर हे सरकार टिकणार नाही, पन्नास खोके व एकदम ओके अशा घोषणा देऊन ठाकरे आणि मंडळींनी शिंदे गटाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

पण सव्वादोन वर्षे झाली, विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजायला आले तरी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या सिंहासनाला कोणीही धक्का लावू शकलेले नाही. त्यांच्या कारभारावर मोदी-शहा एकदम खूश आहेत, याची प्रचिती वारंवार येते.

मला हलक्यात घेऊ नका, मी महाआघाडी उद्ध्वस्त केली आहे, हा शिंदेंचा इशारा समझने वालों को काफी हैं... दोन कोटी लाभार्थी बहिणी हेच महायुती सरकारचे मोठे आधारकार्ड आहे. मुख्यमंत्र्यांच्या शब्दांत लाडक्या बहिणीच महायुतीच्या ब्रँड ॲम्बॅसिडर आहेत.

शेवटी शेवटी मुंबईच्या प्रवेश द्वारावरील मुलुंड, ऐरोली, वाशी, दहिसर येथील पाच टोलनाक्यांवर लहान वाहनांना टोल रद्द करण्याचा घेतलेला निर्णय महामुंबईतील जनतेला व मुंबईत मोटारींने येणाऱ्या लोकांना मोठा दिलासा देणारा ठरला आहे. राजकीय संघर्षाच्या ठिणग्या आता वेगाने उडू लागल्यात तरी महायुती व महाआघाडी या दोघांनीही मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण हे जाहीर केलेले नाही, इथेच खरी गोम आहे...

मराठी मतदार भाजपा, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार), तसेच काँग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी (शरद पवार) अशा सहा पक्षांत विभागलेला आहे. शिवाय मनोज जरांगे, लक्ष्मण हाके, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, महादेव जानकर, राजू शेट्टी अशी नेते मंडळी मराठी मते खेचून घेणार आहेतच.

या निवडणुकीत बंडखोरीला उधाण येणार हे निश्चित. कारण कोणी पुढील पाच वर्षे थांबायला तयार नाही. महत्त्वाचे म्हणजे पक्षाचे निवडून येणारे आमदारही नंतर सत्तेसाठी उद्या कोणाबरोबर जातील याची शाश्वती नाही. पक्ष फुटीनंतर कोणी कोर्टात गेले तरी कधी निकाल लागेल हे कोणी सांगू शकणार नाही.

●●●●●●●●●

# भारत - कॅनडा तणावाला ट्रूडोच जबाबदार

कॅनडा आणि भारताचे संबंध कमालीचे तणावग्रस्त बनले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी खलिस्तान फुटीरतावादी नेते हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा आरोप केला इतकेच नाही तर भारतीय दूतावासातील उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांचा या हत्येशी थेट संबंध जोडण्याचा प्रयत्न केला.

-------------



कॅनडातील एकंदर परिस्थिती पाहून भारताने कॅनडा मधील आपल्या अधिकाऱ्यांना माघारी बोलावून नवी दिल्लीतील कॅनडाच्या उच्चायुक्त कार्यालयातील सहा अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. कॅनडाने मागील वर्षीच हरदिपसिंग निज्जर याचा हत्येत भारताचा हात असल्याचा आरोप केला होता तेंव्हाच हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा कोणताही हात नाही असे भारतीय परराष्ट्र खात्याने सांगितले होते.

त्यानंतर काही काळ गप्प बसलेल्या ट्रुडो यांनी पुन्हा तीच खेळी करत नव्हे त्याही पेक्षा पुढची खेळी करीत ही कारवाई केली. कॅनडाच्या या कारवाई नंतर भारतानेही कॅनडाच्या सहा वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करून जशास तसे उत्तर दिले. या घटनेनंतर दोन्ही देशातील तणाव कमालीचा वाढला आहे आणि याला सर्वस्वी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो हेच जबाबदार आहे.

खलिस्तान या फुटीरतावादी संघटनेवर भारताने बंदी घातली आहे मात्र कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. याच संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवून आणली आहे. भारतापासून अलग होऊन स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे.

१९८० च्या दशकात ही संघटना खूप आक्रमक होती. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे म्हणून भारताने तिच्यावर बंदी घातली मात्र आजही या फुटीरतावादी संघटनेचे काम चालूच आहे. या संघटनेला परदेशातून विशेषतः कॅनडा या देशातून आर्थिक आणि सामरिक मदत मिळते. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा पासूनच कॅनडामधून त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती.

आज ४० वषानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक मंत्र्यांचा समावेश आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

अमृतपाल सिंग या खलिस्तानी अतिरेक्याला भारताने अटक केल्यावर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडामध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रुडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रुडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर मागील वर्षी टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले.

ट्रुडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध केला मात्र भारताच्या निषेधाकडे ट्रूडो यांनी दुर्लक्ष करत खलिस्तानला समर्थन देणे चालूच ठेवले. ट्रुडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घेऊन कॅनडाला खडसावले. त्यामुळेच जस्टीन ट्रूडो यांनी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे भांडवल करून भारताशी पंगा घेतला आहे.

अर्थात कॅनडा हे एकट्याच्या जोरावर करत नाही हे उघड आहे कॅनडाला काही देशांचा छुपा पाठिंबा आहे. पाकिस्ताननेही या वादात उडी घेऊन कॅनडा ला पाठिंबा दिला आहे. सातत्याने हा वाद उकरून कढण्यामागे जस्टिन ट्रूडो यांचा राजकीय स्वार्थ आहे पुढील वर्षी कॅनडात निवडणुका होणार असून ट्रूडो हे पुन्हा निवडणुकीस उभे राहणार आहे. मात्र परिस्थिती त्यांना अनुकूल नाही.

बेरोजगारी, महागाई यामुळे त्यांच्या विषयी तेथील नागरिकात प्रचंड नाराजी आहे निवडणूक पूर्व सर्व्हेक्षणात त्यांच्या पक्षाची पिछेहाट दिसत आहे त्यामुळे कॅनडात असलेल्या साडे सात लाख शीख नागरिकांची मते आपल्या बाजूने वळावित यासाठी त्यांनी पुन्हा हा वाद उकरून काढला आहे. वास्तविक या हत्येमागे भारताचा हात नाही असे भारताने स्पष्ट केले असतानाही ट्रूडो यावरून भारताशी वारंवार वाद उकरून काढत आहे. वास्तविक खलिस्तान ही फुटीरतावादी संघटना आहे ती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देते आहे. जोवर कॅनडा फुटीरतावाद्याना समर्थन आणि पाठबळ देणे थांबवत नाही तोवर दोन्ही देशातील संबंध पूर्ववत होणार नाही अशी भारताने ठोस भूमिका भारताने घ्यायला हवी इतकेच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील हा मुद्दा उचलून धरायला हवा.

●●●●●●●●●

### मतदारांना विकत घेण्याचा युतीचा प्रयोग



पुढील महिन्यात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होतील व त्या सध्याच्या भ्रष्ट तसेच घटनाबाह सरकारविरुद्ध ईर्षेने लढवल्या जातील. महाराष्ट्र राज्याची इभ्रत ईरेला लागली आहे, राज्यात सत्तांतर घडविण्यासाठीच या निवडणुका होत आहेत. हा लढा जिंकू किंवा मरू असाच आहे, पण हरण्याचे नावच नको. लढू आणि जिंकू. जिंकावेच लागेल!

■ उद्धव ठाकरे

### तर मी आमदार झाले असते



मानकरांना शहराध्यक्ष पद देताना मी भगिनी म्हणून त्यांच्या पाठीशी उभे होते, पण त्यांनी असे का केले मला माहीत नाही, . राष्ट्रवादीच्या कोट्यात तीन जागा असत्या तर मी आमदार झाले असते, राज्यपाल नियुक्त आमदारांच्या कोट्यात आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तीन जागा आल्या असत्या, तर महिला म्हणून मला आमदारकी मिळाली असती.

■ रूपाली चाकणकर

# दातांवरील पिवळेपणा दूर करण्याचे घरगुती उपाय




पांढरे स्वच्छ असणारे दात सर्वांना चांगले वाटतात. परंतु अनेक वेळा पिवळे दात होतात. खाण्या पिण्याच्या अनेक सवयीमुळे दात पिवळे पडतात. तसेच स्मोकिंग, तंबाकू आणि मसालेद्वार खाल्यामुळे दात पिवळे होतात. अनेक वेळा ब्रश करुनही दातांचा पिवळेपणा जात नाही.

पिवळे दात स्वच्छ करण्यासाठी डेंटिस्टकडे जाऊन दातांचे क्लीनिंग करता येते. परंतु प्रत्येक वेळा डेंटिस्टकडे जाणे शक्य नसते. त्यामुळे काही घरगुती उपाय करुन दातांचा पिवळेपणा नाहीसा करता येतो.

पिवळे दात स्वच्छ करण्यासाठी एप्पल सायडर विनेगरचा वापर करता येतो. त्यासाठी दोन चमचे एप्पल सायडर विनेगर एक कप पाण्यात मिसळून माउथवॉश बनवा. त्यानंतर 30 तो घोळ तोंडात ठेऊन ब्रश करुन गुळणे करा. परंतु हे करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

पिवळे दात स्वच्छ करण्यासाठी आणखी एक पर्याय आहे. लिंबू, संत्रा आणि केळीच्या सालीचाही वापर करू शकता. यामुळे तुमच्या दातांवर जमा झालेला पिवळा थर साफ होण्यास मदत होऊ शकते.



सालींमध्ये असलेले डी-लिमोनिन किंवा सायट्रिक ॲसिड हे कंपाऊंड तुमचे दात पांढरे करण्यास मदत करते. तुमचे दात स्वच्छ करण्यासाठी, ही साले तुमच्या दातांवर २ मिनिटे हलक्या हाताने घासून घासून घ्या.

ब्रशवर हळद टाकून २ मिनिटे ब्रश करा, त्याचाही तुमच्या दातांना फायदा होईल. ब्रशसंदर्भात काही गोष्टी लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे, जसे की तुम्ही दर ३ महिन्यांनी तुमचा टूथब्रश बदलणे गरजेचे आहे.

●●●●●●●●●

## अशोकायन

### परतीचा पाऊस

परतीच्या पावसानं
भलताच केला कहर
त्रासापायी बळीला
घ्या वाटते जहर ...

कपाशीचे बोंड
जागीच सडले
सोयाबीनला ही
कोंब फुटले ...

आम्ही तुझे आश्रीत
तूच आमचा दाता
सांग निसर्गा कुणाकडे
व्यथा सांगावी आता?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आत्मसात करून समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे वाहक व्हा डॉ. पुरुषोत्तम पाळेकर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याची समाजाला खरी गरज वक्तृत्व स्पर्धेतील स्पर्धकांचा सुर

■ **महासागर प्रतिनिधी, गुरुकुंज मोझरी दि. १७ :**
आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची समजाला खऱ्या अर्थाने गरज आहे.इंटरनेट मोबाईलच्या युगात सर्वांचेच वाचन कमी झाले आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या विपूल साहित्य संपदेत विद्यार्थ्यांना जिवनात यशस्वी होण्याचा राजमार्ग दाखविला आहे.वर्क्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांची वैचारीक बैठक पक्की होण्यास मौलिक मदत होते.महाविद्यालयीन युवकांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांपासुन प्रेरणा घेवुन व विचार आत्मसात करुन समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे वाहक व्हावे असे प्रतिपादन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे आरोग्य विश्वस्त प्रमुख व महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलचे माजी अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम पाळेकर यांनी केले. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होते. ते पुढे बोलतांना म्हणाले की, सन१९८९ मध्ये नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. दादासाहेब काळमेघ यांनी राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेचा समावेश असावा अशी संकल्पना मांडली होती तेव्हापासुन म्हणजे ३५ वर्षापासून आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा अविरत सुरु असुन त्याचा मला मनस्वी आनंद आहे. असेही बोलतांना ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय आकोटचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे बोलतांना म्हणाले की वक्तृत्व स्पर्धेत हरणे व जिंकणे हा भाग महत्वाचा नसून नेतृत्व गुणांच्या विकासासाठी पुण्यतिथी महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व्यासपीठ लाभणे हीच मोठी बाब आहे.



# गेमचेंजर ठरणाऱ्या मारेगावला प्रतिनिधित्व करण्याची संधी द्या



■ **महासागर प्रतिनिधी, मारेगाव दि. १७ :**
वणी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या तीन तालुक्यापैकी मारेगाव तालुक्याला आतापर्यंत कधीही आमदार देण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळे मारेगाव तालुक्यातील इच्छुक उमेदवारांना, वणी विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार तरी कधी ? असा प्रश्न तालुका वासीयांकडून उपस्थित केला जात आहे. आगामी काळात होवू घातलेल्या वणी विधानसभेसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेल्या पक्षांच्या काही इच्छुकांनी दावेदारी दाखल केली आहे. मात्र दरवेळीप्रमाणे यंदाही त्यांच्या नशीबी निराशा येणार की, त्यांना संधी मिळणार याकडे तालुक्याचे लक्ष राहणार आहे. विकासापासून कोसोदूर असलेल्या आदिवासी बहुल मारेगाव तालुक्यातील इच्छुक उमेदवारांना यावेळी वणी विधानसभेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी अशा आशयाची मागणी तालुकावासियांकडून जोर धरत आहे. १९५२ ते २०१९ या कालावधीत पार पडलेल्या वणी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत आजपर्यंत मतदारसंघात येणाऱ्या तीन तालुक्यांपैकी केवळ वणी आणि झरी या दोन तालुक्यातीलच उमेदवारांना विधानसभेचे प्रतिनिधित्व मिळाले आहे. परंतू मारेगाव तालुक्यात कुशल नेतृत्व असताना सुद्धा गेल्या वर्षांपासून विधानसभेच्या उमेदवारीपासून मारेगाव तालुका हा वंचित राहिल्याचे दिसत आहे. नत्थूजी किन्हेकार, नरेंद ठाकरे, नानाजी खंडाळकर, जीवन पाटील कापसे यांच्यासारखे अनेक नेते तालुक्याला लाभले. मात्र पक्षांनी त्या काळात तालुक्याकडे पाठ फिरवून विधानसभेवर कुणालाही पाठवले नाही. यावेळी देखील तालुक्यातील काही कुशल नेतृत्वांनी वेगवेगळ्या पक्षांकडून विधानसभा लढण्याची तयारी दर्शवली आहे. विकासापासून कोसोदूर असलेल्या आदिवासी बहुल मारेगाव तालुक्याला यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेल्या पक्षांनी संधी देवून तालुक्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी मागणी तालुकावासीय करीत आहेत.

# स्वीकारात्मकता हीच सुखी जीवनाची गुरुकिल्ली

## डॉ. नंदू मुलमुले ; बाबूजी देशमुख वाचनालय व्याख्यानमाला



■ **महासागर प्रतिनिधी, अकोला दि. १७ :**
आयुष्य हे एक पॅकेज आहे. चार आवडत्या गोष्टी त्यात राहणार, तर दोन नावडत्या. आपल्याला वास्तविकतेचा स्वीकार करावाच लागेल. कर्म करत राहा व जीवन प्रवासाचा आनंद घ्या. समाधानी आयुष्यासाठी फक्त सकारात्मकता नाहीतर स्वीकारात्मकता ही गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन मानसोपचारतज्ञ डॉ. नंदू मुलमुले यांनी केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या व्याख्यानमालेत मानसोपचारतज्ञ डॉ. नंदू मुलमुले यांनी सुखाचा शोध' विषयावर बुधवारी तिसरे पुष्प गुंफले. अध्यक्षस्थानी महादेवराव भुईभार होते. डॉ. मुलमुले म्हणाले, गतिमान जीवनशैलीत मानसिक वेगाने वाढत आहे. शारीरिक, मानसिक धोके आपल्या जीवनात निर्माण होत आहेत. अशा धोक्यांतून मार्ग काढून सुखाचा शाश्वत शोध घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. चांगल्या गोष्टी स्वीकारणे ही सुद्धा एक कला असल्याचे त्यांनी सांगितले. जीवनात वाटचाल करत असताना कमी महत्वाकांक्षा बाळगा, क्षमाशील व्हा, विवेकशील व्हा, जीवनाला विनोदाची झालर असू द्या, आयुष्यासोबत प्रेम असू द्या, चेहऱ्यावर हास्य सदा फुलवित जा, आयुष्य हे निसर्गासारखे असू द्या, निसर्ग नियमाचे पालन करा, ही यशस्वी जीवनाची फलश्रुती असल्याचे अनेक उदाहरणावरून वक्त्यांनी स्पष्ट केले. वक्ता परिचय ज्येष्ठ कविवर्य नारायण कुलकर्णी कवठेकर यांनी दिला. आभार सचिव अनुराग मिश्र यांनी मानले. जागतिक आरोग्य संघटनेने हॅपीनेस इंडेक्स जाहीर केला. या इंडेक्समध्ये अन्न, वस्त्र, निवारा, हाताला काम, आयुष्याला अर्थपूर्णता तथा मधूर नातेसंबंध ही सूत्रे दिली आहेत.


# PUBLIC NOTICE

Our Public Charitable Trust, United Church of Northern India Trust Association (UCNITA), is registered under the Mumbai Public Trust Act, 1950 bearing Registration No. D-97(MUM) and is also registered as a Company bearing Registration No. 2912 of 1938-1939 having its Registered Office at Omega Building, 19 August Kranti Marg, Nana Chowk, Mumbai 400 007 is desirous to develop the property bearing Khasra No. 176/1, City Survey No. 1678, Sheet No. (29)36 admeasuring 5085.10 Sq. Mtrs. In which dilapidated Bungalow is situated commonly known as Principal's Bungalow situated at 41, Red Cross Road, Civil Lines, Nagpur on an **"as is where is"** basis.

The said property has been encroached by various persons and a third party interest has been created in this property of Mr. Rajiv Choudhary, M/s George Developers M/s Rohit Iron and Steel (1) Pvt. Ltd. and others if any.

The United Church of Northern India Trust Association (UCNITA), a Trust, wants to develop this property on an **"as is where is basis"** on the following terms and conditions:

**I.** The Developer/Builder shall give an Interest Free Security Deposit of Rs. 3 Crores to UCNITA Trust at the time accepting the Tender.

**ii.** The said Interest Free Security Deposit will be refunded or adjusted after getting the possession of UCNITA share along with Completion Certificate issued by the Nagpur Municipal Corporation of the commercial/residential building.

**iii.** The UCNITA will retain 35% commercially cum residentially developed property free of cost against the lease of 65% Built Up area which shall be completed within 24 to 36 months from the date of sanction from the Charity Commissioner, Mumbai.

**iv.** The possession of the said property shall be handed over to the Builder/Developer after the sanction of the order of the Charity Commissioner, Mumbai u/s 36(a) of the Mumbai Public Trust Act, 1950.

**v.** The UCNITA shall have a liberty to take 35% of the commercially cum residentially developed property or to take the consideration as per the then existing market rate from the prospective Builder/Developer.

**v.** The UCNITA shall have a liberty to take 35% of the commercially cum residentially developed property or to take the consideration as per the then existing market rate from the prospective Builder/Developer.

**vi.** It shall be the responsibility of the proposed Builder/Developer to settle the matter amicably with Mr. Rajiv Chaudhary, M/s George Developers, M/s Rohit Iron and Steel (1) Pvt. Ltd. and others, if any and to clear all encroachments, make settlement with occupants, to pay the existing taxes, development charges and all other outgoing expenses on behalf of the UCNITA.

**vii.** An Annual Lease Rent will be paid for the 65% Built Up area by the proposed Builder/Developer @ Rs2/- per Sq. Ft.

**viii.** The prospective Builder/Developer shall be responsible and liable to take care of the Court cases of the said property, if any exist or arises in future.

**ix.** In case of refusal of permission by the Charity Commissioner, Mumbai, the Interest Free Security Deposit of Rs. 3 Crores will be refunded without interest with no question asked.

**X.** All the expenses for Stamp Duty, Registration Fees, Legal Charges, Advocate Fees, Zone Conversion Charges, sanctioning of plans, RERA permissions, Architect Fees, Consultancy charges, construction and or development charges and all or any expenses imposed by the Government or Semi Public, Local Authorities, State Government, Central Government, department relating to the same shall be borne by the proposed Builder/Developer.

**xi.** All construction and development to be done as per standard specifications and as per the sanctioned plan of Nagpur Municipal Corporation.

**xii.** The Developer/Builder will construct the commercial/residential project as per sanctioned plan of the Nagpur Municipal Corporation only. The Trust shall not be held liable if the Developer/Promoter digresses from the sanctioned plan and the norms/laws of the Nagpur Municipal Corporation.

**xiii.** All permissions will be applied for by the UCNITA or its authorised Trustee. However, the proposed Builder/Developer will assist the UCNITA to obtain the necessary permissions.

**xiv.** Any additional FSI will belong to the UCNITA only.

**xv.** Breach of any conditions would result in forfeiture of 20% of the total Interest Free Security Deposit.

**xvi.** The Demand Draft of Rs. 3 Crores given along with the sealed offer shall be returned within 15 working days of the rejected proposals.

**xvii.** Incomplete tender/late tenders/tenders not accompanied by the requisite Demand Draft are liable to be rejected.

**xviii.** Tenders with conditional offer will be treated as invalid.

**xix.** Tender forms can be obtained from the Registered Office of the UCNITA within a period of 10 working days from the publication of the Public Notice between 11 a.m. to 13:00

**xx.** The cost of Tender form will be Rs. 25,000/- (Rupees Twenty Five Thousand Only) (non-refundable) per form which will be paid by Demand Draft in favour of UCNITA

**xxi.** All offers along with the said Demand Draft of Rs. 3 Crores be sent to UCNITA at the Registered Office of UCNITA, Omega Building, 19 August Kranti Marg, Mumbai 400 007 by Registered Post / Speed Post on or before 5:00 p.m. on after which no offers will be accepted at all.

**xxii.** Tender Forms will be opened at the Registered Office of UCNITA, Omega Building, 19 August Kranti Marg, Mumbai 400 007 within a period of 15 (fifteen) days after receiving the offers/bids.

**xxiii.** Interested persons and / or parties / Builders / Developers / Promoters are invited to send their sealed offers along with a Demand Draft of Rs. 3 Crores in favour of "United Church of Northern India Trust Association" at the Registered Office, Omega Building, 19 August Kranti Marg, Mumbai 400 007

**xxiv.** The Committee of Management of UCNITA reserves the right to reject any offers without assigning any reasons whatsoever.

**xxv.** All the terms shall always be subject to the approval of the Hon. Charity Commissioner, Mumbai

The above notice is being published as per the requirement of the Mumbai Public Trust Act, 1950.

**MR. NITIN LAWRENCE**
Trustee, UCNITA
**PHONE : 7828133333**
(Between 11.00 a.m. to 13.00)



**Shri Vitthal Bahudeshiya Shikshan Santha Nagpur**
**Late Kisanji Tagde Mahavidyalaya Sawargaon**
**Tah.Narkhed Dist.Nagpur (Code-1253)**

**WANTED**

| Sr. No | Department | Post | Quantity | Qualifiention |
|---|---|---|---|---|
| 1 | B.A (Civil Services) | Principal | 01 | M.A. P.H.D |
| | | Librariyan | 01 | M.Lib |
| | | Physical Teacher | 01 | M.P.Ed |
| | | Sanskrit | 01 | M.A.Net/Set |
| | | English | 01 | M.A.Eng Net/Set |
| | | Nagrik Seva Genral Study 1,2 | 01 | M.A. Net/Set |
| | | History | 01 | M.A. His Net/Set |
| | | Marathi | 01 | M.A. Marathi Net/Set |
| 2 | B.Com | Commerce | 02 | M.Com Net/Set |

1) The Online Application submitted on email befor 25/10/2024
2) Date of interview will be decided by selection committee
3) Application send on sktcollege22gmail.com
4) Contact No - 7447671456

President
Shri Tukaramji Tagde


## कार्यालय, कांद्री (कन्हान) नगर पंचायत

क्रमांक/आस्था/न.पं.–कांद्री (कन्हान)/कावि–३१५२/२०२४ दिनांक : १७/१०/२०२४

या सुचनाद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, खालील दर्शविल्यानुसार घर/प्लॉट क्र. वर नाव दाखल करण्याकरिता अर्जदार संबंधित घराचे कागदपत्र तसेच तहसील कार्यालय नझुल कार्यालयाचे रेकॉर्ड अर्जासह सादर केलेले आहे. नगर पंचायत रेकॉर्डनुसार घर/प्लॉट क्र. वर खालील दर्शविल्याप्रमाणे नावाची नोंद आहे. तरि कुणास नाव दाखल खारीज करणेविषयी आक्षेप असल्यास त्यांनी हि सूचना प्रसिध्दी झाल्यापासून ०७ दिवसाचे आत कांद्री (कन्हान) नगर पंचायत कार्यालयातील कर विभाग येथे लेखी आक्षेप व सोबत संबंधित कराची कागदपत्रे सादर करावे अन्यथा नगरपंचायत रेकॉर्डमध्ये संबंधित घर क्रमांकावर नाव दाखल करण्यात येईल.

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | प्र.क्र. | जुन्या स्थानावर मालमत्ता धारकाचे नाव (विकणारा) | नवीन स्थाना ब वर मालमत्ता धारकाचे नाव (खरेदीदार) | फेरफार घेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २४५/८२ | ५ | अभिषेक विनोद हरडे | कमलेश बिहारीलाल सुर्यवंशी | विक्री पत्र |
| २ | २५६/१/अ | ५ | रमेश कृष्णाजी चकोले | साहींद्र शंकर गायकवाड | विक्री पत्र |
| ३ | १५९ | ३ | गिता,द्वारकाप्रसाद महादेव भुते/ सुशिला, राजेन्द्र नामदेव भुते/ संगीता शिवाजी सावरकर, संध्या राजकुमार आकरे | राजेन्द्र नामदेव भुते | हक्क सोडल्याचा लेख |
| ४ | २८२/२/६७ | १ | जावेद अहमद एकराम अली | हमीदन निसा शौकत अली अंसारी | विक्री पत्र |
| ५ | २४५/१,२ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | शिवपुजन बिहारीलाल सुर्यवंशी | विक्री पत्र |
| ६ | ४३/२/१३ | ४ | समतुल निशा मंजुर अली खान | विजयशंकर मातादिन सिंह | विक्री पत्र |
| ७ | २४०/३० | ५ | प्रविण बसंत अग्रवाल व इतर | संजय महादेव कुंभलकर | विक्री पत्र |
| ८ | २४५/३० | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | इशाद मेहबुब पटेल गुलाबशा आफ्रीन गफ्फुर शेख | विक्री पत्र |
| ९ | २४५/२९ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | इशाद मेहबुब पटेल गुलाबशा आफ्रीन गफ्फुर शेख | विक्री पत्र |
| १० | २४५/३१ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | इशाद मेहबुब पटेल गुलाबशा आफ्रीन गफ्फुर शेख | विक्री पत्र |
| ११ | २८८/२,३/१४९ | १ | देवेन्द्र चंद्रकांत बोकडे व इतर | मोनुप्रसाद लक्ष्मीचंद केशरवानी | आम मुख्त्यारपत्र |
| १२ | २५२/१/२९ | ६ | आशिष पांडुरंग करंडे | विजय देवचंद चकोले | विक्री पत्र |
| १३ | २८८/२,३/३ | १ | शमा सदाम खान, नजमा मेमुल खान, रुबीना युसुफ खान, | तारा युसुफ खान, शबनम युसुफ खान,यासीन युसुफ खान | हक्क सोडल्याचा लेख |
| १४ | २६३/२७ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | बबन गुलाबराव धोटे | विक्री पत्र |
| १५ | ३११/४/१० | | केशव महादेव पोटभरे व इतर | शंकर शामराव रोकडे | विक्री पत्र |
| १६ | २५५/१/४६ | ६ | सुनिल कृष्णराव चिखले | धारा बाबुलाल गायकवाड व इतर | विक्री पत्र |
| १७ | ५८३/२५ | ५ | रामकृपाल बाबुलाल नायक | शिवप्यारी शिवबरन प्रजापती | विक्री पत्र |
| १८ | २५७/४/५५ | ६ | श्यामलाल चांदबली सिंग | ताराचंद लिंगाजी सोनवाने | विक्री पत्र |
| १९ | २२३/२१ | ५ | रघुनाथ गणेश वाडीभस्मे | अशोक श्रावण कुंभलकर | विक्री पत्र |
| २० | २२०/१/२२ | ५ | शशांकशेखर भुपेन्द्रनाथ सिंह | हकीक हबीब अहमद | विक्री पत्र |
| २१ | २२०/१/२२ | ५ | मोहन करण यादव तर्फे सुशीला मोहन यादव | शशांकशेखर भुपेन्द्रनाथ सिंह | विक्री पत्र |
| २२ | २६०/४१ | ६ | बींबीसार मांगोजी गजभिये | चंद्रकला बींबीसार गजभिये व इतर | मृ.दा.वा.प्रति. |
| २३ | २४५/७० | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | सरला नंदकिशोर श्रीरामे | विक्री पत्र |
| २४ | २५५/१/५३ | ६ | सुमन बाबुराव शेंदरे | सुनिता राममुरत मिश्रा व इतर | विक्री पत्र |
| २५ | २५५/३/८१ | ६ | रत्नप्रभा रोशन बानवा | प्रिती प्रशांत वावरकर | विक्री पत्र |
| २६ | २६३/१३ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | विरेन्द्र भागी सिंह | विक्री पत्र |
| २७ | २१८/२/२ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | सोनाली धनराज चकोले | विक्री पत्र |
| २८ | २१८/२/१ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | सोनाली धनराज चकोले | विक्री पत्र |
| २९ | २६३/१५ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | अमरजीत सकलदिप भारती | विक्री पत्र |
| ३० | ४६/४,५/८बी | ४ | मिनहाज अहमद मो. हमीद अली | विश्वजीत पद्मनारायण मिश्रा | विक्री पत्र |
| ३१ | ३११/१/ई/ड/७ | २ | सारंगधर केशवराव चौकसे व इतर | हिरालाल छेदीलाल कोठार | विक्री पत्र |
| ३२ | १२८/१/ब/३४ | ५ | पवन रमेश इंगोले व इतर | ईशताक अब्दुल नबी शेख | विक्री पत्र |
| ३३ | ५७/२/९/ब | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | राहुल सुधाकरराव बोडखे | विक्री पत्र |
| ३४ | ५७/२/९/अ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | असीम रमेश कपूर | विक्री पत्र |
| ३५ | ५७/२/१०/ब | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | भूषण रमेश कपूर | विक्री पत्र |
| ३६ | ५७/२/६ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | जोत्स्ना मनोज वैद्य | विक्री पत्र |
| ३७ | ५७/२/१०/अ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | खुशाल कोठीराम पाटील | विक्री पत्र |
| ३८ | ५७/२/२८ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | जोत्स्ना मनोज वैद्य | विक्री पत्र |
| ३९ | ५७/२/२ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | रेखा प्रभाकर कुंभलकर | विक्री पत्र |
| ४० | ५७/२/१६,१७,१८ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | आशिमा कमलेश वासनिक | विक्री पत्र |
| ४१ | ५७/२/२२ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर जोत्स्ना मनोज वैद्य | प्रभाकर यादवराव कुंभलकर | विक्री पत्र |
| ४२ | ५७/२/३३ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | रश्मी राज कमल पाठक | विक्री पत्र |
| ४३ | ५७/२/३५ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | दीपिका रमेश अंबाडकर उर्फ दीपिका ऋषी दुबे | विक्री पत्र |
| ४४ | ५७/२/१९ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | सचिनकुमार तीलकचंद जगणे | विक्री पत्र |
| ४५ | ५७/२/३२ | ५ | प्रभाकर यादवराव कुंभलकर | प्रमिला बलदेव दुबे | विक्री पत्र |
| ४६ | २६८/३५ | ५ | जयचंद इंद्रपाल गुप्ता | कुष्णाबाई जयचंद गुप्ता | मृ.दा.वा.प्रति. |
| ४७ | २७८/३ए/४ए | ५ | शामरावजी रामाजी गिरडकर | राजेन्द्र नामदेवराव हटवार | विक्री पत्र |
| ४८ | १८३ | ३ | गोविंदा डोमा सरोदे | शामराव गोविंदा सरोदे | मृ.दा.वा.प्रति . |
| ४९ | २२२/१/८५ | ५ | तारकेश्वर गुचान यादव व इतर | निर्मला मिश्री सिंह व इतर | विक्री पत्र |
| ५० | ४६/४,५/३०/ए | ४ | राजकुमारी राममनसिंग ठाकुर | सुशीला भैयाराम पाल | विक्री पत्र |
| ५१ | २५६/१,२/५० | ६ | बंडु मोकिंदराव गायकवाड | रिता सुरेश भोस्कर | विक्री पत्र |
| ५२ | २२०/१९ | ५ | नर्मदा रामलोचन यादव | मोनिका नर्मदा यादव | मृ.दा.वा.प्रति |
| ५३ | २२२/१/२९ | ५ | नलीनी अर्जुन मेश्राम | प्रशांत अर्जुन मेश्राम व इतर | मृ.दा.वा.प्रति |
| ५४ | २५५/३/८ | ६ | दुर्गेश दुष्यंत दुबे | सुरेखा नरेश तडसे | विक्री पत्र |
| ५५ | २७४/१/२० | ६ | सुरज विनायक बर्वे व इतर | सुमन अंजेश कुमार गोंड | विक्री पत्र |
| ५६ | २४५/४९ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | साहिल अरुण वाघ | विक्री पत्र |
| ५७ | २१९/३,४/४५ | ५ | शांताबाई आनंदराव वानखेडे | मोहन आनंदराव वानखेडे | विक्री पत्र |
| ५८ | २५२/४,५/५६ | ६ | अनुराधा विजयकुमार कालरा | स्वरनसिंग रोशनसिंग मेहनास | विक्री पत्र |
| ५९ | २५५/३/९२ | ६ | प्रमिला भोलाराम पुंडे | वैशाली दुरवास केकतपुरे | विक्री पत्र |
| ६० | २२०/४ब, २२०/२ | २ | मधुकर महादेव पोटभरेच | सत्यफुला मधुरकर पोटभरे व इतर | मृ.दा.वा.प्रति |
| ६१ | ४४५/४४६/१८/२ ४४५/१८+१९/ए | १ | लहानु गोपाळराव पोटभरे व इतर | अशोक लहानु पोटभरे व इतर | मृ.दा.वा.प्रति |
| ६२ | २४५/५८ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | निता बाबुराव उके | विक्री पत्र |
| ६३ | २५२/१/८५ | ६ | राजेश शंकरराव माहुरकर | शेखर बाबुराव करंडे | विक्री पत्र |
| ६४ | २१९/३,४/२२ | ५ | सोमा रामाजी वानखेडे | गोलु शिवलाल यादव | विक्री पत्र |
| ६५ | २५२/१/५२ | ६ | सचिनकुमार लीलाराम रोकडे | अनिल गंगाधरजर तडसे | विक्री पत्र |
| ६६ | २६७/१,२/३ | ६ | सौरभ विनोद गुप्ता व इतर | सुधाकर पांडुरंग तलमले | विक्री पत्र |
| ६७ | २६७/१,२/४ | ६ | सौरभ विनोद गुप्ता व इतर | सुधाकर पांडुरंग तलमले | विक्री पत्र |
| ६८ | २४१/१/३२+३३ | ६ | वंदना प्रविण अग्रवाल व इतर | मोरेश्वर गोपिचंद बर्वे | विक्री पत्र |
| ६९ | २४१/१/४+५ | ६ | वंदना प्रविण अग्रवाल व इतर | मोरेश्वर गोपिचंद बर्वे | विक्री पत्र |
| ७० | २४५/२० | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | मंगेश चरणदास मनगटे | विक्री पत्र |
| ७१ | २४५/१९ | ५ | अभिषेक विनोद हरडे व इतर | शांती मंगेश मनगटे | विक्री पत्र |
| ७२ | ५६८/२०/ए/अ | ५ | रतन हरिशंकर यादव | सौरभ रतन यादव | विक्री पत्र |
| ७३ | २५७/६ | ६ | श्रावण दशरथ मस्के व इतर | प्रमोद शिलास वानखेडे | विक्री पत्र |
| ७४ | २५५/३/९१ | ६ | चंद्रकला चुन्नीलाल टेंभरे | मयुर मनोहर मेश्राम | विक्री पत्र |
| ७५ | ४४५/३बी | १ | एम.एम. तेवर | मुरुगत मलन तेवर | मृ.दा.वा.प्रति |
| ७६ | ४९२/१ | १ | बिरबल ढब्बु विश्वकर्मा | संजय सुमेरसिंग विश्वकर्मा | मृत्य लेख |
| ७७ | २६०/१४ | ५ | भिमराव मंसाराम पवार व इतर | राजु रामआसरे पांडे | विक्री पत्र |
| ७८ | २६०/१५ | ५ | भिमराव मंसाराम पवार व इतर | राजु रामआसरे पांडे | विक्री पत्र |
| ७९ | ३०१/४५ | ४ | लक्ष्मण झिटबाजी सरोदे | सरला श्रीनिवास यादव | विक्री पत्र |
| ८० | ३०१/४५ | ४ | लक्ष्मण झिटबाजी सरोदे व इतर | मुकेश श्रीनिवास यादव व इतर | मृ.दा.वा.प्रति |
| ८१ | ३०१/४५ | ४ | राजेश श्रीनिवास यादव व इतर | मेनका मुकेश यादव | विक्री पत्र |
| ८२ | २२३/२/७+८ | ५ | रघुनाथ गणेश वाडिभस्मे व इतर | कमलेश दुधनाथ गोस्वामी | विक्री पत्र |
| ८३ | ४३/२/१५ अ | ४ | यदुनंदनसिंग राममनसिंग ठाकुर | साजिया घिराउ शाह | विक्री पत्र |
| ८४ | २५७/७७ | ६ | प्रशांत रमेश भुते व इतर | इस्लाम अहमद सदरुद्दीन सिध्दीकी | विक्री पत्र |
| ८५ | २५५/१/२७ | ६ | अशोक चिंतामण पाटील | चंद्रावती अवधनारायण चौबे | विक्री पत्र |
| ८६ | २४९/१/९ | ५ | तबारक हुसैन घीसा खान | अमर रामपत सिंह | विक्री पत्र |
| ८७ | २१९/३,४/५५ | ५ | पुष्पाताई मोहन खांडेकर | नरेन्द्र मोहन खांडेकर व इतर | मृ.दा.वा.प्रति |
| ८८ | २६७/१/२/३० | ५ | सौरभ विनोद गुप्ता व इतर | बैसाकु गोकुल जनबंधू | विक्री पत्र |
| ८९ | २४१/१/ब/४९ | ६ | राजेश दशरथ देशपांडे | राधिका वीरेंद्र यादव | विक्री पत्र |

(सचिन गाढवे)
मुख्याधिकारी
नगर पंचायत कांद्री (कन्हान)

## थोडक्यात

### समीर वानखेडे राजकारणात

■ **मुंबई :** महाराष्ट्रातील राजकारणात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले प्रसिद्ध कक्र अधिकारी समीर वानखेडे राजकारणात उतरणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समीर वानखेडे हे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश होईल. समीर वानखेडे हे मुंबईतील धारावी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतात.

राजकारणात येण्यापूर्वी समीर वानखेडे यांना आयआरएस पदाचा राजीनामा द्यावा लागणार असून हा राजीनामा केंद्र सरकारच्या गृह विभागाला स्वीकारावा लागणार आहे. त्यानंतर राजकारणातील प्रवेशाचा मार्ग मोकळा होईल. ४४ वर्षीय समीर वानखेडे हे २००८ च्या बॅचचे आयआरएस इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस अधिकारी आहेत. २०२१ पर्यंत त्यांनी मुंबईतील नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे झोनल डायरेक्टर म्हणून काम केले. एनसीबीमध्ये रुजू होण्यापूर्वी वानखेडे यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि एअर इंटेलिजन्स युनिटमध्ये काम केले होते.

त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत, वानखेडे यांनी अमली पदार्थांच्या अंमलबजावणीशी संबंधित कायदा अंमलबजावणी संस्थांमध्ये विविध पदांवर काम केले आहे. समीर वानखेडे हे छापे, गुप्तचर कारवाया आणि अंमली पदार्थांचे तस्कर आणि त्यांच्या नेटवर्कला लक्ष्य करून गुप्त तपास करण्यात सक्रियपणे सहभागी आहेत. आपल्या १५ वर्षांच्या कारकिर्दीत १७,००० किलो अंमली पदार्थ आणि १६५ किलो सोने जप्त करण्याचे श्रेय त्यांना जाते.

### धारावीच्या ३७ एकरांवर ठाकरेंची नजर

**मुंबई :** उद्धव ठाकरे गटाला धारावी येथील नेचर पार्कचा ३७ एकरांचा भूखंड बळकवायचा असल्याचा गंभीर आरोप भाजप नेते आशिष शेलार यांनी गुरुवारी केला. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांचा उल्लेख निर्बुद्ध असा करत ते शहरी नक्षलवाद्यांचे प्रवक्ते असल्याचाही आरोप केला.

आशिष शेलार म्हणाले, ठाकरे कुटुंबाने मुंबईतील अनेक भूखंड बळकावलेत. आता त्यांची नजर धारावीमधील नेचर पार्कच्या ३७ एकरांचा भूखंडावर आहे. आपल्या दुसऱ्या मुलाचे निसर्ग व प्राणी प्रेम दाखवून त्यांना आपल्या घराजवळची ही जागा बळकावयाची आहे.


# सर्व ६ जागा भाजपा लढणार?

## नागपूर जिल्ह्यातील १२ मतदारसंघांपैकी शिंदे, अजित पवार गटाला मोजक्या जागा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, पुढील काही दिवसात उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात होणार आहे. राज्यात सत्ताधारी महायुती आणि प्रमुख विरोधी महाविकास आघाडी यातील कुणीही अद्याप उमेदवारांची घोषणा केली नसली तरी, दोन्ही गटातील विद्यमान आमदारांनी तयारी सुरू केली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जिल्हा म्हणून नागपूरकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. जिल्ह्यातील १२ पैकी बहुतेक मतदारसंघ भाजपाच्या वाट्याला येणार असून, महायुतीमधील शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या वाट्याला मोजक्या एकदोन जागा येणार असल्याचे समजते.



सद्यःस्थितीत नागपूर शहरातील ६ पैकी पूर्व, मध्य, दक्षिण आणि दक्षिण पश्चिम या चार मतदारसंघात अनुक्रमे कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, मोहन मते आणि देवेंद्र फडणवीस हे भाजपाचे आमदार आहेत. ग्रामिणमधून टेकचंद्र सावरकर (कामठी) आणि समीर मेघे (हिंगणा) येथेही भाजपाचे बस्तान आहे. गेल्यावेळी विकास ठाकरे (पश्चिम नागपूर) आणि डॉ. नितीन राऊत (उत्तर नागपूर) तसेच ग्रामिणमधून सुनील केदार (सावनेर) व राजू पारवे (उमरेड) या चार जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या. काटोलमधून राष्ट्रवादीचे अनिल देशमुख तर रामटेकमधून अपक्ष आशिष जयस्वाल विजयी झाले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी राजू पारवे शिंदे गटात गेले.

यावेळी भाजपा त्यांच्या काही विद्यमान आमदारांना नारळ देणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे, शिंदे गटाला रामटेक सोडण्यात आले असून, अजित पवार गटाचा तूर्तास विचार झाला नाही. निवडून येण्याची शक्यता लक्षात घेता, भाजपा नागपूर शहरातील सर्व ६ जागा लढणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# वरळीतआदित्य ठाकरेला भाजप, मनसेचे आव्हान



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ :**

विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून सर्वच पक्षांकडून उमेदवारांच्या चाचपणीला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे आमदार असलेल्या वरळी मतदारसंघातही भाजपकडून उमेदवारांची चाचपणी सुरू आहे.

अशात भाजप नेत्या शायना एनसी यांची आदित्य ठाकरेंविरोधात निवडणूक लढण्याची इच्छा असल्याची माहिती आहे. भाजपने शायना एनसी यांना तिकीट दिले तर वरळीत हायप्रोफाईल सामना पहायला मिळणार आहे. दुसरीकडे मनसेकडून अमित ठाकरे हे देखील वरळीतून निवडणूक लढवणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांनाही तिकीट मिळाल्यास आदित्य ठाकरे यांच्यासाठी ही विधानसभा टफ जाणार असल्याची शक्यता आहे.

वरळी विधानसभा मतदारसंघ ठाकरे गटाचा बालेकिल्ला मानला जातो. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे या मतदारसंघातून मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाले होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत उभी फूट पडली. त्यानंतर ठाकरे गटाचे या गटातील वजन कमी झाले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती आणि मनसे यांनीही वरळीतून उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. भाजप नेत्या शायना एनसी यांनी आदित्य ठाकरेंविरोधात निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भाजप नेते शायना एनसी यांना तिकीट देता का? हे पहावे लागणार आहे. भाजपने शायना यांची पूर्ण केल्यास वरळीमध्ये आदित्य ठाकरे विरुद्ध शायना एनसी यांच्या लढत होईल.

शायना एनसी या भाजपच्या नेत्या असून व्यवसायाने फॅशन डिझायनर देखील आहेत. तर शायना यांचे वडील नाना चूडासामा हे मुंबई शहराचे माजी शेरीफ होते.

दुसरीकडे, मनसेही यंदाच्या विधानसभा निवडणुकीला वरळी मतदारसंघात आपला उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. यंदा राज ठाकरे यांचे सुपुत्र आणि आदित्य ठाकरे यांचे चुलत भाऊ अमित ठाकरे हे वरळी विधानसभा लढवणार असल्याचे बोलले जात आहे. जर महायुती आणि मनसेने वरळी मतदारसंघात उमेदवार दिला तर आदित्य ठाकरेंसाठी यंदाची निवडणूक अवघड ठरणार आहे.

## जानकरांचा पहिला उमेदवार बारामतीतून?

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :**
राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर बारामतीत उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत. पहिल्या यादीत बारामतीच्या उमेदवाराचे नाव असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जानकर यांच्या पक्षाची १०० उमेदवारांची पहिली यादी जाहीर होऊ शकते. महादेव जानकर महायुतीतून बाहेर पडल्यानंतर त्यांनी निवडणुकीसाठी युतीविरोधातच दंड थोपटले आहेत.

महादेव जानकर यांना राज्यपाल नियुक्त यादीत विधान परिषदेवर वर्णी लावू, असे आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र आता या यादीत नाव नसल्याने जानकर नाराज झाले आहेत. त्यामुळे त्यांनी युती मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या आधी परभणी लोकसभा मतदारसंघातून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोट्यातून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर महादेव जानकर राज्यपाल नियुक्त कोट्यातून विधान परिषदेवर जाण्यास इच्छुक होते. त्यासाठी महायुतीने विचारात न घेतल्याने महादेव जानकर नाराज आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच राष्ट्रीय समाज पक्षाने भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीसोबत संबंध तोडले आहेत. रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी बुधवारी आपला पक्ष विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याची घोषणा केली. रासप राज्यातील सर्व २८८ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे.

## समृद्धीवर धावत्या ट्रकला कारची धडक, चालक ठार



■ **महासागर प्रतिनिधी, वाशिम, दि. १७ :**
कारंजा (लाड) : धावत्या ट्रकला भरधाव वेगात कारने मागील बाजूने भीषण धडक दिल्याची घटना पहाटे ६ वाजताच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील लोकेशन १८२ वर घडली.

या घटनेत चालक घटनास्थळी ठार झाला आहे. बळीराम ग्यानबा पिसे (२४, रा. शिवनी (पिसा ) ता. लोणार जि.बुलढाणा) असे मृतकाचे नाव आहे.

## भाजपच्या प्रचारासाठी संविधानाचा चुकीचा वापर



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**
लोकसभा निवडणुकीत भारतातील जनतेने मोदींचे बहुमत काढून टाकले. त्यावेळी संविधान वाचवण्याचा लढा आम्ही दिला होता. त्यामुळेच आता न्यायालयातील काहींनी न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टीत काढून टाकली असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

आता न्यायदेवता उघड्या डोळ्यांनी भ्रष्टाचार पाहणार आहे, अशा शब्दात त्यांनी निशाणा साधला. न्यायदेवतेच्या हातातील तलवार काढून संविधान देण्यात आले आहे. हा भाजपचा प्रचार असून, देशात सर्वात जास्त शिवसेनेवर अन्याय झाला आहे. गेल्या दहा वर्षात न्यायदेवता न्याय देत नाही, न्यायदेवतेच्या हातात संविधान देणे हा आरएसएसचा अजेंडा आहे, सर्वांना समान न्याय देण्यासाठी न्याय देवतेच्या हातामध्ये तलवार देण्यात आली होती. मात्र, आता गेल्या दहा वर्षात देशात न्याय होत नसल्याने तलवार काढून टाकण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

## महाराष्ट्राच्या भीषण परिस्थितीवर प्रकाशझोत टाकणारा 'पाणी' प्रदर्शित

**सिनेरंग**

राजश्री एंटरटेन्मेंट आणि पर्पल पेबल पिक्चर्स, कोठारे व्हिजन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्तुत 'पाणी' हा महाराष्ट्रातील पाणीटंचाईच्या भीषण परिस्थितीवर भाष्य करणारा चित्रपट १८ ऑक्टोबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या चित्रपटाच्या टीझरवर प्रेक्षकांच्या कौतुकाचा वर्षाव होत असतानाच आता या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर झळकला आहे. मराठवाड्यातील पाणीटंचाई सोडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या तरुणाची संघर्षगाथा पाहायला मिळणार आहे.

या 'जलदूता'ची म्हणजेच हनुमंत केंद्रे यांची भूमिका आदिनाथ कोठारे याने साकारली असून या चित्रपटात रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. नितीन दीक्षित आणि आदिनाथ कोठारे लिखित या चित्रपटाचे दिग्दर्शन आदिनाथ कोठारे यानेच केले आहे. तर नेहा बडजात्या, दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा या चित्रपटाचे निर्माते असून महेश कोठारे, सिद्धार्थ चोप्रा या चित्रपटाचे सहयोगी निर्माते आहेत.

या चित्रपटात मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात हनुमंत केंद्रे यांचे इतिहास घडवणारे कार्य आपल्याला पाहायला मिळणार आहे. पाणी प्रश्नांमुळे गावातील अनेक कुटुंबे गाव सोडून जात असतानाच या तरुणाने गावातच राहून या प्रश्नावर तोडगा काढण्याचा निर्णय घेतला. गावात पाणी नसल्याने त्याचे लग्नही होत नसल्याचे ट्रेलरमध्ये दिसतेय. त्यामुळे आता गावात पाणी आणण्याच्या ध्येयाने पछाडलेल्या या तरुणाचा हा प्रवास कसा असणार, गावात पाणी येणार का? ज्या तरुणीवर त्याचे प्रेम आहे तिच्याशीच लग्न होणार का? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला १८ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहात मिळणार आहेत. ■ ■




**लोकरंजन**

## पायवाटाची सावली चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

लेखकाचा खडतर प्रवास पायवाटाची सावली या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतच मान्यवरांच्या उपस्थितीत या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा मुंबईत संपन्न झाला.

या चित्रपटाचे निर्माते, लेखक, दिग्दर्शक मुन्नावर शमिम भगत, बॉलिवूड मधील सुप्रसिद्ध संगीतकार अनिल बिस्वास यांचे सुपुत्र अमित अनिल बिस्वास, मराठी सिनेसृष्टीतील दिग्दर्शक शिरीष राणे, या चित्रपटाचे वितरक अकात डिस्ट्रीब्यूशनचे संस्थापक चंद्रकांत विसपुते हे उपस्थित होते. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होईल.

लेखकाच्या खऱ्या आयुष्यातील खडतर प्रवास या चित्रकथेतून मोठ्या पडदयावर येणार आहे. जीवनातील कठीण परिस्थितीशी त्याने दिलेली झुंज या चित्रपटाच्या ट्रेलर मध्ये पाहायला मिळत आहे. तसेच यात एका सुंदर गावातील जीवनशैली आणि साध राहणीमान ट्रेलर मध्ये दिसून येत आहे. 'मीना शमीम फिल्म्स' प्रस्तुत 'पायवाटाची सावली' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची व लिखाणाची धुरा मुन्नावर शमीम भगत यांनी उत्तमरीत्या पेलवली आहे. तर चित्रपटाच्या निर्मितीची बाजू 'मीना शमीम फिल्म्स'ने सांभाळली आहे. तर संपूर्ण चित्रपटाचे संगीत अमित अनिल बिस्वास यांनी केले आहे. या चित्रपटात विजे भाटिया, शाल्वी शाह, रेवती अय्यर, प्रसाद माळी आणि शीतल भोसले हे कलाकार आहेत. ■ ■

## सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेविषयी प्रेक्षकांना उत्कंठा




सोनी सबवरील ह्यश्रीमद् रामायणह्न रामायण ही मालिका त्यातील दिव्य कथानकाच्या उत्कृष्ट मांडणीमुळे लोकांना आवडली आहे.अभिनेता सुजय रेऊ या मालिकेत श्रीरामाची भूमिका करत आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, श्रीराम आणि सीतेचे (प्राची बंसल) पुत्र लव (शौर्य मंडोरिया) आणि कुश (अथर्व शर्मा) मारकासुर दैत्याला ठार करतात. ते पाहून, सीता आपल्या मुलांसह ज्या ठिकाणी राहात असते, त्याच जंगलात उपस्थित असलेला सीतेचा पिता, जनक राजा (जितेन लालवाणी) खूप प्रभावित होतो.

आगामी भागांमध्ये जनक राजा आश्रमात भेटलेल्या त्या दोन असामान्य प्रतिभेच्या मुलांचा विचार करता करता, मिथिलेत एका धनुर्विद्या स्पर्धेचे आयोजन करतो. लव आणि कुश या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तयारी करत असतानाच श्रीराम आपल्या अश्वमेध यज्ञाची तयारी करत आहेत आणि या यज्ञाचे आमंत्रण आपले श्वशुर राजा जनक यांना देण्यासाठी मिथिलेकडे जाण्यास निघाले आहेत.

श्रीरामाची कीर्ती लव आणि कुश यांच्या कानावर आधीच आलेली आहे. ते दोघे दुरूनच श्रीरामाला बघतात. पिता आणि पुत्रांची भेट होणार का याची उत्कंठा वाढवणारा हा प्रसंग आहे.श्रीराम आणि लव-कुश अखेरीस भेटणार का, की त्यांची चुकामुक होणार? कथानकातील हा भाग विशेष आहे, कारण यावेळी श्रीरामाची ती बाजू आपल्याला दिसते, जी आजवर फारशी दिसलेली नाही- केवळ एक राजा किंवा योद्धा नाही, तर एक पिता म्हणून त्यांचे दर्शन घडते. श्रीरामाला आपल्या दोन्ही पुत्रांची ओळख होणार का? याबद्दल प्रेक्षकांच्या मनात प्रचंड उत्कंठा आहे.अर्थात त्यासाठीच बघत रहा, सोनी सबवर श्रीमद् रामायण दर सोमवार ते शनिवार रात्री 7.30 वाजता! ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## रेल्वे तिकीट बुकिंग ६० दिवस अगोदर

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
भारतीय रेल्वेने आगाऊ तिकीट बुकिंगचे नियम बदलले आहेत. पूर्वी तिकीट बुकिंग प्रवासाच्या १२० दिवस आधी सुरू होत असे, आता ते ६० दिवसांवर आणले आहे. नवीन निर्णय १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू होणार आहे.

तथापि, आगाऊ रेल्वे तिकीट बुकिंगच्या नवीन नियमांचा आधीच बुक केलेल्या तिकिटांवर कोणताही परिणाम होणार नाही. सध्या, क्श्ळऊ वेबसाइट, अॅप आणि रेल्वे बुकिंग काउंटरद्वारे तिकीट बुकिंग केले जाते. दररोज १२.३८ लाख तिकिटे आयआरसीटीसीद्वारे बुक केली जातात.

रेल्वेने २०१५ मध्ये आगाऊ आरक्षणाचा कालावधी वाढवला होता १ एप्रिल २०१५ पर्यंत, आगाऊ आरक्षण कालावधी ६० दिवसांचा होता. तेव्हा सरकारने असा युक्तिवाद केला होता की बुकिंग कालावधी १२० दिवसांपर्यंत वाढवल्याने दलालांना चाप बसेल कारण त्यांना जास्त रद्दीकरण शुल्क द्यावे लागेल.

तथापि, तेव्हा अनेकांनी असा युक्तिवाद केला होता की आरक्षण कालावधी वाढवण्यामागे रेल्वेचे उद्दिष्ट जास्त प्रमाणात रद्द करून अतिरिक्त ६० दिवसांच्या व्याजासह अतिरिक्त महसूल मिळवणे होते.

आगाऊ आरक्षण कालावधी कमी केल्यामुळे, व्याज आणि रद्दीकरणातून आयआरसीटीसीची कमाई कमी होईल. त्याचा परिणाम त्याच्या स्टॉकवरही दिसून येत आहे.

## एमआयएम विरूद्ध काँग्रेस

**नांदेड लोकसभा पोटनिवडणूक**



■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. १७ :**
एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे त्यांचा सामना काँग्रेसचे येथील उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्याशी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने अद्याप येथून उमेदवार दिला नाही.

इम्तियाज जलील म्हणाले, मला नांदेडमधून लोकसभा निवडणूक लढवण्याची संधी मिळत आहे. एमआयएम हा पक्ष महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वात जास्त प्रतिसाद आम्हाला नांदेडमध्ये मिळाला होता.

दुसरीकडे, नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने दिवंगत वसंतराव चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देत काँग्रेसने चांगलीच खेळी खेळली असल्याचे दिसत आहे.

पान १ वरून...

## खरीखरी

### आघाड्यांचे हवाई इमले

महाराष्ट्राच्या आगामी निवडणुकीत दोन भिडू आणि इतर चार-पाच पक्षांचे लढू लढू म्हणणारे, पण शेवटी कडू कडू अनुभव घेऊन शहाणे होणारे अनेक महाभाग आपली उपस्थिती दर्शवतीलच. यात शंकेचे कारणच नाही. आपल्या देशात लोकशाही आहे. त्या लोकशाहीत सर्वांनाच निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. ज्यावेळी मतपत्रिकेवर निवडणुका होत्या. त्यावेळी काँग्रेसचे निवडणूक चिन्ह गाय-वासरू होते. त्यावेळी शिवसेनेच्या तत्कालीन मुखपत्र असलेल्या साप्ताहिक मार्मिक मध्ये एक मथळा आला होता. तो असा की, काँग्रेसने जिंकलेली ही निवडणूक बाईने किंवा गाईने जिंकलेली नसून ही निवडणूक शाईने जिंकलेली आहे. म्हणजे तेव्हा सुद्धा मतपत्रिकेवर ठप्पा मारणाऱ्या शाई वरही आक्षेप घेण्यात आला होता. हरियाणा मध्येही किंवा तत्पूर्वी लोकसभेच्या निवडणूकामध्ये काही मतदारसंघात मतदानाचे आकडे मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसतात. त्याबद्दल हरणाऱ्यांच्या शोकसभेत कितीही आरडाओरड झाली. तरी त्याबद्दल फारशी चर्चा होतच नाही. आता सुद्धा आपल्या महाराष्ट्रातील बड्या बड्या वल्गना करणाऱ्या आघाड्यांना जनतेचा फारसा पाठिंबा मिळेल असे दिसत नाही. इंग्लंड आणि अमेरिकेप्रमाणे आता आपणही द्विपक्षीय लोकशाही कडे वाटचाल सुरू केलेली आहे. यापैकी एनडीएच्या सहका ?यांना फक्त आणि फक्त सरकारला पाठिंबा द्यायचे धोरण राबवावे लागते. याचे कारण सत्तारूढ आघाडीला नमस्कार करणे त्यांना भाग आहे. तिकडे दुसऱ्या आघाडीत काँग्रेस पक्ष मोठा असला तरी अनेक पक्ष स्वयंभू आहेत. ते पक्ष आपापल्या राज्यात बलवान आहेत. अशा स्थितीत काँग्रेसला इंडियात सर्वांना सोबत घेऊन चालणे गरजेचे आहे. हे केले तरच पुढे सगळे आलबेल होईल, ही आशा करायला हरकत नाही. त्यामुळे बाकीच्या आघाड्यांचे हवाई इमले म्हणजे जमले तर जमले, नाही तर थांबले. असेच चित्र दिसत आहे.

## परिवर्तन महाशक्ती आघाडी १५० जागा लढणार?

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात तयार झालेली तिसरी आघाडी म्हणजे परिवर्तन महाशक्ती आघाडीची महत्त्वाची बैठक पुण्यात पार पडली.



या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. परिवर्तन महाशक्तीने या बैठकीत महाराष्ट्रातील १५० जागांबाबत निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात देखील उमेदवार देण्याची तयारी या बैठकीत करण्यात आली आहे.

बैठकीत बोलताना बच्चू कडू यांनी शरद पवारांवर देखील टीका केली आहे. बच्चू कडू म्हणाले, सामान्य माणसाला आपले वाटेल असे सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न आम्ही करू. आम्ही चांगले उमेदवार देणार आहोत. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसले परिवर्तन आणणार आहात? तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसे काय परिवर्तन तुम्ही आणणार आहात? असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

या बैठकीत बोलताना राजू शेट्टी म्हणाले, स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार आम्ही या निवडणुकीत देणार आहोत. आमच्याकडे छोट्या मोठ्या ३० ते ४० संघटना असल्याचे देखील राजू शेट्टी यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले, प्रस्थापित लोकांच्या विरोधात लढा देणारे उमेदवार देणार आहोत. मनोज जरांगे पाटील यांच्याशी माझे बोलणे झाले आहे. पण त्यांनी अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यांनी आमच्यासोबत यावे, अशी आमची इच्छा असल्याचे संभाजीराजे यांनी सांगितले.

महासागर
वृत्तसागर
नागपूर
■ शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ ■

# मुस्लिमांना गृहीत धरू नका, काँग्रेसला इशारा

# विदर्भातील चार जागा देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
काँग्रेसने मुस्लिमांना गृहीत धरू नये असे सांगतानाच विदर्भात चार जागा देण्याची मागणी काँग्रेसच्या लिगल सेलचे माजी राज्य अध्यक्ष ॲड. असिफ कुरैशी यांनी केली आहे. यामुळे विधिमंडळात मुस्लिमांना पुरेशे प्रतिनिधित्व का मिळत नाही? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महाराष्ट्राच्या विधान परिषदेत एकही मुस्लिम प्रतिनिधी यावेळेस नाही. विदर्भातून एकही मुस्लिम आमदार नाही. २०१९ मध्ये काँग्रेसने फक्त ३ मुस्लिम प्रतिनिधींना उमेदवारी दिली होती. मात्र विदर्भातून एकाही मुस्लिमाला उमेदवारी दिली नाही.

यावेळेस काँग्रेसने विदर्भातून बाळापूर, मध्य नागपूर, अमरावती आणि अकोला पश्चिम या चार जागा मुस्लिमांना देण्यात याव्या असे ते म्हणाले. लोकसभेत मुस्लिम आणि दलितांनी काँग्रेसला भरघोस मते दिली. हे लक्षात घेता मुस्लिमांना न्याय देण्यात यावा असे ॲड. कुरैशी यांनी सांगितले. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना माध्यम प्रतिनिधींनी विचारणा केली असता मेरिटच्या आधारावर उमेदवारी दिली जाईल असे ते म्हणाले.

२०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेत १० मुस्लिम आमदार होते. दहापैकी ५ मुंबईतील आहे. यामध्ये काँग्रेसचे ३, एमआयएमचे २, समाजवादी पक्ष २, राष्ट्रवादी २ व शिवसेनेच्या एका आमदाराचा समावेश आहे. अबू आझमी, रईस शेख, अस्लम शेख, अमीन पटेल, झीशान सिद्दीकी, नबाब मलिक, हसन मुश्रीफ, अब्दुल सत्तार, शाह फारूख अन्वर, मुफ्ती मोहंमद इस्माईल यांचा मुस्लिम आमदारांत समावेश आहे. १९९९ मध्ये, महाराष्ट्र विधानसभेत सर्वाधिक मुस्लिम आमदार होते. तेव्हा १३ मुस्लिम आमदार निवडून आले होते.

२०१४ मध्ये विधानसभेत काँग्रेसचे ०५, एमआयएम ०२, राष्ट्रवादी ०१, समाजवादी पक्षाचा ०१ असे ९ मुस्लिम आमदार होते.

महाराष्ट्राच्या विधान परिषदेत सध्या एकही मुस्लिम आमदार नाही. महाराष्ट्राच्या विधान परिषदेत एकही मुस्लिम प्रतिनिधी नसल्याची बाब समाजवादी पार्टीचे आमदार रईस शेख यांनी निदर्शनास आणून दिली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबाजानी दुराणी आणि काँग्रेसचे मिर्झा वजाहत हे विधान परिषदेतील दोन आमदार निवृत्त झाल्यामुळे विधान परिषदेतील मुस्लिम प्रतिनिधींची संख्या शून्य झाली आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच मुस्लीम समुदाय उमेदवारीसाठी पुन्हा एकदा आक्रमक झाला असून, विदर्भातील ६२ पैकी किमान ४ जागा देण्याची त्यांची मागणी आहे.

# लाडकी बहीण योजना हलक्यात घेऊ नका..

## ३ हजार देऊ असे सांगा; श्याम मानव यांचा आघाडीला सल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :



विधानसभा निवडणुकी दरम्यान राज्यात आता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची चांगलीच चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हलक्यात घेऊ नका, या योजने विरोधात न बोलता महाविकास आघाडीचे सरकार आल्यास आम्ही महिलांना दीड हजार रुपयांऐवजी दोन हजार रुपये देऊ, असे सांगा, असा सल्ला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी महाविकास आघाडीला दिला आहे.

राज्यातील महायुती सरकारच्या वतीने घोषणा करण्यात आलेल्या लाडकी बहिणी योजनेमुळे राज्यातील महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. सुरुवातीच्या काळात ही योजना फसवी असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोप केले होते. त्यानंतर या योजनेचे पैसे आता केवळ निवडणुकीपुरते भेटतील, असे आरोप करण्यात येत आहे. मात्र त्याला महायुती सरकारच्या वतीने देखील प्रत्युत्तर देण्यात येत आहे.

लाडकी बहीण योजनेची लोकप्रियता पाहता याचा विधानसभा निवडणुकीत महायुतीला फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता या योजनेवर टीका न करता लाडक्या बहिणींचे कौतुक करा, या योजनेच्या माध्यमातून आमचे सरकार आल्यास आम्ही महिन्याला दोन हजार रुपये देऊ असे सांगा, लाडक्या बहिणीशी संवाद साधा, असा सल्ला श्याम मानव यांनी महाविकास आघाडीतील नेत्यांना दिला आहे.

काँग्रेस पक्षातील सर्व वरिष्ठ नेत्यांशी या संदर्भात बोलणे झाले असून महाविकास आघाडीचे सरकार आल्यास संविधानाचा धोका कमी होईल, असे देखील श्याम मानव यांनी म्हटले आहे.

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांना दीड हजार रुपये प्रति महिना देण्याचा निर्णय राज्य सरकारच्या वतीने घेण्यात आला होता. सुरुवातीला ही योजना फसवी असल्याचा आरोप महाविकास आघाडीतील नेत्यांनी केला होता. मात्र महिलांच्या खात्यावर पैसे येण्यास सुरुवात झाली. त्यामुळे आता केवळ निवडणुकीपूरती योजना असल्याचा आरोप महाविकास आघाडीतील नेते करत आहे.

तर दुसरीकडे ही योजना कधीही बंद होणार नाही, महिलांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळत राहतील, असा दावा युतीतील नेते करत आहेत. त्यामुळे निवडणुकीत या योजनेचा परिणाम मतदानावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# आबू समर्थकांचा कारागृहासमोर हैदोस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
मध्यवर्ती कारागृहासमोर आबूच्या समर्थकांनी राडा घातला. तुरुंगातून सुटका होत असलेल्या साथीदाराला घेण्यासाठी आलेल्या तीन तरुणांना आबूच्या समर्थकांनी जबर मारहाण केली.

मारहाण करणाऱ्यांमध्ये एक मोक्काचा आरोपीही होता. या प्रकरणी धंतोली पोलिसांनी शेख अहबाज शेख नाजिम (२६) रा. मोठा ताजबागच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये इकबाल उर्फ इग्गा खान, जाकीर खान, फैजल खान उर्फ पाऊ, राजा मजहर खान, आशू भांजा, वसीम भांजा, आकिब भांजा, आसिफ भांजा इतर ८-९ जणांचा समावेश आहे.

बुधवारी सायंकाळी अहबाजचा साथीदार तुरुंगातून सुटणार होता. त्यामुळे अहबाज आणि त्याचे मित्र त्याला घेण्यासाठी मध्यवर्ती कारागृहात पोहोचले. सर्वजण कारागृहाच्या प्रवेशद्वारासमोर उभे होते. त्यावेळी इग्गा आणि जाकीर हे सुद्धा त्यांच्या समर्थकांसह एका गुन्हेगाराला भेटायला आले होते. दोन्ही गटात पूर्वीपासून दुश्मनी असल्याचे समजते. कारागृहासमोर इग्गाने रागाने पाहिल्यावरून अहबाजला शिविगाळ सुरू केली. शाब्दिक बाचाबाची शिगेला जाऊन हाणामारी सुरू झाली.

इग्गा, जाकीर आणि त्याच्या साथीदारांनी अहबाज आणि त्याच्या साथीदारांसोबत जबर मारहाण केली. कारागृहाच्या रक्षकांनी मध्यस्थी करून त्यांच्यातील वाद शांत केला. त्यानंतर अहबाजने धंतोली ठाण्यात तक्रार दाखल केली. उल्लेखनिय आहे की, आबूसोबत पोलिसांनी इग्गा याच्यावरही मोक्का लावला होता. ताजाबाद ट्रस्टची जमीन हडपल्या प्रकरणात काँग्रेस नेता शेख हुसेन आणि आबूसोबत इग्गा आणि जाकीरही आरोपी होते.

दरम्यान, गेल्या काही महिन्यात नागपूर शहरात गुन्हेगारीने कळस गाठला असून, खूनाच्या अनेक घटना घडल्यात. अगदीच क्षुल्लक कारणांवरून हत्या करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, अल्पवयीन मुलेही शस्त्र बाळगत असल्याचे काही घटनांमधून दिसून येत आहे.

विधानसभा निवडणुकीच तोंडावर या वाढत्या गुन्हेगारीला चाप लावण्याचे मोठे आव्हान नागपूर पोलिसांसमक्ष उभे आहे.

# पानठेला चालकाचा खूनी अटकेत

## ९०० रुपयांसाठी झाला होता वाद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
वाडीच्या खडगाव मार्गावर पानठेला चालक सुभाष गुलाब बोरकर (५५) याचा खून करण्यात आला होता. या हत्याकांडातील आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. तपासात ९०० रुपयांच्या उधारीतून हे हत्याकांड घडल्याचे समोर आले आहे. रोहित बालकराम मालवी (२६) रा. आशिर्वादनगर, खडगाव असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

रोहित खडगाव मार्गावरील एका कंपनीत जेसीबी मशीन ऑपरेटर आहे. सुभाष याचा पानठेलाही खडगाव मार्गावरच आहे. पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष पानठेल्याच्या आड दारूचा व्यवसायही करीत होता. रोहितचे त्याच्या दुकानात येणे-जाणे होते. त्याची सुभाषवर ९०० रुपयांची उधारी होती. वारंवार पैसे मागितल्यानंतरही रोहित टाळाटाळ करीत होता. मंगळवारी रात्री सुभाषने दुकान बंद केली. याच दरम्यान रोहितशी त्याचा आमना-सामना झाला. सुभाषने उधारीचे पैसे मागितले असता रोहितने चिडून सुभाषने रोहितला शिविगाळ केली.

त्यामुळे चिडलेल्या रोहितने सुभाषच्या डोक्यावर दांड्याने वार केला. रक्ताच्या थारोळ्यात सुभाष जमिनीवर कोसळला. हिच संधी साधून रोहितने जवळच पडलेला मोठा दगड उचलून त्याच्या डोक्यात घातला आणि जागीच सुभाषचा मृत्यू झाला. रात्री उशिरापर्यंतही सुभाष घरी न पोहोचल्याने कुटुंबीय चिंतीत झाले.

वाडी पोलिसात तो बेपत्ता असल्याची सूचना देण्यात आली. बुधवारी सायंकाळी सुभाषचा मृतदेहच आढळला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली. एका ठिकाणी पोलिसांना रोहित दिसला. त्याला ताब्यात घेऊन कठोर चौकशी केली असता सुभाषने खुनाची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक केली. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर करून पोलिस कोठडीची मागणी केली जाईल.



■ नागपूर : लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून टाकणारा दिपावलीचा सण तोंडावर आला आहे. दिवाळी म्हटली की अंगणात, दारासमोर सजते ती रांगोळी. याच रंगीबेरंगी रांगोळीची दुकाने शहरभर सजली असून, नानाविध रंगाच्या रांगोळी खरेदीसाठी महिलांची गर्दी होवू लागली आहे.

# सोन्याच्या वाढत्या दराची चढती कमान सुरूच

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
केंद्रीय अर्थसंकल्पानंतर नागपूरसह देशभरात सोन्याच्या दरात मोठी घट झाली होती. त्यानंतर सातत्याने कधी वाढ तर कधी दरात घट होतानाचे चित्र आहे. दरम्यान नवरात्रीपासून सोन्याच्या दरात सतत वाढ होत असून बुधवारी (१७ ऑक्टोबर) दिवाळीपूर्वी सोन्याच्या दराने नवीन उच्चांक गाठला.

नवरात्रीपूर्वी ३० सप्टेंबरला नागपुरातील सराफा बाजारात सोन्याचे दर सकाळी ११ वाजता २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७५ हजार ९०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७० हजार ६०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ३०० रुपये नोंदवले गेले.

परंतु त्यानंतर सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. त्यातच आता दिवाळी तोंडावर आहे. या सणामध्ये मोठ्या संख्येने ग्राहक दागिनेही खरेदी करतात. परंतु सोन्याच्या दरात मोठी वाढ झाल्यामुळे ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे.

नागपुरातील सराफा बाजारात बुधवारी (१७ ऑक्टोबर) दुपारी सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७६ हजार ९०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७१ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६० हजार रुपये, १४ कॅरेटसाठी ५० हजार रुपये नोंदवले गेले. तर प्लॅटिनमचेही दर १७ ऑक्टोबरला सकाळी ४४ हजार रुपये प्रति दहा ग्राम नोंदवले गेले. दरम्यान हल्लीच्या सोन्याच्या दरातील मोठ्या बदलामुळे सराफा व्यवसायिकांमध्येही चिंता वाढली आहे. परंतु सराफा व्यवसायिकांकडून मात्र हे दर आणखी वाढण्याचे संकेत असून सोने- चांदीमध्ये गुंतवणूक लाभदायक असल्याचा दावा केला जात आहे.

# जगातील पहिल्या सीएनजी बाईकला नागपुरात मागणी




■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. १७ :
आकर्षक व स्पोर्टी लूक, लांबलचक सीट, चित्त वेधक रंग संगती व वजनाने हलकी असल्याने कोणाचेही लक्ष वेधून घेईल अशी जगातील पहिली सीएनजी बाईक बजाज कंपनीने १ जुलै २०२४ ला लॉन्च केली. या बाईकला संमिश्र प्रतिसाद मिळत असून नागपुरातील अरुण बजाज ऑटोमोबाईल्स मधून तीन महिन्यात ५० सीएनजी बाईकची विक्री झाली आहे.

१२५ सीसी क्षमतेचे इंजिन असलेल्या या बाईकमध्ये पेट्रोल व सीएनजी साठी दोन पर्याय दिले आहेत. यामध्ये दोन लिटर पेट्रोल टॅक व दोन किलोग्रॅम सीएनजी साठीचे सिलेंडर उपलब्ध केलेले आहे. १२५ सीसी क्षमतेचे पेट्रोल इंजिन ९.५ एस ची पॉवर आणि ९.७ एन एम चा टॉर्क जनरेट करते. र

ा बाईकला कंपनीच्या दाव्यानुसार सर्वात लांब सीट देण्यात आलेली आहे तसेच फ्रंट फ्युएल टॅक त्यात बरोबर बसते. सीएनजी टॅक सीटच्या खाली इतक्या खुबीने अरेंज करण्यात आली आहे की बाईकच्या डिझाईन वर कोणताही फरक न पडता ही कुठे बसविली आहे हे सुद्धा ग्राहकांना कळत नाही. या बाईकमध्ये रोबस्ट ट्रेलिस फ्रेम देण्यात आली आहे त्यामुळे ही बाईक वजनाला अतिशय हलकी आहे. ही बाईक प्रति किलोग्रॅम सीएनजीला १०० किलोमीटरचा ॲव्हरेज देते . शिवाय प्रति लिटर पेट्रोल ६५ किलोमीटरचा एव्हरेज देते. १२५ सीसी क्षमतेच्या गाड्यांशी तुलना केली तर या बाईकचा ॲव्हरेज दुप्पट आहे. पेट्रोलच्या तुलनेत सीएनजीची किंमत प्रति किलोग्रॅम पंधरा ते वीस टक्के कमी असल्याने तसेच ती पर्यावरण पूरक असल्याने ग्राहकासाठी एक पर्वणी ठरली आहे.

या बाईकचे तीन मॉडल बाजारात उपलब्ध आहेत. ड्रम ही ब्रेक सिस्टीम असलेली १ लाख १७ हजारची बाईक, ड्रम व एलईडी लाईट असलेली १ लाख २८ हजार आणि एलईडी लाईट व डिस्क सुविधा असलेली १ लाख ३५ हजारची बाईक असे तीन मॉडेल्स मार्केटमध्ये उपलब्ध आहेत.

यामध्ये पिवळा, लाल, पांढरा, काळा व सिल्वर असे पाच रंग उपलब्ध आहेत. नागपुरात या गाड्यांना मागणी असून अरुण बजाज ऑटोमोबाईल्स मधून तीन महिन्यात ५० गाड्यांची आतापर्यंत विक्री झाली आहे. या गाड्यांचा फीडबॅक घेतला असता अजून पर्यंत कोणतीही नकारात्मक प्रतिक्रिया आली नसल्याचे वितरकांनी सांगितले.

# मध्य नागपुरात साकारणार उत्तम दर्जाचे इनडोअर स्टेडियम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :



मध्य नागपूर सारख्या दाट लोकवस्ती असणाऱ्या भागात शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या युवकांना, नागरिकांना व्यायाम तसेच खेळाच्या उत्तम सुविधा मिळण्यासाठीअन्यत्र जावे लागत होते . मध्य नागपुरात उत्तम सुविधा निर्माण करण्यासाठी आ. प्रवीण दटके प्रयत्न करीत होते.

प्रभाग क्र. ८ टिमकी, हंसापुरी हिंदी प्राथमिक शाळेच्या मैदानावर उच्च दर्जाचे स्विमिंग पुल आणि इनडोअर स्टेडियम बांधण्याकरिता आ. प्रवीण दटके यांच्या प्रयत्नाने ३० कोटींच्या कामास मान्यता देण्यात आली आहे. या स्टेडियममध्ये अल्ट्रा मॉडर्न स्विमिंग पूल,एलिव्हेटेड ट्रॅक , वॉकिंग ट्रॅक, टेनिस, विविध खेळांच्या सोयी, अत्याधुनिक जिम आदी उपलब्ध होणार आहे. युवकांनी भविष्यात या स्टेडियमचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. दटके यांनी केले असून सीएम शिंदे तसेच फडणवीस, अजित पवार यांचे आभार मानलेत.

# गुन्हा नसताना १९ दिवस कारागृहात डांबले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
४३ वर्ष जुने प्रकरण बंद करण्याच्या नादात पोलिस विभागाने चक्क न्यायालयासमोर आरोपीशी नावसाधर्म्य असलेल्या भलत्याच व्यक्तीला उभे केले. इतकेच काय तर न्यायालयाने संबंधित व्यक्तीला १९ दिवस कारागृहात पाठविले. मात्र वास्तव समोर आल्यावर त्याची निर्दोष मुक्तता केली. पोलिसांच्या हलगजीर्मुळे निर्दोष व्यक्तीचे आयुष्यावर डाग लागला. पोलिसांच्या एका चुकीमुळे गेलेली प्रतिष्ठा परत मिळविण्यासाठी तो व्यक्ती वणवण फिरत आहे.

मणीराम कारू ठाकरे (६२, तोतलाडोह, देवलापार) या व्यक्तीसोबत हा दुर्दैवी प्रकार घडला आहे. १४ ऑक्टोबर १९८१ रोजी मणीराम काशीराम ठाकरे याच्याविरोधात महिला अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला होता. त्याला काही दिवसांनी जामीन मिळाला होता व त्यानंतर आरोपी फरार झाला. तो न्यायालयासमोर कधीच उभा झाला नाही. २०१० साली जेएमएफसी रामटेकने प्रकरणाला बंद करण्याचा आदेश दिला होता. मात्र काही कालावधीने प्रकरण परत सुरू झाले. जेएमएफसी रामटेककडून प्रोक्लेमेशन नोटीस जारी करण्यात आली. देवलापार पोलिस ठाण्यातील पथकाने ६ सप्टेंबर २०२४ रोजी मणीराम काशीराम ठाकरे ऐवजी मणीराम करुलाल ठाकरे याला ताब्यात घेतले.

त्याने आधार कार्ड व इतर दस्तावेज दाखवून तो मी नव्हेच असा दावा केला. मात्र पोलिसांनी कुठलीही पडताळणी न करता त्याला न्यायालयासमोर सादर केले. न्यायालयाने त्याला कारागृहात पाठविले. त्याचे वकील ॲड. प्रीतम खंडाते व ॲड. संतोष चव्हाण यांनी जामिनासाठी अर्ज केला.

जमीन अर्जावर सुनावणी दरम्यान त्याने न्यायालयासमोर वास्तव मांडले. त्याची कथा ऐकून न्यायालय देखील आश्चर्यचकित झाले.

# मित्राकडूनच व्यापाऱ्याच्या सेक्सटॉर्शनचा भंडाफोड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
एक व्यापारी सेक्सटॉर्शनमुळे तणावात होता. त्याने आपल्या मित्राकडे मदत मागितली. मात्र त्याला कुठे माहिती होते की, ज्या मित्राकडे मोठ्या विश्वासाने तो मदत मागत आहे तो स्वतःच त्याला ब्लॅकमेल करून २५ लाख रुपयांची खंडणी मागत आहे.

व्यापाऱ्याने हिंमत करून पोलिसात तक्रार केल्यानंतर त्या मित्राचा भंडाफोड झाला. पोलिसांनी गुरूच्या तक्रारीवरून आरोपी मित्र अनिरुद्ध मोतिराम डहाके (३९) रा. राजाबाक्षा विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

गुरू व्यापारी असून घटस्फोटीत आहे. दुसरे लग्न करण्यासाठी त्याने वधू-वर सूचक वेबसाईटवर प्रोफाईल अपलोड केले होते. संपर्क करणाऱ्या महिलेने तिचे नाव सनम शर्मा सांगितले. त्यानंतर दोघांची व्हॉट्सॲपवर चॅटिंग सुरू झाली.

काही दिवसानंतर सनमने मला तुम्हाला बघायचे आहे, असे म्हणून गुरूला व्हीडिओ कॉल करण्यास सांगितले. या कॉल दरम्यान ती आक्षेपार्ह वर्तन करू लागली. तिने गुरूचाही आक्षेपार्ह व्हीडिओ रेकॉर्ड केला. तो व्हीडिओ युट्यूबवर अपलोड करण्याची धमकी देऊन तिने गुरूकडे पैशांची मागणी केली आणि स्क्रीनशॉटही पाठवू लागली. ती गुरूला ब्लॅकमेल करीत होती.

गुरूने मित्राकडे मदत मागितली आणि पोलिसात जाऊन प्रकरणाची माहिती दिली. सल्ल्यानुसार, गुरूने त्याचे व्हॉट्सॲप आणि सोशल मीडिया अकाऊंट बंद केले. बऱ्याच दिवसानंतर गुरूने दुसऱ्या नंबरवर व्हॉट्सॲप सुरू केला. ५ सप्टेंबर २०२४ रोजी पुन्हा एका नंबरवरून व्हीडिओ मिस कॉल आला. मॅसेज करून ओळख विचारली असता पुन्हा सनम शर्माचे नाव पुढे आले आणि जुने व्हीडिओ पाठविण्याची धमकी देण्यात आली. त्याला व्हीडिओ आणि स्क्रीनशॉटही येऊ लागले. भाऊ आणि नातेवाईकांची माहितीही पाठविण्यात आली.

**२५ वर्षे जुनी मैत्री**

त्यामुळे गुरू घाबरला आणि त्याने २५ वर्षे जुना मित्र अनिरुद्ध याला सर्व प्रकार सांगितला. अनिरुद्धने व्हॉट्सॲप हॅक झाल्याची माहिती दिली. समाजात बदनामी होईल असे म्हणत पोलिसात तक्रार न करण्यास सांगितले. गुरूने तो नंबरही ब्लॉक केला. काही दिवसांसाठी अनिरुद्धच्या नंबरवर व्हॉट्सॲप सुरू करण्यात आला. तेव्हा अनिरुद्धने सांगितले की, सनम शर्माला २५ लाख रुपये द्यावे लागतील. गत ३ वर्षांचा संपूर्ण डाटा तिच्याकडे आहे. जर तिने व्हीडिओ सोशल मीडियावर टाकले तर बदनामी होईल. गुरूने हिंमत करून पोलिसात तक्रार केली. त्यामुळे अनिरुद्ध चिडला. त्याने पोलिसातून तक्रार मागे घेण्यास सांगितले. शिविगाळ करीत तुझ्यासोबत माझीही बदनामी होईल असे म्हणू लागला.

**असा झाला भंडाफोड**

गुरूला त्याच्यावर संशय आला. पोलिस तपासात समोर आले की, ज्या नंबरवरून गुरूला ब्लॅकमेल केले जात आहे तो नंबर सोमवारी क्वॉर्टर परिसरात राहणाऱ्या एका महिलेचा आहे. पोलिस त्या महिलेपर्यंत पोहोचले असता तिने काही दिवसांपूर्वी तिचा सीमकार्ड हरवल्याची माहिती दिली.

ती अनिरुद्धच्या पत्नीची नातेवाईक होती. यावरून स्पष्ट झाले की, नवीन नंबरवरून अनिरुद्धच त्याला ब्लॅकमेल करून पैशांची मागणी करीत होता. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध आयटी ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यास सहकार्य करावे : पियुष चिवंडे

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १७ :

केंद्रीय निवडणूक आयोगाने आज (१५ ऑक्टोबर) महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. २६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभेची मुदत संपणार आहे. त्याआधीच राज्यात नवं सरकार स्थापन होणार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं. तसंच, राज्यातील मतदारांची संख्याही त्यांनी सांगितली.



त्याचप्रमाणे १६आक्टोबर रोजी काटोल विधानसभा निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पियूष चिवंडे यांनी काटोल विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकिय पक्षांचे नेत्यांची बैठक घेऊन होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकी बाबद माहिती दिली. या प्रसंगी त्यांनी सांगितले की आपण सर्व मिळून आपल्या काटोल विधानसभेची होणारी निवडणूक भयमुक्त वातावरणात संपन्न करण्यासाठी सर्व जनप्रतिनिधीनीं प्रशासनास मदत करावी. त्याच प्रमाणे पारदर्शी निवडणूक अडथळा आणनार्या विरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली जाईल. सोबतच उमेदवारांना खचार्ची मयार्दा, सिमा लगत राज्याचे लगत चार चेक पोस्ट असून, उमेदवाराकडून होणार्या खर्चावर निरिक्षण ठेवण्यासाठी निवडणूक खर्च अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. निवडणूकिला लागणारा मनुष्यबळ व त्यांचे प्रशिक्षण, याबाबत माहिती दिली. तसेच त्यांनी काटोल विधानसभा मतदारसंघात३३२ मतदार केंद्र आहेत. या केंद्रांवरून काटोल विधानसभेत मतदान पार पडेल. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांना माहिती दिल्यानंतर काटोल तालुक्यातील पत्रकारांना ही निवडणूकीत १००% मतदान व्हावे या बाबतीत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडिया, व अन्य समाज माध्यमातून प्रचार प्रसार प्रसिध्दी साठी आप आपल्या वृतपत्रात स्थान देण्याचे आव्हान काटोल विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी,उपविभागीय अधिकारी पियूष चिवंडे यांनी केले आहे.

प्रसंगी काटोल विधानसभा मतदारसंघातील सर्व मान्यताप्राप्त तसेच नोंदणीकृत राजकिय पक्षांचे नेते व पत्रकार यांचे समक्ष काटोलचे तहसीलदार राजू रणवीर, यानी ही निवडणूक प्रक्रियांचे नियमावलीची माहिती दिली. नायब तहसीलदार व सह निवडणूक अधिकारी विजय डांगोरे, भागवत पाटील, नायब तहसीलदार संजय भुजाडे, सुनीता चल्लावार, काटोल व नरखेड पंचायत समितीचे बीडिओ तसेच मनिष चरडे उपस्थित होते.



# शासकीय रुग्णालयाच्या बांधकामाचे उदघाटन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :


गोदामनगरी वाडीत गेल्या ५० वर्षापासुनची शासकीय रुग्णालयाची मागणी आमदार समीर मेघे यांच्या कार्यकाळात पूर्ण झाली असुन ३० खाटांचे शासकीय ग्रामीण रूग्णालयाला २२ कोटी रुपए मंजुर करून मंगळवार १५ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता आमदार मेघे यांच्या हस्ते इमारत बांधकामाचे उदघाटन करण्यात आले.

यावेळी नरेश चरडे, आनंदबाबू कदम,पुरुषोत्तम रागीट, कैलाश मंथापुरवार, सरीता यादव, कल्पना सगदेव,राकेश मिश्रा, दिनेश कोचे,सरपंच गजानन रामेकर, सरपंच देवराव कडू, उपसरपंच अर्चना चौधरी,सुजीत नितनवरे, प्रकाश डवरे, गोविंदराव रोडे, पुरुषोत्तम लिचडे, कमल कनोजे, कमलाकर ईंगळे, केशव बांदरे, प्रशांत श्रीवास्तव, प्रमोद गमे, सरपंच धिरज आंबटकर, अखिलेश सिंग, सुधाकर राऊत, रामप्रसाद पटले, अक्षय तिडके, विशाल डोंगरे, राहुल तायडे, ईशांत राऊत, मंगला पडोळे, विजय गंथाडे, रमेश गोमासे, भिमराव मोटघरे यासह अनेक गावातील नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सावनेर कळमेश्वर मतदारसंघाकरिता दिलीप धोटे यांची मोर्चेबांधणी

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १७ :

तालुक्यातील धापेवाडा येथील रहिवासी दिलीप धोटे हे गेल्या ३०ते३५ वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे काम करीत आहे. या कामाचे चांगल्या चांगल्या प्रकारे अनुभव भारतीय जनता पार्टी सदस्य म्हणून सुरुवात केली आणि भारतीय जनता युवा मोर्चाच्या शाखा धापेवाडा अध्यक्ष म्हणून. काम करण्यास सुरुवात केली यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाच्या महामंत्री म्हणून कळमेश्वर तालुका महामंत्री म्हणून मी तीन वर्षे काम सांभाळले. टेकचंदजी सावरकर, आमदार बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये युवा मोर्चा काम चालू केले.



युवा मोर्चा काम करीत असताना अनेक अडचणीवर मात करून त्यानंतर मी भारतीय जनता युवा मोर्चा पाटीर्चा अध्यक्ष झालो. अध्यक्ष झाल्यानंतर पूर्ण तालुक्याची जबाबदारी माज्यावर आली. गावागावांमध्ये जाऊन भाजपच्या समित्या तयार करणे, गाव चलो अभियान राबविणे, तसेच अनेक शेतकऱ्यांच्या कापसाच्या प्रश्नावर आंदोलन करणे, कळमेश्वर येथे ब्राह्मणी फाटा शेतकऱ्यांची चळवळ लागली.

इलेक्ट्रिक डिपार्टमेंट वर मोर्चा नेने अशा अनेक मोर्चे काढून भारतीय जनता पार्टी करिता काम मध्ये सुद्धा अटक करण्यात आली. आंदोलन करीत असताना पोलीस अटक करणे, असे अनेक प्रकारचे कामे करण्यात आले.

या सर्व बाबींचा होत्या. यामध्ये माझ्यासोबत अनेक कार्यकर्ते म्हणून काम करीत होते आणि आदरणीय डॉक्टर पोतदार साहेब सुद्धा या आपल्या सोबत काम करायला आले. मग मी त्यानंतर भारतीय जनता पक्षाचा कार्याध्यक्ष म्हणून कळमेश्वर तालुक्याचा कारभार सांभाळला. त्यानंतर पक्षाची निवडणूक लागली.

त्यानंतर डॉ. राजीव पोतदार साहेब भारतीय जनता पाटीर्चे अध्यक्ष झाले आणि त्यांच्या अध्यक्षांनी मला पाटीर्चे काम करण्यास संधी मिळाली. त्या संधीचे मी सोनं केलं, डॉक्टर पोतदार अध्यक्ष असताना अतिशय जोमाने काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मी पंचायत समिती सदस्य मधून निवडून आलो.

# निवडणुकीची घोषणा होताच प्रशासन लागले कामाला



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

येणाऱ्या २० नोव्हेंबर ला रामटेक विधानसभा मतदारसंघाची निवडणुक होत आहे २२ ते २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याबाबत माहिती रामटेक विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचे निर्णय अधिकारी तथा उपविभागीय राजस्व अधिकारी प्रियेश महाजन यांनी पत्र परिषदेला दिले. बुधवार तहसील कार्यालय रामटेक येथे सकाळी ११ वा पत्रकार परिषद झाली.

निवडणूक कार्यक्रम उपविभागीय राजस्व अधिकारी प्रियेश महाजन यांनी सांगितले की २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत तसेच २९ तारखेपर्यंत अर्ज भरायचे आहेत, दि. ३० ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन आणि ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज छाननी आणि नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत.दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून दि. २३ नोव्हेंबर रोजी महाकवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथे मतमोजणी होणार आहे.

निवडणुकीत एकूण ३६५ मतदान केंद्रे असतील. यामध्ये रामटेक तालुक्यात १५८, पारशिवनी तालुक्यात १५५ आणि मौदा तालुक्यात ४० मतदान केंद्रांचा समावेश आहे. या निवडणुकीत २,८५,७१४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

यामध्ये पुरुष - १,४२,२०२, महिला - १,४२,४४०, तृतीयपंथी २ आणि ३७० सेवा मतदार १५८० कर्मचारी मतदान केंद्रांवर काम करणार आहेत. ७५ टक्के मतदान व्हावे यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. तहसीलदार रामटेक, तहसीलदार पारशिवनी व गटविकास अधिकारी रामटेक हे सहायक निर्णय अधिकारी म्हणून राहणार आहेत.

# विकास ठाकरे यांनी घेतला एमएसआरटीसीच्या करारावर आक्षेप

**नागपूरः** पश्चिम नागपूरचे आमदार आणि नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळान ओलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेड आणि इव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड, या मेघा इंजिनिअरिंग आणि इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या उपकंपन्यांना दिलेल्या ७०,३७८ कोटी रुपयांच्या (प्रति किलोमीटर ७८ रुपये) करारावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

या करारात ५,१५० इलेक्ट्रिक स्टँडर्ड साईज बसच्या खरेदीसह, १२ वर्षांच्या कालावधीसाठी बसच्या संचालन आणि देखभाल यांचा समावेश आहे. ठाकरे यांनी आरोप केला आहे की, टरफळ्उ या कराराद्वारे तुलनात्मक करारांपेक्षा ११,७३० कोटी रुपये जास्त खर्च करत आहे, ज्यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत आहे.

ठाकरे यांनी पुढे सांगितले की नागपूर महानगरपालिका ने देखील इव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेडला २५० इलेक्ट्रिक बससाठी प्रति किलोमीटर ७८ रुपये या महागड्या दराने करार देण्याचा विचार केला होता, ज्यामुळे १,४२३.५ कोटी रुपये खर्च आला असता. मात्र, ठाकरे यांनी एकाच निविदेवर आक्षेप घेतल्यानंतर, महानगरपालिकाने पुन्हा निविदा काढली आणि प्रति किलोमीटर ६२.९ रुपये कमी दराने करार केला, ज्यामुळे २७५.५ कोटी रुपये वाचले.

# गुरुप्रसाद दुर्गा देवीचे शोभायात्रेद्वारे विसर्जन

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १७ :

येथील गुरु प्रसाद रास गरबा दुर्गा उत्सव मंडळ तर्फे नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. देवीचे शोभायात्राद्वारे विसर्जन करण्यात आले. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविक व नागरिकांनी लाभ घेतला. नवरात्रोत्सवात भजन, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम, भारूड, नकला आदी धार्मिक व विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. आयोजनाकरिता



मुख्य आयोजक हर्षल काकडे, अध्यक्ष विजय मिश्रा, सचिव अखिल पोहणकर, मोहीत कोठे, मानसींग ठाकूर, सतीश कौशीक, अभिजीत जोशी, अभय कुणावार, आशीष भट्टलवार, क्रांतीसिंग, विजय देशपांडे, पंकज कौडण्य, अमोल सोनसरे , चंद्रशेखर निघोट, संजय जीवनकर, टिक्कू सिंग आदींनी सहकार्य केले.

# ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा करा : परेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेच्या आवश्यक नोंदीच्या आधारे वीज दर निर्धारण प्रक्रीया पार पडावी यासाठी राज्य वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेले मापदंडांचे पालन करुन ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी चाचणी अभियंत्यांनी महत्वाची भुमिका पार पाडावी, असे आवाहन महावितरणच्या नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी केले.



महावितरणच्या चाचणी व गुणवत्ता नियंत्रण मंडलातर्फे. नागपूर येथील विद्युत भवन कार्यालयात पॉवर क्वालीटी मिटरींग - अहवाल आणि विश्लेषण या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता राजेश नाईक, चाचणी व गुणवत्ता नियंत्रण मंडलाचे अधीक्षक अभियंता योगेंद्र निचत आणि मे. सेक्युअर मीटर्स लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, महावितरणमध्ये चाचणी अभियंत्याची महत्वपूर्ण भुमिका असल्यानेच त्यांची स्वतंत्र ओळख आहे. ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी नियामक आयोगाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या मापदंडाचा उहापोह करताना त्यांनी वीज वितरण कंपनी आणि ग्राहकांच्या हितासाठी नियामकांचे पालन करण्यासाठी वीजेची गुणवत्ता, त्याचे निरीक्षण आणि त्यात सुधारणा करण्यावर भर दिला.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **SETHIYA NAZMINPARVEEN ISRAIL.** NOW MY NEW NAME IS **NAZMIN WASIM SHEIKH.**
**ADD :** PIOT NO. 167, KAWARAPETH, NEAR TIDKE SABHAGRUH, RAMSUMER BABA NAGAR, NAGPUR CITY, NAGPUR CITY, NAGPUR, MAHARASHTRA, 44002

MY OLD NAME WAS **SETHIYA ISRAIL .** NOW MY NEW NAME IS **SHEIKH ISRAEEL SHEIKH BASHIR SETHIYA.**
**ADD :** S/O SHEIKH BASHIR SETHIYA, WORD NO.1, D MANDIR KE PAS; MHASALA TOLI, MHASALA, P.3 KHAIR AKASHWANI, DIST: NAGPUR, MAHARASHTRA - 441002

MY OLD NAME WAS **PRAVIN-KUMAR SANDEL.** NOW MY NEW NAME IS **PRAVIN SANDEL.**
**ADD :** S.B.I COLONYT FULCHUR PETH KARANJA GONDIA

MY OLD NAME WAS **MOTIRAM SANDEL.** NOW MY NEW NAME IS **MOTILAL SANDEL.**
**ADD :** S.B.I COLONYT FULCHUR PETH KARANJA GONDIA


# आमदार समीर मेघे यांचा कामगारांतर्फे सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

महाराष्ट्र शासनातर्फे असंगठित बांधकाम कामगारांना साहित्य वाटप हिंगना विधानसभेचे आमदार समीर मेघे यांचे अथक प्रयत्नांती रामकृष्ण मंगल कार्यालय समोरील शिव मंदिराचे बाजुला विनायक रागीट व परीवाराच्या मालकीच्या जागेवर शिबीराचे आयोजन सोमवार ७ ऑक्टोबर ते सोमवार १४ ऑक्टोबर पर्यंत केले होते. या शिबीरामध्ये दहा हजाराच्या वर महिला व पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला.

सात दिवस हे शिबीर यशस्वीपणे पार पडले शिबीरात कामगारांचे साहित्य व गृहपोयगी भांड्याचे वाटप करण्यात आले. शिबीरामध्ये आमदार समीर मेघे, सागर मेघे व त्यांची टीम सतत कार्यरत होती. स्वतः समीर मेघे रात्री २ वाजता पर्यंत लाभार्थांना मार्गदर्शन करून शांततेने साहित्य वाटप करीत होते. लाभार्थी प्रसंन्नतेने साहित्याचा लाभ घेत होते. या शिबीराचे संचालन हिंगना विधानसभेचे संयोजक नरेश चरडे व वाडी मंडळाचे अध्यक्ष आनंदबाबु कदम यांनी योग्य रीतीने केले वाडी मंडळ व वाडी शहराचे स्वयंसेवकांनी सुद्धा लाभार्थ्यांना मदत करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पंख्याची व्यवस्था, डॉक्टरची व्यवस्था, शौचालय व मुत्रीघरची, आवश्यकते नुसार खुचार्ची व्यवस्था केली. शिबीरामध्ये गरोदर माता,लहान शिशुंच्या माता, अपंग व असाध्य रोगी यांचे करीता विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

लाभार्थ्यानी आनंद व्यक्त करून आमदार समीर मेघे यांचे आभार मानले याप्रसंगी नरेश चरडे, आनंदबाबु कदम, दिनेश कोचे,सरीता यादव, सुजीत नितनवरे, प्रकाश डवरे, गजानन रामेकर, कैलाश मंथापुरवार, प्रशांत श्रीवास्तव, बिमलेश सिंह,प्रमोद गमे, देवराव कडु, विजय राऊत,धिरज आंबटकर, शशिकांत खोंडे,राजु ढेपे, शिवराज ठाकरे, रत्नाकर ठाकरे, सुधाकर राऊत, गोविंद रोडे, कमल कनोजे, रामप्रसाद पटले, कमलाकर ईंगळे, अक्षय तिडके,विशाल डोंगरे, रमेश गोमासे, सतीश खोब्रागडे, बापू लिमकर, विनोद चाफेकर, मधुकर बर्वे, रोहित तिवारी, राकेश मिश्रा, योगेश शेंडे, दत्ता बाबर, राहुल तायडे, लिलाधर भोयर, प्रफुल्ल ढोले, ईशांत राऊत,कल्पना सगदेव, रेखा कोडापे, अर्चना चौधरी, आशा हिंगणेकर, सुनील दुबे,भिमराव मोटघरे, सचिन खिल्लारे, छत्रपती शेंदरे, मंगला पडोळे, सुधाकर ठाकरे,विलास श्रीखंडे, विजय गंथाडे,भूषण बोरकुटे यांचे



विशेष सहकार्य लाभले. जागा उपलब्ध करून दिल्याबद्धल आयोजकांनी विनायक रागीट व परीवारांचे आभार मानले.

# शेती कार्यशाळा व शेतकरी सन्मान कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. १७ :

अंबुजा फाउंडेशन, उत्तम कापूस लोकेशन उमरेड यांच्या वतीने मौजा मुरादपुर येथील युवा प्रगतशील शेतकरी संतोष भगत यांच्या शेतात शेती कार्यशाळा घेण्यात आली.

तसेच गावातील युवा प्रगतशील शेतकरी रुपेश सयाम यांना महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल यांच्या हस्ते वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. यादरम्यान खालील विषयांवर मार्गदर्शन करण्यात, गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन, कीटक नाशकांची फवारणी करतांना घ्यावयाची काळजी, एकसरी आड ओलित पद्धतीचा अवलंब करणे. पातेगळ व बोंडसडीचे कारणे व उपाय, वातावरणातील बदल यावर अंबुजा फाउंडेशनचे प्रक्षेत्र अधिकारी संदिप लोखंडे आणि गजानन गायकवाड यांनी मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमास गावचे पोलिस पाटील बाबाराव भगत ग्रा.पं.सदस्य कैलास कुडमते, लतीत भगत व शेतकरी उपस्थित होते.


## जाहिरनामा

**कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**

प्र.क्र./एम आर सो-८१/२०२४
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपुर

ज्याअर्थी रमेश भैय्यालाल चंदनबटवे रा. शीतला माता मंदीर, आझाद वार्ड रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे रमेश भैय्यालाल चंदनबटवे यांचा जन्म दिनांक ०२.०४.१९७१ रोजी मौजा आझाद वार्ड रामटेक, ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्माची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक २५.०९.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे, त्यामुळे नामे रमेश भैय्यालाल चंदनबटवे यांचा जन्म दिनांक ०२.०४.१९७१ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद रमेश भैय्यालाल चंदनबटवे यांचा जन्म दिनांक ०२.०४.१९७१ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २९/१०/२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वत्तः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष यादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, यायावत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्थळ :- रामटेक**
**दिनांक :-१५/१०/२०२४**

**(भोजराज बडवाईक)**
**नायब तहसिलदार, रामटेक**

# रामटेक येथे मिरची उत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

दि.१७ ऑक्टोंबर ला ग्रीन टीव्ही किसान चौपाल; कृषि, ग्रामीण विकास व पर्यावरण जनजागृती फाउंडेशन; कृषि विभाग, नागपूर; आत्मा यंत्रणा, नागपूर; धानुका एग्रीटेक; ग्रोईट इंडिया; कोठारी इरिगेशन; न्यू हॉलंड; केतन ह्युंडाई ई. कंपनीच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील रामटेक, पारशिवनी, मौदा आणि कामठी या ४ तालुक्यातील १००० पेक्षा जास्त मिरची उत्पादक शेतकऱ्यांकरिता मिरची पिक व्यवस्थापन आणि आधुनिक कृषि तंत्रज्ञान या विषयावर मेळावा संपन्न झाला




दि. १५ ऑक्टोबर रोजी टक्कामोरे सेलिब्रेशन हॉल, रामटेक येथे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागपूर जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र मनोहरे, नागपूर कृषि महाविद्यालयाचे कृषि विद्यावेत्ता डॉ. विनोद खडसे, धानुका एग्रीटेकचे धीरज कदम, कोठारी इरिगेशनचे विजयकुमार सरूर, ग्रोइट इंडियाचे नरेंद्र गिरासे, न्यू हॉलंडचे परेश प्रधान, केतन ह्युंडाईचे लेस्ली सालवे, रामटेकचे तालुका कृषि अधिकारी योगेश राऊत आणि ग्रीन टीव्हीच्या श्रीमती अंशू कुमार यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. प्रश्नमंजुषामध्ये सहभाग घेतलेल्या शेतकरी बांधवांना प्रमाणपत्र आणि पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात चार हि तालुक्यातील मिरची उत्पादक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक व सीइओ, महिला गटांच्या अध्यक्ष आणि सचिव असे एकूण १००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

# गडमंदीरावरील प्रसिद्ध काकड आरतीला आजपासून प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

प्रभु श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तथा दुरवर ख्यातनाम असलेल्या रामनगरीतील गडमंदीरावरील श्रीराम मंदीरामध्ये शुक्रवार दि. १८ ऑक्टों.पासुन काकड आरती सुरू होत असुन तब्बल महीनाभर गडमंदीरावर भावीकांची मांदीयाळी असणार आहे. या दरम्यान महीनाभर पहाटेच्या सुमारास संपुर्ण गडमंदीर परिसर रामनामाच्या जयघोषाने, गजराने दुमदुमुन जात असतो हे तेवढेच विशेष.



भोसला देवस्थान गडमंदीर रामटेक कडुन मिळालेल्या माहितीनुसार, काकड आरती शुक्रवार दि. १८ ऑक्टों. पासुन प्रारंभ होत असुन त्रिपुरी पोर्णिमेला समाप्ती होणार आहे. गडमंदीरावर काकड आरती ही गेल्या कित्येक वर्षापासुन पारंपरीक पद्धतीने सुरू असुन याचे संपुर्ण आयोजन हे भोसला देवस्थान गडमंदीर, रामटेक च्या वतीने करण्यात येत असते. दरम्यान पहाटे ३ वाजता पासुनच गडमंदीरावर भाविकांची रेलचेल सुरू होत असते. या निमित्याने रामधून दिंडी विठ्ठल मंदिरापासून दररोज पहाटे ठीक ४ .३० वाजता निघणार आहे. पहाटे ३ वाजता पासुनच श्रीराम मंदीरामध्ये भक्तगण हजेरी लावतात व भजनाचा कार्यक्रम करतात. यानंतर पहाटे ५ च्या सुमारास काकड आरती होत असते. या दरम्यान तेथे जवळपास ४ ते ५ हजार भावीक काकड आरतीचा लाभ घेण्यासाठी हजर असतात. यामध्ये लहानांपासुन मोठ्यांपर्यंत सर्वच वयोगटातील भावीकांचा समावेश असतो.

तेव्हा पहाटेच्या सुमारास एवढ्या मोठ्या नागरिकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भोसला देवस्थान गडमंदीर, रामटेक व पोलीसांकडुन चोख बंदोबस्त ठेवण्यात येत असतो. यादरम्यान रिसीव्हर, भोसला देवस्थान यांचे मार्गदर्शनाखाली गडमंदीर येथील निरीक्षक अधिकारी हे आपल्या सुरक्षा कर्मचारी तथा काही पोलीसांना हाताशी घेवुन तब्बल महीनाभर सुरक्षा व शांततेची व तसेच नियोजनबद्ध कार्यप्रणालीची मोलाची कामगिरी पार पाडत असतात. त्याचप्रमाणे पहाटेची काकड आरती आटोपल्यानंतर गडमंदीरावर काही भक्तगण भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करीत असतात. एकुणच काकड आरती दरम्यान महीनाभर संपुर्ण रामनगरीमध्ये एक वेगळेच भक्तीमय वातावरण पहावयास मिळत असते.

# भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. १७ :

राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात रासेयो विभागांतर्गत पूर्व राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरी करण्यात आली.

प्रारंभी एपीजे यांच्या प्रतीमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असणाऱ्या कलामांच्या अभिवादनाकरीता बीकॉम तृतिय वर्षाच्या श्रुती तलवारे हिला तिच्या वाचनातील सातत्य व वाचनाभिरुची जपण्याच्या छंदामुळे प्रथम अभिवादनासाठी अग्रणीहोण्याचा मान देण्यात आला.

एपिजे यांच्या जीवन व कार्यावर वाणिज्य विभाग प्रमुख डॉ गायत्री कुकडे यांनी प्रकाश टाकतांना एपिजे यांच्या जीवनातील त्यांचा आयुष्याचा प्रवास जाणून घ्यावा व शुन्यातून ऊदात्त व ऊन्नत आयुष्य कसे घडवावे, हे शिकावे असे मार्गदर्शन केले.

यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य गजानन मांडेकर होते महाविद्यालयातील प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी यांची ऊपस्थीती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ प्रविण लामखेडे यांचेसह विजय देशमुख संजय टेकाम भरत वानखेडे टेकेश्वर देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डिगडोह नगर परिषद कार्यालयात वाल्मिकी जयंती उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १७ :

डिगडोह देवी नगरपरिषद कार्यालयात महर्षि ऋषि वाल्मीकी महाराज जयंती साजरी करण्यात आली. मुख्याधिकारी रामेश्वर पंडागडे यांच्या मार्गदर्शनात अक्षय वाल्मीक राजाराम वाल्मीक, नेत्रपाल वाल्मीक, महावीर वाल्मीक,अधिकारी हितेंद्र उके, अमरसिंग वाल्मीक व सफाई कर्मचाऱ्यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन केले.



यावेळी दलवीर वाल्मीक, उदयवीर वाल्मीक, रामपाल वाल्मीक, सचिन वाल्मीक, अजय जयंती वाल्मीक, रविंद्र वाल्मीक, श्रिपाल वाल्मीक, नितेश वाल्मीक, गब्बर वाल्मीक, हर्ष वाल्मीक, अमन वाल्मीक, शिवा वाल्मीक, अनिल वाल्मीक, अजय वाल्मीक, सतिश वाल्मीक, राजेश वाल्मीक, रवि वाल्मीक, जितु वाल्मीक, लोकेश बांगर,सचिन राजेश वाल्मीक, संजय वाल्मीक, रतन वाल्मीक, धर्मेंद्र वाल्मीक,वसंत वाल्मीक, विनीत आनंद, चंदन वाल्मीक,अमित वाल्मीक, किरण आठवले, सुरज श्रीवास, राज वाल्मीक,विकास वाल्मीक, आशीष वाल्मीक, आकाश वाल्मीक, राहुल वाल्मीक, आकाश महावीर वाल्मीक, विशाल वाल्मीक,अंकित वाल्मीक, मोनु वाल्मीक, पवन कोडापे, रोहित वाल्मीक, अरून वाल्मीक, दिनेश वाल्मीक, राजकुमार वाल्मीक, सेवानंद वाल्मीक,दिव्यांश वाल्मीक, सुभाष वाल्मीक, सोमनाथ वाल्मीक आदी कर्मचारी उपस्थित होते.

# चंद्रिका बाजार येथे शरद पौर्णिमा साजरी

**कन्हान :** कन्हान शहरातील पांधन रोड वरील चंद्रिका बाजार हनुमान मंदिरात मंदिर कमेटी आणि आंतराष्ट्रीय हिंदू परिषद राष्ट्रीय बंजरग दल यांच्या संयुक्त विद्यमाने शरद पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिरात हनुमानजीची विधिवत पूजा अर्चना करुन शरद पौर्णिमा कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. आंतराष्ट्रीय हिंदू परिषद राष्ट्रीय बंजरग दल च्या सदस्यांनी सुंदरकांड



आणि हनुमान चालीसा पाठन केले. भजन, कीर्तन, आरती, पुजा अर्चना आणि दुध वाटप करून शरद पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी भीमसिंह ठाकूर, श्यामजी पिपलवा , विजय पारसकर, शिवाजी कोकाटे, मधुकरजी कुंभलकर, अनुराग महल्ले, राजीव त्रिपाठी, मुकेश कश्यप, कुणाल सिंग तलवार , शुभम बावनकर, अनिकेत निमजे , विवेक उमरकर, प्रकाशजी रोकडे आदिंची उपस्थिती होती.

# महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त अभिवादन

**नागपूर :** महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त गुरूवारी १७ ऑक्टोबर रोजी भारतीय जनता पार्टीतर्फे अभिवादन करण्यात आले. भाजप प्रदेश प्रवक्ते व उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी धरमपेठ वाल्मिकी धाम येथील महर्षी वाल्मिकी यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करुन वंदन केले. याप्रसंगी अशोक मेंढे, सुभाष पारधी, डॉ. मिलिंद माने, संदीप जाधव, संजय बंगाले, विनोद कन्हेरे, दिलीप गोईकर, अनंत जगनीत, उषा पायलट, इंद्रजीत वासनिक, शरद पारधी, वत्सला मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते.

# वाडीत श्री साईबाबांची पुण्यतिथी संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

येथील इंद्रायणी सोसायटीत श्री साईबाबा पुण्यतिथी निमीत्य मंगळवार १५ ऑक्टोंबर रोजी विविध धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गुरुकुल पब्लिक स्कुलचे संस्थापक प्रा. संजय काळे व प्राचार्या मौसमी काळे यांच्या हस्ते होमहवन व महापूजा करण्यात आली.



महाप्रसादाचे आयोजन शंतनू काळे यांच्यातर्फे करण्यात आले. यावेळी स्वप्नील काळे,वेदांत काळे,संचित काळे, आदित्या काळे, मनोज नासरे, विशाल जोध, मोना यादव, मंथन शेळके, श्रावणी शेळके, जेरूशा गंधरे, गजानन तुमडाम, अनिकेत कराळे, मयुरी शेळके, कल्याणी काळे, प्रसाद गलांडे, शशिकांत बोपचे, निशांत झाडे, आशय राठोड आदीसह हजारो नागरीक उपस्थित होते.

## हॅम मधील कामाचा कार्यारंभ आदेश जारी

**वाडी :** हिंगणा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातुन जाणाऱ्या सोनेगांव झ लिंगा (लडाई) एनएच -६ बाजारगांव-शिवा-अडेगांव प्रजिमा १२ रस्त्याच्या निविदा प्रक्रियाअंती कायारंभ आदेश निर्गमीत झाल्यामुळे आता लवकरच कामास सुरुवात होणार आहे. दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडणाऱ्या या महत्वपुर्ण रस्त्याची सुधारणा तातडीने होण्यास्तव आमदार समीर मेघे सातत्याने पाठपुरावा करित होते. तथापी काही विरोधकांनी सदर रस्ता मंजुर नसल्याचा अपप्रचार देत पसरविण्यास सुरुवात केली होती. यावरुन त्यांना मतदारसंघातील विकास कामांची मंजुरी व इतर बाबींची अपुर्ण माहिती असल्याचे दिसुन येते. राज्य शासनाने हॅम प्रकल्पातुन या रस्ता सुधारणेसाठी ९९ कोटी रुपये निधी मंजुर केलेला आहे. त्यातुन सुमारे ३० कि.मी. लांबीच्या रस्ता सुधारणेचे काम करण्यात येणार आहे.

# घनकचरा व्यवस्थापनाअभावी आरोग्य धोक्यात

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी , दि. १७ :

कोंढाळी नगर पंचायती राज एक वर्ष पुन्हा झाली आहे. नगर पंचायत स्थापनेपासून अजूनही निवडणूका झालेली नाही. सध्या नगर पंचायतीचा कारभार प्रशासक पाहत आहेत. सध्या स्थितीत कोंढाळी नगर पंचायतीच्या हद्दीतील घान कचरा उचलनार्या घंटागाड्यांच्या अभाव व उपलब्ध असलेल्या जुनाट व कालबाह्य घंटागाड्या कधी ही बंद पडतात व बंद पडलेल्या घंटागाड्या दुरूस्तीला आठवडा घेतात. या मुळे कोंढाळी येथील प्रत्येक प्रभागातील घनकचरा कचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे होत नसल्याने कोंढाळीकराचे आरोग्य धोक्यात आले आहे. या करिता नगर विकास विभाग, जिल्हा नियोजन समिती यांचे मार्फत कोंढाळी नगर पंचायत क्षेत्रातील घनकचरा उचलण्यासाठी आवश्यक अश्या घंटा गाड्या पुरविण्याची मागणी सर्व



कोंढाळीकरांची आहे.

खरे तर! आपण जसजशी भौतिक प्रगती करतो, तसतसं आपलं वस्तू वापरण्याचं प्रमाण वाढतं आणि पर्यायाने आपण निर्माण केलेल्या कचऱ्याचे प्रमाण आणि प्रकारही अधिक वाढतात. पण, तो कचरा साठवून राहिल्याने त्याचा नागरिकांवर व पर्यावरणावर दुष्परिणाम होतो.

त्यामुळे कचरा हा योग्य पद्धतीने निकाली काढला गेला पाहिजे.

या करिता कोंढाळी नगर पंचायती हद्दीतील घान कचरा व्यवस्थापन योग्यरितीने राबविण्यासाठी सहा वार्डा साठी सहा अद्यावत घंटागाड्या पुरविण्यात याव्यात या करिता येथील नागरिकांनी राज्याचे नगरविकास विभाग सचीव, जिल्हाधिकारी नागपूर, तसेच सी ओ नगर पंचायत कोंढाळी यांचे कडे १७आक्टोबर रोजी ई मेल चे माध्यमातून मागणी अर्ज करण्यात

## घंटागाड्यांची कमतरता संसर्गजन्य आजाराची शक्यता

आले आहेत अशी माहिती स्वप्निल व्यास यांनी दिली आहे.

या प्रकरणी कोंढाळी नगर पंचायत प्रशासक धनंजय बोरीकर यांचे सोबत संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की कोंढाळी नगर पंचायत भागातील नागरिकांच्या घनकचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे होत नसल्याच्या तक्रारी मिळाल्या आहेत. याबाबत घंटागाड्या साठी प्रस्ताव पाठविला आहे.

घंटागाड्या करिता प्रस्ताव मंजूर झाला की घंटा गाड्या खरेदी केल्यावर घनकचरा व्यवस्थापन तक्रारी दुर केल्या जातील.

येथील सर्व राजकीय, सामाजिक, व्यापारी संघटनाचे प्रतिनिधींनी घनकचरा व्यवस्थापनासाठी वेळीच पावले उचलावी व कोंढाळीकरांचे आरोग्यावर होणारा दुष्परिणाम टाळावा अशी मागणी केली आहे.

# रामायणकार महर्षि वाल्मिकी यांना महावितरणचे अभिवादन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

प्रभू श्रीराम यांच्या जीवनातील सत्य, कर्तव्य, साहस यांचा परिचय करुन देणारे आणि आदर्श जीवन जगण्यास मार्गदर्शन करणाऱ्या रामायण या महाकाव्याचे रचनाकार, आदिकवि महर्षी वाल्मीकी यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे. त्यांना अभिवादन करण्यात आले.

महावितरणच्या विद्युत भवन या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य यांच्या हस्ते महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी अधीक्षक अभियंता मधुकर घुमे, कार्यकारी अभियंता समीर शेंद्रे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

# महिला सन्मानकरिता कॅन्डल मार्च पथनाट्याची प्रस्तुती



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

मातृका फाउंडेशन रामटेक द्वारे महिला सन्मान करिता नवरात्री उत्सवामध्ये, शीतला माता मंदिर, सार्वजनिक बाल मित्र नवदुर्गा उत्सव मंडळ पापधुपेश्वर वार्ड, गायत्री मंदिर, सुदर्शन नगर, शितलवाडी रामटेक, तसेच तसेच पारशिवनी स्थित कुवारा भीवसेन येथे कॅन्डल मार्च पथनाट्याचे महिला कलाकारानी सादरिकरन केले. जनतेला महिलाच्या सन्मान करण्याचा संदेश दिला गेला.

सदर पथनाट्या मधे महिला कलाकारानी प्रत्येक घरातिल देवीच्या रुपातिल स्त्रीचा सन्मान करा. तिला आनंद द्या, स्वातंत्र्य द्या. तर तिच्यावर होणारा अत्याचार थांबवा. प्रत्येकाच्या घरात असलेल्या लक्ष्मी, दुर्गा स्वरूपातील आई, बहीण, पत्नीयांची काळजी घ्या. ह्या उद्देश समोर ठेवून मातृका फाउंडेशन रामटेक, ने कॅन्डल मार्च हे पथनाट्य रामटेकरांसमोर सादर केले. यावेळी माजी आमदार आशिष देशमुख यांच्या द्वारे कलाकारांचा सत्कार करण्यात आला. या पथनाट्याचे लेखन व दिग्दर्शन डॉ. अंशूजा किंमतकर यांनी केले. यावेळी लक्ष्मी मातरे, जया राठोड, सरोज कडपाते, मेघा वंजारी. शितल उईके, मनस्वी तीबुढे, राखी संभलवार, नवशिका घाटोडे, विधी खोब्रागडे, गार्गी रहाटे, जीविका वंजारी आणि दुर्वा लेंडे यांनी सादरीकरण केले.

# भारतीय संविधानामुळेच भारत एकसंघ : विश्वंभर चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १७ :

68 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त काटोल येथे बहुजन वंचित क्रांतीसेना संविधान बचाव संघर्ष समित मानव अधिकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल येथे प्रसिद्ध वक्ते व संविधानाचे गाढे अभ्यासक विश्वंभर चौधरी व सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता असीम सरोदे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्थानिक जगतगुरु संत तुकाराम महाराज दुकान संकुल बँक ऑफ इंडिया जवळ नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



यावेळेस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी व आंबेडकरी विचारांच्या अभ्यासक सुरेश राव देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून एडवोकेट हे होते. तसेच बहुजन वंचित क्रांती सेनाचे जिल्हाध्यक्ष संविधान बचाव संघर्ष समितीचे संयोजक मानव विकास संघटनेचे कार्याध्यक्ष नगरपरिषद काटोलचे माजी सभापती दिगंबर डोंगरे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी विश्वंभर चौधरी म्हणाले, आम्ही सरकारला काही मुद्द्यावर समर्थन जाहीर केले आहे, जसे संविधान जनतेला माहीत झाले पाहिजे म्हणून अभ्यासक्रमात लागू करावा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून जनतेला स्वाभिमानाने व निर्भयपणे जगण्याचा अधिकार दिला आणि शासन प्रणाली कडून जर चुका होत असतील, जर अन्याय होत असेल, तर त्याच्या विरोधात आवाज उठवण्याचा अधिकार संविधानाचे माध्यमातून दिला आहे. म्हणून संविधान वाचवणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य झाले आहे.

कार्यक्रमाच्या दिगंबर डोंगरे यांनी प्रास्ताविकेतून सांगितले की, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात रक्ताचा एकही थेंब न सांडवता कुठल्याही प्रकारचा दबाव कुठल्याही प्रकारचा वाद न करता पेनाच्या टोकाच्यावर भारतात जगात न झालेले शांततेच्या मार्गातली धम्मक्रांती करून दाखवली. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर 14 ऑक्टोबर 1956 करोडो दलित बांधवांना बौद्ध धमार्ची दीक्षा घेतली. कार्यक्रमाचे संचालन मराठा सेवा संघाचे व संविधान बचाव संघ समितीचे व बहुजन क्रांती क्रांती सेनेचे काटोल शहराध्यक्ष नरेंद्र राऊत यांनी केले. यावेळेस दोन्ही भक्तांना व उपस्थित मान्यवरांना संविधान प्रास्ताविकेचे फोटो भेट देऊन दिगंबर डोंगरे यांनी त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने जनता उपस्थित होती. उपस्थितांचे आभार बहुजन वंचित क्रांती सेनेचे नरखेड तालुका अध्यक्ष सुनील नारनवरे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेकरिता दिगंबर डोंगरे, नरेंद्र राऊत, विजय माणिक, नाईक नीलकंठ, गजभिये, धीरज गजभिये, बंडु गजभिये, हर्षद बनसोड, सुनील नानवरे, बाबाराव तागडे, जानरावजी गावंडे, दिगंबर भगत, एकनाथ पाटील, ललिता दुपारी, निर्मला रक्षित, मीनाताई पाटील, प्रज्ञाताई डोंगरे, वैशाली वैशाली राऊत, कल्पना लोहे, साधना पोतदार आदिंनी प्रयत्न केले.

# एसटी महामंडळात ११ हजार कोटींचा गैरव्यवहाराचा संशय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

एसटी महामंडळात नुकत्याच झालेल्या ७० हजार ३७८ कोटींच्या (प्रति किलोमीटर ७८ रुपये) करारावर पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी आक्षेप घेतला आहे. या प्रकरणात ११ हजार कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप असून त्याबाबत महत्वाची माहिती ठाकरे यांनी मुख्यसचिवांना तक्रारीत चौकशीची मागणी करत केली आहे.



एसटी महामंडळाने ओलेक्त्रा ग्रीनटेक लिमिटेड आणि इव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड, या मेघा इंजिनिअरिंग आणि इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या (एमईआयएल) उपकंपन्यांना दिलेल्या ७०,३७८ कोटींच्या (प्रति किलोमीटर ७८ रुपये) करारावर आमदार विकास ठाकरेंनी आक्षेप नोंदवला आहे. या प्रकरणात ११ हजार कोटींचा अपव्ययाचा आरोप करत मुख्य सचिवांनी चौकशी करावी, असे आवाहनही ठाकरे यांनी केले आहे.

एसटी महामंडळाने केलेल्या करारात ५ हजार १५० इलेक्ट्रिक स्टँडर्ड साईज बसच्या खरेदीसह, १२ वर्षांच्या कालावधीसाठी बसच्या संचालन आणि देखभाल यांचा समावेश आहे. या कराराद्वारे तुलनात्मक करारापेक्षा ११ हजार ७३० कोटी रुपये जास्त खर्च करत सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा ठाकरेंचा आरोप आहे. नागपूर महानगरपालिकानेही इव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेडला २५० इलेक्ट्रिक बससाठी प्रति किलोमीटर ७८ रुपये या महागड्या दराने करार देण्याचा विचार केला होता, ज्यामुळे १ हजार ४२३.५ कोटी रुपये खर्च अपेक्षीत होता. मात्र, ठाकरे यांनी एकाच निविदेवर आक्षेप घेतल्यानंतर, महानगरपालिकाने पुन्हा निविदा काढली आणि प्रति किलोमीटर ६२.९ रुपये कमी दराने करार केला, ज्यामुळे महापालिकेचे २७५.५ कोटी रुपये वाचले. इव्ही ट्रान्सने स्वतः बेस्ट मुंबईच्या २ हजार ४०० इलेक्ट्रिक स्टँडर्ड साईज बससाठी प्रति किलोमीटर ६४ रुपये या दराने निविदा भरली होती.

दरम्यान एसटी कराराच्या अटी खासगी ऑपरेटरसाठी नागपूर महापालिका आणि बेस्ट मुंबई सारख्या इतर करारांपेक्षा जास्त लाभदायक आहे. नागपूर महानगरपालिका आणि बेस्ट २०० किलोमीटर प्रति बस दररोजच्या पेमेंटची अट ठेवतात, तर एसटीच्या करारात ऑपरेटरला ४०० किलोमीटर प्रतिदिनचे पेमेंट दिले जाते.

शिवाय, एसटीचा करार १२ वर्षांचा आहे, तर इतर करारांमध्ये १० वर्षांचा कालावधी आहे. एसटीच्या करारात मोठ्या प्रमाणात बस असतानाही, प्रति किलोमीटर ७८ रुपयांचा दर हा देशातील इतर तुलनात्मक करारांपेक्षा सरासरी ६५ रुपये प्रति किलोमीटरपेक्षा जास्त असल्याचाही ठाकरे यांचा आरोप आहे. एसटी महामंडळाने हा करार अपुरी स्पर्धा असलेल्या काळात केल्याचाही आरोप ठाकरे यांनी केला.

# ऑक्सिजन मॅन प्रमोद घरडेचा भल्याभल्यांनी घेतला धसका

## मतदार यादीतून अचानक नाव गायब

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. १७ :

उमरेड विधनसभेचे उभरते नेतृत्व व महिलांच्या मनातील लाडका भाऊ तसेच कोरोना काळात स्वखर्चाने ऑक्सिजन पुरवणारा देवदूत म्हणून ख्यातीप्राप्त असलेल्या प्रमोद घरडे यांचे त्यांच्या साळवा गांवातील मतदार यादीतून अचानक नाव गायब झाल्याने एकच खळबळ उडाली.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपचे सक्रिय कार्यकर्ते प्रमोद घरडे यांची वाढती प्रतिमा पाहून प्रतिस्पर्धी मधील कोणीतरी अज्ञात इसमाने प्रमोद घरडे यांचे नाव उमरेड विधानसभेच्या यादीतून शिष्ट करून दुस-या विधानसभेच्या यादीत सामाविष्ट केले असा आरोप प्रमोद घरडे यांनी कुही पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

दिलेल्या तकारीत असे म्हटले आहे की, प्रमोद घरडे हे तालुक्यातील साळवा या गांवचे जन्मापासूनचे रहीवासी आहेत. ते महाराष्ट्र राज्याचे कायमचे रहीवासी आहे. एक सामाजिक कार्यकर्ता असून साळवा ता.कुही जि.नागपूर येथील गावचा मतदार आहे. प्रमोद घरडे यांचे नाव उमरेड विधानसभा - ५१ चे मतदार यादीत अनु.क्र.२५९ वर



नोंद होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतदान केलेले आहे. असे असताना दि.११ नोव्हेंबरला साळवा गावचे पोलीस पाटील यांनी सांगितले की,कोणीतरी एका इसमाने खोडकर बुध्दीने व द्वेषाने प्रमोद घरडे यांचे नाव वडगांव शेरी (पुणे)या विधानसभा - २०८ मतदार क्षेत्रातील यादीत नाव समाविष्ट करण्यात आले आहे.

अशी माहिती मिळताच माझे उमरेड विधानसभा क्षेत्रातील अस्तित्वच नाहीसे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. माझे स्वतःचे गांव साळवा असून गेली सात - आठ वर्षापासून उमरेड विधानसभेतील प्रत्येक गाव न गाव मी पिंजून काढला आहे.माझी उमरेड विधानसभा निवडणूक लढण्याचा प्रयत्न आहे.

माझी जनमानसात असलेली प्रसिद्धी पाहून माज्याच प्रतिस्पर्ध्याकडून असा खोडसाळपणा करून माझे अस्तित्व नाहीसे करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे.तेव्हा सदर प्रकरणाची योग्य चौकशी करून मला सदर प्रकरणाबाबत अज्ञात व्यक्तीवर कठोर कारवाई करावी.अज्ञात व्यक्तीने भरलेला शिफ्टींग फॉर्म ताबडतोब रद्द करावा.अशी मागणी प्रमोद घरडे यांनी केली आहे.

वरील प्रकरणासबंधी कुहीचे तहसीलदार अरविंद हिंगे यांना विचारणा केली असता साळवा गांवातील यादीतुन त्यांचे नाव कमी करण्यात आलेले नाही.त्यांचे मतदार यादीत व्हीआयपी मतदार म्हणून नमूद करण्यात आले आहे, असे असताना कोणीतरी अज्ञात इसमानी त्यांचे साळवा येथील मतदार यादीतील नाव वडगाव शेरी( पुणे )येथे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.ते त्वरित रद्द करण्यात येईल असे सांगितले.

# जबरी चोरीचे आरोपी गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

महाल परिसरात दुचाकीस्वार दोघांनी दिवसाढवळ्या एका तरुणाला धमकावून लुटले होते. या गुन्ह्याचा छडा लावत गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने दोन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून लुटीचा मालही जप्त करण्यात आला. समर्थ प्रयाग भोसले (23) आणि संकेत नितीन कतले (23) दोन्ही रा. नाईक रोड, महाल अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

फियार्दी रवींद्र श्यामराव वानखेडे (42) रा. भोलेबाबानगर, उदयनगर रिंगरोड, हुडकेश्वर हे सहकारी प्रज्ज्वल शंभरकर (18) रा. दिघोरी याच्यासोबत घरोघरी जाऊन ए.सी. दुरुस्तीचे काम करतात. गत मंगळवारी दुपारी 2.30 वाजताच्या सुमारास दोघेही एसबीआयच्या महाल शाखेत पासबूक प्रिंट करण्यासाठी गेले होते. रवींद्र आत गेले, तर प्रज्ज्वल बाहेरच रोडवर उभा होता. दरम्यान वरील आरोपी बुलेट मोटार सायकलने प्रज्ज्वलजवळ आले. धमकावत 5 हजार रुपयांची मागणी केली. प्रज्ज्वलने त्याच्याकडे पैसे नसल्याचे सांगितले.

त्यामुळे चिडून आरोपींनी त्याला हातबुक्कीने मारहाण केली आणि त्याच्याजवळ असलेली ए.सी.दुरुस्तीची किट हिसकावून फरार झाले. रवींद्र बँकेतून बाहेर येताच प्रज्ज्वलने त्यांना घटनेची माहिती दिली. दोघांनीही गणेशपेठ पोलिस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकानेही या घटनेचा समांतर तपास सुरू केला. तांत्रिक तपास व खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर समर्थ आणि संकेतला रेशीमबाग मैदानातून ताब्यात घेतले.

चौकशीत दोघांनीही गुन्हा कबूल केला. पोलिसांनी आरोपींकडून ए.सी.दुरुस्तीची किट आणि गुन्ह्यात वापरलेली बुलेट मोटारसायकल जप्त केली. पुढील कार्यवाहीसाठी दोन्ही आरोपींना गणेशपेठ पोलिसांच्या स्वाधिन केले.

# ईपीएस- ९५ योजनेतील वाढीव निवृत्ती वेतनाचा लाभ फक्त ८ कर्मचाऱ्यांनाच

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

सर्वोच्च न्यायालयाच्या वाढीव निवृत्ती वेतनाबाबत निर्णयानंतर कर्मचारी पेन्शन योजनेअंतर्गत (ईपीएस-९५) पूर्व विदर्भातील केवळ ८ कर्मचाऱ्यांनाच वाढीव निवृत्ती वेतन सुरू झाली आहे. या पद्धतीची स्थिती देशातील इतरही कार्यालयातील असल्याचे सेवानिवृत्त कर्मचारी (१९९५) समन्वय समितीचे म्हणणे आहे. दरम्यान याबाबत महत्वाची घडामोड माहिती अधिकारातून पुढे येत आहे.

नागपुरातील कर्मचारी भविष्य निधी संघटन कार्यालयाच्या (ईपीएफओ) अखत्यारित पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा या जिल्ह्यांचा समावेश होतो. येथील शासकीय उपक्रम, महामंडळ, खासगी कंपन्या, असंघटित क्षेत्रातील सुमारे ५ लाख कर्मचारी या कार्यालयाच्या




अखत्यारित आहे. या कार्यालयात सुमारे दीड लाख निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळते.

सर्वोच्च न्यायालयाच्या ४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या निकालानंतर वाढीव निवृत्ती वेतनाचा विकल्प भरणाऱ्यांना वाढीव निवृत्ती वेतनाचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानुसार नागपूरसह देशभरात मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी विकल्पही भरला. परंतु, ईपीएफओ नागपूर कार्यालयातून सध्या केवळ ८ कर्मचाऱ्यांनाच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव निवृत्ती वेतन सुरू झाल्याचे माहितीच्या अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते अभय कोलाकर यांनी पुढे आणले आहे. त्यामुळे ईपीएफओ कडून झटपट वाढीव निवृत्ती वेतनाची प्रकरणे निकाली का काढली जात नाहीत? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यातच ईपीएफओ कार्यालयाकडून सूरू निवृत्ती वेतन काही कारणास्तोवर बंद केले गेले.

त्यावर संबंधित कर्मचाऱ्यांना कळवण्याबाबत काहीही तरतूद नसल्याचेही माहितीच्या अधिकारात नागपुरातील कर्मचारी भविष्य निधी संघटन कार्यालयाने सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना लेखी कळवले आहे. त्यामुळे ईपीएफओ कार्यालयाच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर वाढीव निवृत्ती वेतनाचा विकल्प भरणाऱ्यांसह सरसकट सगळ्याच ईपीएस-९५ योजनेतील कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनात वाढ व्हायला पाहिजे. या कामात अधिकाऱ्यांकडून विविध चुकीच्या आधिसूचना काढत अडथळे घातले जात आहे. या अधिकाऱ्यांवरही कारवाई करायला हवी, अशी मागणी सेवानिवृत्त कर्मचारी (१९९५) समन्वय समितीचे राष्ट्रीय महासचिव प्रकाश पाठक यांनी केली आहे.

ईपीएफओच्या नागपूर कार्यालयाकडून आठ कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव निवृत्ती वेतन सुरू झाले. इतरांबाबतच्या प्रक्रियेला संबंधित कर्मचाऱ्यांचा हिशोबाला वेळ लागत असल्याने विलंब होतो आहे.

परंतु, लवकरच ही प्रक्रिया पूर्ण होईल. निवृत्ती वेतन बंद झालेला कर्मचारी स्वतः आमच्या कार्यालयात त्रुटी दूर करतो. त्याला आमच्याकडून सूचना देण्याची तरतूद नाही, अशी माहिती सहाय्यक भविष्य निधी आयुक्त के. के. राजहंस यांनी दिली.

# घरफोडीचा आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात

नागपूर : गुन्हे शाखा युनिट 4 च्या पथकाने बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत बेसा परिसरात दिवसाढवळ्या एका घरात घुसून चोरी करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. सूरज मारोतराव वानखेडे (42) रा. भांडे प्लॉट, उमरेड रोड सक्करदरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी किशोर सोमाजी खोब्रागडे (40) रा. आनंद गृहनिर्माण सोसायटी, बेसा यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला होता. गत 10 ऑक्टोबर रोजी किशोर यांच्या घराजवळ भजनाचा कार्यक्रम होता. दुपारी 1 वाजताच्या सुमारास किशोर यांचे आई-वडील घराचा कडी-कोंडा लावून भजनाच्या कार्यक्रमात गेले होते.

या दरम्यान आरोपीने घरात प्रवेश करून बेडरूमच्या कपाटातील 10 हजारांची रोकड चोरून नेली. 14 ऑक्टोबरच्या सकाळी किशोर यांनी कपाट उघडले असता त्यातील रोकड गायब होती. सर्वत्र शोध घेऊनही रोकड न मिळाल्याने त्यांनी बेलतरोडी ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. गुन्हे शाखा युनिट 4 चे पथकही या घटनेचा समांतर तपास करीत होते. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपीचा सुगावा लागला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून रोख 10 हजार, मोटारसायकल आणि मोबाईल फोन असा 41 हजारांचा माल जप्त केला.

# निवडणुकीत काळ्या पैशाचा वापर आढळल्यास तत्काळ माहिती द्यावी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमाची नुकतीच घोषणा झाली आहे. त्यानुसार येत्या 20 नोव्हेंबर 2024 रोजी राज्यात मतदान होणार असून 23 नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाल्या असून पारदर्शक पद्धतीने निवडणुका पार पडाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारचे आयकर विभागही तयार असून दरम्यानच्या कालावधीत काळ्या पैशांच्या व्यवहारावर बारीक नजर ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती नागपूर येथील उप आयकर संचालक (अन्वेषण) अनिल खडसे यांनी दिली.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान काळ्या पैशांचे व्यवहार रोखण्यासाठी नागरिकांनी आयकर विभागासोबत यावे. निवडणुकीत वापरला जाणारा काळा पैसा, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल, आदी संशयास्पद गोष्टी आपल्या नजरेस पडल्यास नागरिकांनी कोणताही संकोच न बाळगता थेट आयकर विभागाशी संपर्क साधावा. संबंधित माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख ही गुप्त ठेवण्यात येईल, असे खडसे यांनी सांगितले.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांनी आयकर विभागाला सदर माहिती देण्यासाठी 1800-233-0356 या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. एखाद्या घटनेची छायाचित्रे, व्हिडिओ इ. माहिती पाठवण्यासाठी 9403390980 हा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवाय, सदर मजकूर या मेल आयडीवर मेलही करता येईल.

# वायसीसीईमध्ये इनोव्हेशन डे' साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या जयंतीनिमित्त इनोव्हेशन डे कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने "टेकिंग असमिट्रीक बेट्स इन लाईफ" या विषयावर मेकॅनिकल विभागाच्या अमेरिकन सोसायटी ऑफ मेकॅनिकल इंजिनियर्सच्या स्टुडंट चॅप्टरने कार्यक्रम स्क्वेअरफीट 9 आणि सी-वॉकरचे संस्थापक हिमांशू सेवालकर यांची प्रमुख पाहुणे होते. मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. जयंत गिरी, डॉ. आर.बी. चडगे आणि डॉ. एस.एस. चौधरी, डीन



(ओबीई) यांची उपस्थित होती. वायसीसीई एएसएमई अधिकारी वेदांत लाखे, कमोद कोहोड आणि प्रथम थोरात यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

हिमांशू सेवालकर यांनी व्यवसाय सुरू करण्याच्या आणि वाढविण्याच्या प्रवासातील त्यांचे अनुभव सांगितले. त्यांनी उद्योजकांसाठी नवकल्पना, जोखीम घेणे आणि लवचिकता यांचे महत्त्व अधोरेखित केले.



नागपूर : विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होत असून, आचारसंहिता लागू झाली आहे. गेल्या कित्येक महिन्यांपासून स्वतःच्या कर्तृत्वाचा उदोउदो करवून घेणाऱ्या नेत्यांचे शहरात ठिकठिकाणी टांगलेले बॅनर, फलक काढून टाकण्याचे जिकरीचे काम मनपाला करावे लागत आहे. जिल्हा प्रशासन आणि मनपाची संपूर्ण यंत्रणा हे बॅनर, फलक काढण्याच्या कामी लागली आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६७ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. १७ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. गुरूवार (17) रोजी शोध पथकाने 67 प्रकरणांची नोंद करून 33,400/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 14 प्रकरणांची नोंद करून 5,600/- रुपयांची वसुली करण्यात आली.





व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 300/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 7 प्रकरणांची नोंद करून 2,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 5 प्रकरणांची नोंद करून 3,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे, प्रथम 48 तासात हटविण्याची नोटीस देऊन न हटविल्यास या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1000 रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 26 प्रकरणांची नोंद करून 5,200/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 10 प्रकरणांची नोंद करून 10,000/- रुपयांची दंड वसूल करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी ओला किंवा सुका कचरा जाळून उपद्रव निर्माण करणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 5,000/- वसुली करण्यात आली. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मी नगर झोन अंतर्गत मे. गार्डन ग्लोरी यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. सुर्दशन मोटर यांनी कार्यालयाच्या बाजुला कचरा जाळल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. अश्विनी गोलचा बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. धंतोली झोन अंतर्गत ठाकूर कुबलानी यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. श्याम किराणा स्टोर यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. नीनावे डेली निड्स यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. लकडगंज झोन अंतर्गत अवदेश मिश्रा यांनी आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. रस्त्यावर पाणी वाहत असल्याबद्दल रु. 5,000/- दंड वसूल केला.